प्रकरण पाचवे

# मराठी कादंबरीतील माणदेशाचे चित्रण


| अ.क्र. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| ५.१. : | प्रास्ताविक | २२९ ते २२९ |
| ५.२. : | मराठी कादंबरीची वाटचाल | २२९ ते २३१ |
| ५.३. : | मराठी ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीची वाटचाल | २३१ ते २३८ |
| ५.४. : | ग. दि. माडगूळकर ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण | २३८ ते २५७ |
| ५.५. : | व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण | २५७ ते २८३ |
| ५.६. : | शंकरराव खरात ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण | २८३ ते ३०० |
| ५.७. : | द. ता. भोसले ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण | ३०० ते ३१० |
| ५.८. : | उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण | ३१० ते ३३१ |
| ५.९. : | निष्कर्ष व निरीक्षणे | ३३२ ते ३३३ |
| ५.१०.: | समारोप | ३३३ ते ३३३ |
| ५.११.: | संदर्भ व टीपा | ३३४ ते ३३५ |

# प्रकरण पाचवे

# मराठी कादंबरीतील माणदेशाचे चित्रण

## ५. १. प्रास्ताविक :

मराठी कादंबरी हा सुरुवातीपासून कादंबरीकार व वाचक ह्यांच्या आवडीचा साहित्यप्रकार मानला जातो. कादंबरी हा कथात्मक साहित्यात मोडणारा प्रकार आहे. कादंबरीतून मानवी जीवनाचा व्यापक पट उलगडत असतो. त्यामुळे मानवी जीवनचित्रणाची उकल करण्यासाठी कादंबरी हा साहित्यप्रकार कथेपेक्षा उपयुक्त ठरतो. कादंबरीतून मानवी जीवनभाष्य व त्या अनुषंगाने येणारे सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक चित्रण बारकाईने पाहता येते. मानवी जीवनातील गूढता व मानवी संस्कृतीचे दर्शन समजावून घेण्यासाठी कादंबरी हा साहित्यप्रकार योग्य आहे, असे म्हणता येते. ह्या पार्श्वभूमीवर 'मराठी कादंबरीतील माणदेशाचे चित्रण' आता आपण पाहणार आहोत.

माणदेश हा एक प्रादेशिक विभाग आहे. त्याचे चित्रण मराठी कादंबऱ्यांमधून कसे येते, ते येथे पहावयाचे आहे. त्यातून माणदेशचित्रणाची सुरुवात मराठी कादंबरीत केव्हा झाली, एकूण मराठी कादंबरीच्या क्षेत्रात माणदेशचित्रणामुळे काही वेगळेपण आले काय, ह्या प्रश्नांची उत्तरे शोधावयाची आहेत.

## ५.२. मराठी कादंबरीची वाटचाल :

मराठीत ' कादंबरी ' हा वाङ्मयप्रकार इंग्रजीतून आला आहे. सुरुवातीच्या काळात कादंबरीचे स्वरुप भाषांतरित होते. 'यात्रिकक्रमण' (१८४१) ही हरी केशवजी पठारे ह्यांची पहिली भाषांतरित मराठी कादंबरी ठरते. सुरुवातीच्या काळातील कादंबरीत अद्‌भुतरम्यता असल्याचे दिसते. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे समाजात स्त्रीशिक्षण, बालविवाह, केशवपन, पुनर्विवाह इ. प्रश्नांवर चर्चा होण्यास सुरुवात झाली होती. ह्यातून मराठीतील पहिली स्वतंत्र व सामाजिक कादंबरी बाबा पद्‌मनजी ह्यांची 'यमुनापर्यटन' (१८५७) ही उदयास आली.

नंतर लक्ष्मणशास्त्री हळबे ह्यांची 'मुक्तामाला' (१८६१), म. वि. रहाळकर ह्यांची 'नारायणराव आणि गोदावरी' (१८७९) ह्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. परंतु ह्या कादंबऱ्या कल्पित गोष्टींवर अवलंबून असल्यामुळे रंजक बनल्या.

सुरुवातीच्या काळात मराठी कादंबरी ही रंजनप्रधान होती. सामाजिक समस्येविषयीचे अज्ञान व पुरुषी दृष्टिकोण ह्यामुळे ती तशी बनली असावी. ह्याविषयी नारो सदाशिव रिसबूड म्हणतात, ''मनोरंजनाचा हेतू ठेवून कोणत्याही ग्रंथास हात घातला म्हणजे अद्‌भुत गोष्टींच्या आपण कब्जात येतो.''[१] ह्यावरुन कादंबरीचा सुरुवातीचा काळ (इ.स. १८५७ ते १८८०) हा मनोरंजनाचाच असल्याचे दिसते.

हरिभाऊ आपटे ह्यांच्यापासून मात्र वास्तव कादंबरीलेखनाला चालना मिळाल्याचे दिसते. त्यांच्या 'मधली स्थिती'(१८८५), 'पण लक्षात कोण घेतो'(१८९०), 'वज्राघात'(१९१५) ह्या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीला वास्तवाच्या पातळीवर आणल्याचे दिसते. कादंबरीतून त्यांनी माणसाचे मन प्रगल्भ बनविण्यासाठी प्रयत्न केले. तसेच माणसाजवळ चांगले विचार निर्माण व्हावेत, ह्या दृष्टिकोणातून त्यांनी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. ह्याच काळात ना. ह. आपटे, वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, भा. वि. वरेरकर कादंबरीलेखन करीत होते. ह्या सर्वांवर आपटे ह्यांची छाप असल्याचे दिसते.

ह. ना. आपटे ह्यांच्यानंतर मराठी कादंबरीला वेगळे वळण लावण्याचे महत्त्वपूर्ण काम ना. सी. फडके ह्यांनी केल्याचे दिसते. त्यांच्या 'अल्ला हो अकबर'(१९१६), 'अटकेपार' (१९२५), 'जादूगार'(१९२८) ह्या कादंबऱ्या सुरुवातीच्या काळात खूपच लोकप्रिय ठरल्या. फडक्यांनी पांढरपेशा समाजातील स्त्री - पुरुषांच्या प्रेमकथा कादंबरीत मांडताना त्यातील व्यक्तिरेखांचे स्वभाव, वातावरण निर्मिती, कथानक, संवाद ह्या बाबींकडेही लक्ष दिले. तरुण स्त्री - पुरुषांच्या स्वप्नाळू वृत्तीची भूक फडक्यांनी भागविली. फडके हे कलावादी विचारसरणीचे लेखक होते.

फडके ह्यांच्या काळातच जीवनवादी विचारसरणीतून वि. स. खांडेकरांनी 'हृदयाची हाक'(१९३०), 'कांचनमृग'(१९३१), 'उल्का'(१९३४) ह्या कादंबऱ्या लिहिल्या. जीवनवादी भूमिकेतून ते 'खेड्याकडे चला' हा संदेश देताना दिसतात. नवोदित लेखकांवर त्यांचा प्रभाव पडलेला दिसतो, संस्कार झालेले दिसतात. म्हणूनच इ. स. १९२५ ते १९५० हा कालखंड फडके - खांडेकर कालखंड म्हणून ओळखला जातो.

ह्याच काळात ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांचे नाव एक यशस्वी कादंबरीकार म्हणून घेतले जाते. 'मुक्तात्मा'(१९३३), 'भंगलेले देऊळ'(१९३४) ह्या त्यांच्या राजकीय विषयांवरील कादंबऱ्यांनी खूप लोकप्रियता मिळविली. ह्या कालखंडात र. वा. दिघे ह्यांच्या

'पाणकळा'(१९३९) ने कादंबरी क्षेत्राला वेगळे परिमाण प्राप्त करुन दिले. ह्या कादंबरीनंतर ग्रामीण जीवनाचे आणि विशिष्ट प्रदेशाचे चित्रण करणाऱ्या प्रादेशिक कादंबऱ्यांचे युग उदयास आलेले दिसते.

अशा प्रकारे १९४५ पूर्वीच्या कादंबरीने एकीकडे ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श केला; तर दुसरीकडे गावातील कुणबी, मराठा, आदिवासी, कातकरी इ. च्या जीवनाचेही चित्रण केले. त्यातून स्वप्नरंजन आणि तत्त्वज्ञान, अद्‌भुतरम्यता ह्यांचा मुक्तहस्ताने वापर केला. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे चित्रण वास्तवदर्शी करण्याकडे कादंबरीकारांचे बरेचसे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

## ५.३. मराठी ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीची वाटचाल :

मराठीतील ग्रामीण व प्रादेशिक कथात्मक साहित्याच्या प्रारंभीच्या खुणा शोधताना महात्मा जोतीराव फुले ह्यांच्या पुस्तकाचा विचार करावा लागतो. इ. स. १८८५ पूर्व मराठी कथात्मक साहित्य हे प्रामुख्याने भाषांतरित व अद्‌भुततेने भरलेले होते. तसेच हा काळ वैचारिक जागृतीचा व सामाजिक आंदोलनाचाही होता. एकोणिसाव्या शतकात इंग्रजी शिक्षणामुळे नव्या जाणिवा रुजल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक सुधारणा ह्या गोष्टींचे भान बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबुवा ब्रम्हचारी, लोकहितवादी, आगरकर ह्या पिढीत आले होते. परंतु ही जाणीव फक्त मध्यमवर्गापुरतीच मर्यादित होती. त्यामुळेच ह्याचकाळात बहुजनांसाठी लिहिणाऱ्या म. फुले ह्यांचा विचार करावा लागतो.

महात्मा जोतीराव फुले ह्यांचे साहित्य वैचारिक होते. त्यात काही 'ग्रामीण' तेचे व 'प्रादेशिक' तेचे विशेष जाणवतात. त्यात शेतकऱ्यांच्या जीवनाकडे लक्ष, रांगडी भाषा, वास्तवाची जाण ह्यातून ग्रामीणत्वाच्या खुणा जाणवतात. त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' (१८८३) मध्ये दीनदुबळ्यांच्या अज्ञानाचे, दारिद्र्याचे, विषमतेचे आणि अवनत अवस्थेचे दर्शन घडवले आहे. त्यांच्या रांगड्या शब्दकलेचा येथे विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. शेतकऱ्यांची उघडी - नागडी मुले, त्यांचे जीवघेणे दारिद्र्य, लाचारी, दारिद्र्यामुळे उत्पन्न होणारी मलिनता, अंधश्रद्धा ह्या कारणांमुळेच फुल्यांनी शेतकऱ्यांविषयीचा आसूड हातामध्ये घेतला आहे. ग्रामीण व प्रादेशिक कथात्मक साहित्याच्या प्रारंभी महात्मा फुल्यांचे वेगळेपण अतिशय महत्त्वाचे मानावे लागेल. ह्याविषयी स. गं. मालशे म्हणतात, "'शेतकऱ्याचा आसूड' चा नावीण्यपूर्ण भाग म्हणजे शेतकऱ्याच्या अवनत स्थितीचे वास्तव चित्र, त्या अवनत

स्थितीची केलेली मूलग्राही चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यास्तव सुचवलेली उपाययोजना हा होय. शेतकऱ्याच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्याच्या हीनदीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे, ते एखाद्या ग्रामीण वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे."[२] कृष्णराव भालेकर ह्यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी वाचताना त्यावर फुल्यांची छाप असल्याचे जाणवते.

कृष्णराव भालेकर ह्यांची 'बळीबा पाटील' (१८८८) ही ग्रामीण कादंबरी छोटेखानी असली, तरी तिला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येणार नाही. कारण ही कादंबरी फक्त इ.स. १८७७ च्या दुष्काळाचे वर्णन करण्याकरिता ग्रामीण पार्श्वभूमी वापरुन प्रचारासाठी लिहिलेली आहे. ह्यासंदर्भात सीताराम रायकर म्हणतात, "बाळासाहेब, रावसाहेब, दौलतराव, मैनाबाई हे भालेकरांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतात..... भालेकरांनी आपल्या शेतकऱ्यांच्या स्थितीविषयीचे त्यांची दु:खे दूर करण्यासाठी काय केले पाहिजे, याविषयीचे विचार मांडण्यासाठी पात्रे, संवाद, प्रसंग व ग्रामीण पार्श्वभूमी वापरुन प्रचारकी हेतू प्रधान मानून लिहिलेली ही कादंबरी आहे."[३] परंतु मराठीतील ग्रामीण कादंबरीलेखनाचा हा प्रयत्न त्याकाळात महत्त्वाचा मानावा लागेल.

खऱ्या अर्थाने आनंद यादव ह्यांनी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून रा. वि. टिकेकर ऊर्फ धनुर्धारी ह्यांची 'पिराजी पाटील' (१९०३) ही मानली.[४] ह्यामध्ये एका दुष्काळग्रस्त शेतकऱ्याची कर्मकहाणी कादंबरीकाराने मांडली आहे. खऱ्या अर्थाने ग्रामीण वास्तवाचा वेध घेणारी ही कलाकृती आहे, असे वाटते. दुष्काळामुळे खेड्यातील लोकांचे होणारे हाल, गावातील लोकांचे परस्परसंबंध, अन्नासाठी करावे लागणारे देशाटन ह्या गोष्टी मनाचा वेध घेतात.

मराठी ग्रामीण साहित्याचा वेध घेताना. इ. स. १९२० नंतरच्या काळाचा विचार करावा लागतो. महात्मा गांधीजींचा 'खेड्याकडे चला' हा संदेश राजकीय हेतूने प्रेरित असला, तरी त्यातून सामाजिक आशयही व्यक्त होतो. त्या काळातील ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जीवन रंगवण्यास सुरुवात केली होती. ह्याविषयीची प्रेरणा सांगताना आनंद यादव म्हणतात, "... त्यावेळी प्रभावी असलेल्या गांधीजी वाद व साम्यवाद या दोन प्रेरणांनी जानपद कादंबरी प्रेरित झालेली दिसते."[५] ह्यावरुन १९२० नंतर ग्रामीण कादंबरी ग्रामोद्धाराच्या प्रेरणेतून लिहिली जाऊ लागली, हे तथ्य स्वीकारावे लागेल.

ह्या काळात प्रामुख्याने ना. वि. कुलकर्णी ह्यांची 'कसे दिवस जातील' (१९२५) ह्या कादंबरीत दुष्काळ, शेतसारा, कर्ज ह्या कारणांमुळे शेतकरी कुटुंबाची होणारी वाताहत दिसून येते. प्र. ह. खाडिलकर ह्यांची 'स्वाधीन संसार' (१९२७) ह्या कादंबरीत खेड्याचा विकास कसा होईल, ह्याविषयी चित्रण करण्याचा प्रयत्न दिसतो. भा. वि. वरेरकर ह्यांच्या 'सात लाखातील एक' (१९३०) ह्या कादंबरीत ग्रामीण भागातील अंधश्रद्धा कशी जोपासली जाते, हे सांगितले आहे. 'कसे दिवस जातील' ही कर्जामुळे स्वतःची शेती घालवून बसलेल्या आबाची कहाणी आहे. तो पोटासाठी मुंबईला जातो. तेथे त्याची मुले अपप्रवृत्तीला लागतात. आबाही अधिकच कर्जबाजारी व व्यसनी होतो. आबाची बायको स्वतःचे चारित्र्य जपते. 'मोहित्यांची मंजुळा' (१९३१) ही रामतनय ह्यांची कादंबरी ह्या काळात महत्त्वाची वाटते. 'मंजुळा' ही व्यक्तिरेखा केंद्रस्थानी आहे. तिचे जबरदस्तीने गावातील पाटलाशी लग्न ठरवण्यात येते. गावातील पाटील गावातील प्रत्येक घटनेच्या मुळाशी असतो, हे ग्रामीण सत्य ह्या कादंबरीतून उलगडलेले दिसते. ह्या कादंबरीवर महात्मा फुले ह्यांच्या सत्यशोधक चळवळीचा परिणाम झालेला जाणवतो.

'श्यामची आई' (१९३५) ही सानेगुरुजींची ह्या काळातील ग्रामीण कादंबरी आहे. आदर्श मातेची व्यक्तिरेखा म्हणून श्यामच्या आईची उभारणी सानेगुरुजींनी केली आहे. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा संस्काराची श्रीमंती महत्त्वाची असते, हेच ह्यातून दाखविले आहे. तसेच ग्रामीण वातावरण, गावातील माणसांचे एकमेकांशी असणारे संबंध ह्याचेही सूक्ष्म चित्रण ह्यात आहे.

एकंदरीत, मराठी ग्रामीण कादंबरीची सुरुवात ते इ.स. १९४० पर्यंतचा विचार करता मराठी ग्रामीण कथात्मक साहित्यात वैचारिकतेची व अद्भुततेची आंदोलने निर्माण झालेली दिसतात. तसेच 'बळीबा पाटील' व 'पिराजी पाटील' ह्या दोन्ही कादंबऱ्यांवर महात्मा फुले ह्यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. ना. वि. कुलकर्णी ह्यांच्या कादंबरीवर म. फुले ह्यांच्याबरोबरच गांधीजी ह्याचाही प्रभाव जाणवतो. तात्पर्य, ग्रामवादाच्या दृष्टीने झालेले ह्या काळातील हे सर्व कादंबरी लेखन हे वरवरची मलमपट्टी वाटते. तरीही ग्रामीण समाजजीवनाच्या वास्तवचित्रणासाठी ह्या काळातील ग्रामीण कादंबरी लिहिली जात होती, हा आविष्कार निश्चित त्या काळाच्या कसोटीवर वेगळा वाटतो.

ग्रामीण कादंबरीची इ. स. १९४० नंतरची वाटचाल पाहता र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, बा. सी. मर्ढेकर, श्री. म. माटे, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, वामनराव चोरघडे,

विभावरी शिरुरकर, द. र. कवठेकर आणि व्यंकटेश माडगूळकर ह्या क्रमाने मराठी कादंबरीकारांचा विचार करावा लागतो.

र. वा. दिघे ह्यांची 'पाणकळा' (१९३९) प्रकाशित झाली. त्यामुळे मराठी वाचकाला आनंद झाला. ह्या काळात प्रादेशिक जीवनाबद्दल जे कादंबरीकार लिहीत होते, त्यांच्याविषयी ल. ग. जोग म्हणतात, "एका नव्या सोन्याच्या खाणीचा शोध लागला."[६] दिघे हे स्वतःला ग्रामीण किंवा प्रादेशिक कादंबरीकार म्हणवून घेण्यास तयार नव्हते. जयवंत दळवींना दिलेल्या मुलाखतीमध्ये 'माझं आजवरचं साहित्यसुद्धा मी शेतात झाडाच्या सावलीखाली बसून लिहिलेलं आहे.... मी खरा शेतकरी कादंबरीकार आहे', असे त्यांनी म्हटले आहे.[७] 'पाणकळा' (१९३९) मध्ये भुजबा व रंभाजी ह्यांचे संघर्षचित्रण येते. त्याच जोडीला राया आणि सोनी ह्यांचे प्रेमप्रकरण ह्या संघर्षाला वेगळेपण प्राप्त करुन देते. भागवतधर्माचे संस्कार पचवलेला भुजबा एक शेतकरी आहे. शेतकऱ्याचे निसर्गावर असलंबून असणारे जीवन, सावकारी पाश, दुष्काळ, दारिद्रय, वैमनस्ये, त्यातील संघर्ष इ. चित्रणातून ग्रामीण जीवनाची वास्तवता जाणवते. ह्याच सुमारास दिघ्यांची 'सराई' (१९४३) ही ग्रामीण कादंबरी प्रकाशित झाली. तीही लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली. रानसई या सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या कोकणातील खेड्याची ही कथा आहे. ह्यातील मनोहर - लाडी ह्यांची प्रेमकथा वास्तव वाटते. ग्रामीण जीवनातील वास्तवता व कल्पनारम्य कथानक ह्यांची सांगड ह्यामध्ये आहे. नंतर दिघ्यांनी 'रानजाई' (१९४६), 'गानलुब्धा मृगनयना' (१९४७), 'आई आहे शेतात' (१९५६), 'पड रे पाण्या' (१९५८) ह्या कादंबऱ्या लिहिल्या.

ग्रामीण कादंबरी म्हणून ग. ल. ठोकळ ह्यांच्या 'गावगुंड' (१९४६) कादंबरीला खूपच लोकप्रियता मिळाली. कारण ह्या कादंबरीला १९४२ च्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. ह्यात गुणाजी आणि जयवंत ह्या दोन भावांची रोमहर्षक कथा आहे. जयवंत - लीला ह्यांची प्रेमकथाही मनोरंजनाच्या दृष्टीने चांगली वाटते.

ह्याच सुमारास बा.सी. मर्ढेकर ह्यांची 'तांबडी माती' (१९४३), बी रघुनाथ ह्यांची 'आडगावचे चौधरी'(१९५४), 'बाबू दडके'(१९४४), वि. द. चिंदरकर ह्यांची 'महापूर'(१९४२), ना. के. महाजन ह्यांची 'किसान'(१९४६), म. भा. भोसले ह्यांची 'समरांगण' (१९४१), 'उघड्या जगात' (१९४७) ह्या ग्रामीण कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. बा. सी. मर्ढेकरांच्या 'तांबडी माती' (१९४३) ह्या ग्रामीण कादंबरीत युद्धकालीन वातावरण चित्रित केले आहे. ह्यातील शिवा व कोंडिबा ह्यांच्यासारखी सामान्य माणसेच देशासाठी त्याग

करु शकतात, हे दाखवून दिले आहे. ह्यातून ग्रामीण निष्ठा व्यक्त केल्या आहेत. दुसऱ्या महायुद्धाचे शेतकऱ्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम होतात. अ. ना. देशपांडे ह्याविषयी म्हणतात, ''प्रतिपाद्य विषयाला यथान्याय उठाव देण्याच्या दृष्टीने या कादंबरीचे सामर्थ्य अपुरे पडत असले, तरी एवढे मात्र खरे की, खेडुतांच्या जीवनाचे सहदयतेने व परिणामकारक रीतीने चित्रण करण्यात लेखकाला कौतुकास्पद यश मिळालेले आहे.''[८] ग्रामीण वास्तवाच्या अगदी जवळ जाणारी कादंबरी म्हणून ह्या कालखंडातील चिंदरकरांच्या 'महापूर' (१९४३) चा उल्लेख करावा लागेल. महादेव ठाकूर हे ग्रामोद्धाराच्या प्रेरणेने मुंबईतून खेड्यात येतात. परंतु त्यांच्या मुलांना खेड्यातील समस्या समजत नाहीत. शेतकरी व ठाकूर ह्यांच्यातील वैचारिक मतभेद उघड होतात. एकूणच शेतकऱ्यांच्या हलाखीचे वास्तवपूर्ण चित्र ह्या कादंबरीत दिसून येते.

एकंदरीत, ह्या काळातील ग्रामीण कादंबरीत ग्रामीण जीवनचित्रण थोडे आलेले दिसते. बरेचसे कथानक कृत्रिम व काल्पनिक वाटते. युद्धकाळातील सामाजिक अधोगतीचे चित्र ठळकपणे प्रत्ययास येते. ('म्हणे लढाई संपली'- १९४६) तसेच ह्या काळातील ग्रामीण कादंबरीकार मध्यमवर्गीय किंवा पांढरपेशा समाजाला सोडून तळागाळातील समाजचित्रण करु लागले, हा महत्त्वपूर्ण बदल जाणवतो.

साधारणपणे हा कालखंड महायुद्धाचा व स्वातंत्र्य चळवळीचा असल्यामुळे त्याचा परिणाम ग्रामीण जीवनावर झालेला दिसून येतो. त्यामुळेच बराचसा दुर्लक्षित राहिलेला ग्रामीण समाज कादंबरीसारख्या साहित्यात दिसू लागला. त्यातून ग्रामीण कादंबरीचे आशयसूत्र व्यापक झाल्याचे दिसते. ह्याचे चांगले रुप म्हणून आपल्याला विभावरी शिरुरकरांच्या 'बळी' (१९५०) ह्या कादंबरीकडे पहावे लागेल. 'बळी' (१९५०) ह्या कादंबरीत मांगगारुडी समाजाच्या जीवनाचे चित्रण आलेले आहे. मांगगारुडी समाजातील सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचेही काम ह्या कादंबरीने केले आहे. आबा हा ह्या कादंबरीचा नायक. तो नवमतवादी विचारसरणीचा आहे. तो स्वातंत्र्य चळवळीत सामील होतो. स्वातंत्र्यानंतर आपल्या समाजाला चांगले दिवस येतील म्हणून तो आशावादी असतो. परंतु आबाचं ह्यात उपरा ठरतो. ह्या कादंबरीतील जीवनचित्रण व व्यक्तिरेखा ग्रामीण असल्यामुळे तिचा उल्लेख ग्रामीण कादंबरी म्हणून केलेला आहे. वास्तव जीवनचित्रण व रांगडी भाषा -ही ह्या कादंबरीची वैशिष्ट्ये जाणवतात.

तात्पर्य, ह्या काळातील कादंबरी आशयसूत्रांच्या दृष्टीने विस्तारली असली, तरी तिच्या पाठीमागील गांधीवादाच्या प्रेरणांचा ऱ्हास झालेला दिसतो. ह्याचकाळात खऱ्या अर्थाने जीवनशोधाची प्रेरणा तयार झालेली दिसते. तसेच ह्या काळातील ग्रामीण कादंबरीकारांवरती फडके - खांडेकर ह्यांच्या लेखनाचा प्रभावही जाणवतो. त्यामुळे ग्रामीणतेच्या दृष्टीने ह्या काळातील कादंबऱ्या समाधान देत नाहीत. तसेच 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' ह्या संकल्पना १९३१ पासून वापरल्या जात असल्या तरी त्या पुरेशा स्पष्ट झालेल्या नव्हत्या. ही संभ्रमावस्था श्री. ना. पेंडसे ह्यांच्यापर्यंत जाणवते.

ह्याच दरम्यान श्री. म. माटे ह्यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' (१९४१) हा कथासंग्रह प्रकाशित झाला. त्यात त्यांनी महार, मांग, चांभार अशा उपेक्षित समजल्या जाणाऱ्या समाजाचे चित्रण केलेले आहे. श्री. म. माटे ह्यांना ''ग्रामीण कथेचे अग्रदूत' असे म्हटले जाते. ह्यासंदर्भात अंबादास माडगूळकर व सूर्यकांत खांडेकर ह्यांचे मत विचारात घ्यावे लागेल. ते म्हणतात, ''ग्रामीण कथावाङ्मयात माटेंचे सर्वोच्च स्थान नाकारता येणार नाही. ज्यांचे चित्रण मराठीत अजून व्हायचे आहे, असा फार मोठा भाग अजून शिल्लक आहे, हे माट्यांनंतर मराठी ललित लेखकांस समजून आले. जीवनातील अगदी खालचे स्तर माट्यांनी सहानुभूतीने रंगवले आहेत. महार, मांग, फिरस्ते, कष्टकरी यांची चित्रणे त्यांनी बव्हंशाने केलेली आढळतात.''[१] ह्यावरुन तत्कालीन ग्रामीण कादंबरीकारांनाही अशा उपेक्षित जीवनशोधाची प्रेरणा मिळाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही संपूर्ण पार्श्वभूमी डोळ्यासमोर ठेवूनच आपल्याला पुढील कालखंडातील श्री. ना. पेंडसे, गो. नी.दांडेकर, वामन कृष्ण चोरघडे, द. र. कवठेकर, व्यंकटेश माडगूळकर ह्यांचे ग्रामीण कादंबरीलेखन पहावे लागेल.

साधारणपणे इ. स १९४५-५० हा कालखंड मराठी साहित्यात नवजागृतीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. दुसऱ्या महायुद्धाचे वातावरण आणि स्वतःचे अस्तित्व हरवलेली मानसिकता ह्यामधून निराश बनलेल्या मनाची चित्रणे मराठी साहित्यातून त्यावेळी उमटू लागली होती. ह्या बदलामुळे आशय आणि अभिव्यक्ती ह्या दोन्ही पातळ्यांवर बदल जाणवतो. कादंबरीही ह्याला अपवाद नव्हती. तिच्या सवभावधर्मानुसार ती समाजजीवनाच्या अधिक जवळ गेलेली दिसते. प्रादेशिकतेच्या अंगानेही ती ह्याच काळतत विस्तारली गेली. ह्या अनुषंगाने पेंडसे, दांडेकर, माडगूळकर ह्यांचे साहित्य पहावे लागते. ह्या साहित्यिकांचा प्रभाव तत्कालीन कादंबरीकारांवर पडलेला दिसतो.

श्री. ना. पेंडसे ह्यांच्या 'एल्गार'(१९४९), 'हद्दपार'(१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२), 'रथचक्र'(१९६२) ह्या ग्रामीण कादंबऱ्यामधून एका विशिष्ट प्रदेशाचे, तेथील निसर्गाचे, मानवी जीवनाचे सलग चित्रण आलेले दिसते. म्हणून पेंडसे ह्यांना प्रादेशिक कादंबरीकार म्हटले जाते. 'एल्गार' (१९४९) मध्ये रघू आणि कादर ह्या भिन्नधर्मीय मित्रांची कथा आहे. परंतु राजकीय संघर्षामुळे गावात हिंदू - मुस्लीम संघर्ष पेटतो. कादर मुस्लीम असल्यामुळे आपल्या बांधवांची बाजू घेतो, तर रघू कादरच्या कुटुंबियांना आश्रय देतो. 'हद्दपार' (१९५०) मध्ये राजेमास्तरांची जीवनकहाणी आलेली आहे. मास्तरांनी मुलांवर चांगले संस्कार केले. पण त्यांच्या स्वतःचा मुलगाच पाणक्याची मुलगी घरात आणतो. येथे मास्तर हा धक्का सहन न झाल्यामुळे आत्महत्या करतात. पेंडशांनी करारी, आदर्श मास्तरांची व्यक्तिरेखा रेखाटली आहे. 'गारंबीचा बापू' (१९५२) मध्ये अनैतिक संबंधातून जन्मलेल्या बापूची रंजक कथा ग्रामीण पार्श्वभूमी वापरुन लिहिलेली दिसते. हॉटेलवाल्या रावजीची बायको राधा बापूपेक्षा वयाने मोठी असताना रावजी मेल्यानंतर तिच्याशी बापू लग्न करतो. परंतु ह्याविषयी गो. मा. पवारांचे मत विचारात घ्यावे लागते. ते म्हणतात, ''वास्तवाचे चित्रण करणारी ही एक कलात्मक कादंबरी आहे, असा चकवा निर्माण करण्यात ती बरीचशी यशस्वी ठरली. तिने वास्तव जीवनाचा फुटकळ तपशील आकर्षकपणे पुरवला; परंतु गाभा मात्र स्वप्नरंजनाचाच ठेवला.''[१०] 'रथचक्र' (१९६२) ही कोकणातील ब्राह्मण कुटुंबातील जुन्या वळणाच्या मध्यमवर्गीय स्त्रीची शोकांत कहाणी आहे. ह्यामध्ये त्या स्त्रीच्या मनातील ताण-तणावांचे अनेक पदर कादंबरीकाराने ताकदीने उलगडले आहेत. त्यामुळे पेंडशांची ही प्रादेशिक कादंबरी इतर कादंबऱ्यांपेक्षा महत्त्वाची वाटते.

गो. नी. दांडेकरांच्या 'शितू' (१९५३), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५५), 'पडघवली' (१९५५), 'माचीवरला बुधा'(१९५८), 'पूर्णामायची लेकरं'(१९५८) ह्या प्रादेशिक कादंबऱ्यामधून प्रदेश आणि माणूस ह्यांचे अतूट नाते असलेले जाणवते. भारतीय संस्कृतीने निर्माण केलेल्या मूल्यांवर, त्यातील संस्कारावर श्रद्धा असणारे कादंबरीकार म्हणूनच गो. नी. दांडेकर ह्यांना ओळखले जाते. 'शितू' ह्या प्रादेशिक कादंबरीत शितू ही एक बालविधवा ह्या कादंबरीची नायिका आहे. जमीनदार अप्पा खोत तिला आश्रय देतात, तिचे लग्न करतात. परंतु नवरा मरतो. तिला पांढऱ्या पायाची ठरवले जाते. परंपरावादी समाजव्यवस्थेची शितू बळी ठरते. ह्याविषयी र. बा. मंचरकर म्हणतात, ''सात्त्विक, सोशीक बालविधवा शितू आणि बेदरकार, परंतु अंतर्यामी प्रेमळ विसू यांच्या विफल प्रीतीची ही करुणोदात्त शोककथा

आहे."[११] हा अभिप्राय अगदी नेमका म्हणावा वाटतो. 'पडघवली' ह्या प्रादेशिक कादंबरीत औद्योगिकरणाने उध्वस्त होणाऱ्या खेड्याचे चित्रण आलेले आहे. 'पडघवली' मधील माणसांचे सामाजिक संबंध परंपरांनी नियंत्रित केलेले आहेत. (अद्‌भूतकथा, भुते, तंत्र-मंत्र, निसर्ग) 'पवनाकाठचा धोंडी' मध्ये पूर्वदिव्यपूजा नाकारणाऱ्या धोंडीची धाडसी कथा ग्रामीण कलंदर माणसाच्या स्वभावाचा वेध घेते. 'पूर्णामायची लेकरं' ही रुढीपरंपरांनी जखडलेल्या सरळ सुस्वभावी माणसांची ग्रामीण कथा आहे. ह्यात ग्रामीण-प्रादेशिक मानसिकतेचा मागोवा अचूकपणाने घेतलेला दिसतो.

ह्याचकाळात दा. गो. बोरसे ह्यांची 'अजिंठ्याचे लेणे - जीभाऊ' ही खानदेशी माणसाने स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही जुलमी रझाकारी सत्तेशी दिलेल्या संघर्षाची कथा आहे. ह. श्री. शेणोलीकर ह्यांची 'मायणीची मंजुळा' (१९५९) ह्या कादंबरीत माणदेशातील प्रेमकथा वेधकपणे मांडलेली दिसते. परंतु खऱ्या अर्थाने मराठी नवकथाकार म्हणून स्थान मिळवलेल्या व्यंकटेश माडगूळकरांनी ह्याच काळात 'बनगरवाडी' (१९५५) लिहून प्रादेशिकतेचा खरा स्पर्श मराठी ग्रामीण साहित्याला घडवलेला दिसतो. मराठी कादंबरीत येथून पुढे माणदेशाचे चित्रण आलेले दिसते. वरील पार्श्वभूमीचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व मराठी कादंबरीवाङ्मयातून माणदेशाचे चित्रण आलेले दिसत नाही.

एकंदरीत, इ.स. १९४० ते १९६० ह्या काळात नवसाहित्याच्या बरोबरीने ग्रामीण - प्रादेशिक कादंबरीत ग्रामीण - प्रादेशिक वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न ठळकपणे दिसून येतो. ह्यात प्रामुख्याने पेंडसे, दांडेकर व माडगूळकर ह्यांच्या अनुक्रमे 'गारंबीचा बापू', 'शितू', 'बनगरवाडी' ह्या कादंबऱ्यांनी महत्त्वाची भर घातलेली दिसते.

वरील सर्व पार्श्वभूमीचा विचार करता हे स्पष्ट होते की, मराठी कथात्मक साहित्यात सुरुवातीला माणदेशाचे चित्रण व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' (१९५५) कादंबरीत आलेले आहे.

## ५.४. ग. दि. माडगूळकर ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण :

ग. दि. माडगूळकर ह्यांच्या जीवनाविषयीची माहिती मागील प्रकरणात आलेली आहे. त्यांच्या दोन कादंबऱ्यामधून माणदेशाचे चित्रण आलेले आहे. 'आकाशाची फळे' (१९६०) व 'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या त्या दोन कादंबऱ्या होत. ह्या दोन्ही कादंबऱ्या माणदेशी ग्रामीण जीवनावर आहेत.

ग. दि. माडगूळकरांची पहिली कादंबरी इ.स. १९६० मध्ये प्रकाशित झाली, तेव्हा मराठी साहित्यसृष्टीत ग्रामीण साहित्याने चांगले स्थान प्राप्त केले होते. त्यांचे समकालीन म्हणून श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, आनंद यादव ह्यांच्या ग्रामीण साहित्याकडे पाहता येईल. पेंडसे ह्यांच्या कादंबरीत उत्तर कोकणचा प्रदेश येत होता. माणदेशातील प्रादेशिक चित्रण व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबरीत येत होते. माणदेशाबरोबरच पश्चिम महाराष्ट्रातील दलित जीवनाचे चित्रण खरातांच्या कादंबरीतून येत होते. कोल्हापूर परिसराचे चित्रण यादवांच्या कादंबरीतून येत होते. अशा समकालीनांच्या साहित्यकृतीबरोबरच गदिमांची माणदेशी कादंबरी वाचकांपुढे आलेली दिसते.

गदिमांच्या दोन्ही कादंबऱ्यांमधील वातावरण आणि परिसर ग्रामीण आहे. 'आकाशाची फळे' (१९६०) ह्या कादंबरीत विठोबा कुंभाराच्या आयुष्याची आणि संसाराची कर्जाने आणि वाढत जाणाऱ्या संततीने होणारी दुर्दशा आहे. मुले म्हणजे परमेश्वराने दिलेली 'आकाशाची फळे' अशी ह्या कादंबरीची शीर्षक कल्पना आहे. माणदेशात स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू म्हणूनच पुष्कळदा पाहिले जाते. त्यामुळे शंकर व चंपा ह्यांच्या प्रणयवर्णनात अद्भुतरम्यता आलेली दिसते. गदिमांच्या समकालीनांचा प्रभावही ह्या रंजनवादात दिसून येतो. तरीही ह्या कादंबरीला माणदेशी मातीची एक बैठक आहे, त्यामुळेच, त्यात वास्तवजीवन आलेले दिसते. वास्तवजीवनात पोटाच्या भुकेचा प्रश्न त्यांनी हाताळलेला दिसतो, हा त्यांचा विशेष आहे. अन्नाची भूक ही शारीरिक भुकेपेक्षा तीव्र असते. शारीरिक कामक्षुधेची भूक नियंत्रणात ठेवता येते. पण अन्नाची भूक नियंत्रणात ठेवता येत नाही. म्हणूनच विठोबाच्या संसाराची धूळधाण होते. ह्याविषयी वा. ल. कुलकर्णी म्हणतात, ''माणसाच्या क्षुधेचा आणि क्षुधातृप्तीचा अनुभव खऱ्याखुऱ्या अर्थाने कलात्मक होऊ शकत नाही, या जाणिवामुळे जगात 'भूक' हा विषय फारच थोड्या कलाकृतींच्या वाट्याला का आला आहे, हे त्यावरुन लक्षात येते. 'भूक' हा विषय मध्यवर्ती ठेवून कादंबरी लिहिण्याचा माडगूळकरांचा हा प्रयत्न म्हणूनच लक्षणीय ठरतो.''[१२]

'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या माणदेशी कादंबरीत सर्व धागे जुळवूनही वस्त्र न झालेल्या सखू चोथीणीच्या विफल जीवनाची कहाणी आहे. सखूला रघुनाथ आणि जगन्नाथ ही दोन मुले असतात. थंड डोक्याच्या रघूशी इंद्राचा विवाह होतो. परंतु इंद्राच्या शारीरिक भावना रघुकडून पूर्ण न झाल्यामुळे ती पळून जाते. रघूला सर्वजण 'हणगोबा' म्हणतात. कारण रघूच्या थंडपणाने तिची वासनाच शमत नाही. सखू इंद्राचा शोध घेऊन तिचे मंगळसूत्र तोडून

आणते.तिच्याशी असलेले सर्व संबंध तोडते. जगू शिक्षण घेतो, पण तोही घसरतो. पिलू नायकिणीच्या रेणुका नावाच्या मुलीशी त्याचा संबंध येतो. जगूची आई भावाच्या कुरुप किष्णीबरोबर लग्न ठरविते. ती जगूला पसंत नसते. आईच्या आग्रहाखातर लग्न करतो. परंतु तिच्याशी शारीरिक संबंध ठेवत नाही. पुण्यात येऊन लहानपणीच्या अप्पा कोशीकर ह्या मित्राच्या मदतीने आकाशवाणीवर नोकरी लागतो. लग्नाशिवाय एक बाईला ठेवतो. त्यालाही सुख मिळत नाही. अशी ही माणदेशी शोकांत कहाणी आहे. आयुष्याचे वस्त्र उभे आडवे धागे जुळवूनही विणले जात नाही.

## ५.४.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

ग. दि. माडगूळकरांच्या कादंबरीत माडगूळचे वर्णन तेथील प्रादेशिक तपशिलांसह आलेले आहे. त्यात गावाचे शिवालय, बिरोबा माळ, करंज ओढा, निर्गुडीचे गचपण, ढांगुळा वड, निवडुंग ह्यांचा अंतर्भाव आहे. सखू चोथीण पाचवडीहून सांगोला, पंढरपूर ह्या गावांना घोड्यावरुन बाजारला जाते, हा उल्लेख त्याचाच एक भाग आहे. माडगूळकरांनी आपले नाव एका कल्पित व्यक्तिरेखेशी जोडून सुरुवातीला थोडे आत्मनिवेदन केले आहे. जगन्नाथ म्हणतो, "आमच्या मुलखात पावसाची रडच. मृग नक्षत्राचे चार थेंब पडले. दगड भिजव्या पाऊस !" (पृ. ७६) हा कमी पावसाचा उल्लेख माणदेशाच्या संदर्भातील होय. ग्रामीण जीवनात निसर्गाला असाधारण महत्त्व आहे. कारण हा निसर्गच ग्रामीण जीवनाला आकार देत असतो. ग्रामीण जीवनातील व्यक्तिमने ही तर ह्या निसर्गाचीच अपत्ये असतात. त्यातून विशिष्ट प्रदेशाची ओळख निर्माण व्हावी, हा हेतू असतो. माडगूळकरांपूर्वी जे ग्रामीण साहित्यिक लेखन करीत होते, त्यांनी केलेले निसर्गचित्रण हे कलाकृतींशी एकजीव झाल्याचे दिसत नाही. त्यात कृत्रिमता जाणवते. ह्याविषयी द. ता. भोसले म्हणतात, "वास्तविक पाहता निसर्गातूनच ग्रामीण अनुभव व्यक्त व्हायला हवा ; पण त्यांच्या साहित्यात निसर्ग आला तो पार्श्वभूमी म्हणून, अलंकार बनून, परिणामद्रव्याचे रुप घेऊन मूलद्रव्य म्हणून आलेला नाहीच. म्हणून तो आपणाला ढोबळ आणि आवरणशील वाटतो; सर्जनशील वाटत नाही."[१३] भोसले ह्यांचे हे मत योग्य वाटते. कारण माडगूळकरांच्या कादंबरीतील निसर्ग हा व्यक्ती आणि निसर्ग, निसर्ग आणि ग्रामजीवन असा संबंध व्यक्त करतो.

माडगूळचा परिसर, तेथील समाजाचे दारिद्रय ह्यामधून त्याठिकाणची भौगोलिकता उलगडत रहाते. 'आकाशाची फळे' (१९६०) मध्ये आलेले पुढील वर्णन पहा : "काळ्या

रानांतला चिखल अजून सुकला नव्हता. हिरवीगार ज्वारीची धाटे गुडघाभर वर आली होती. बांध धरुन तो कष्टाने चालू लागला. बांधावर माजलेल्या हरळीत चिखलाने माखलेले त्याचे बूट घसरू लागले. वाटेत आडव्या आलेल्या एका पलाणीवरुन तो अलगद पलीकडे गेला." (पृ. ७०). ह्या वर्णनावरुन माणदेशातील ज्वारी हे पीक महत्त्वाचे असल्याचे दिसते.

माडगूळकर जेव्हा माडगूळच्या प्रदेशासंबंधी काही तपशील देतात, तेव्हा धाब्याची माळवदे, देवळे, महारवाडा, ओढे, निवडुंग ह्यांचे वर्णन येते. 'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या माणदेशी कादंबरीतील जगू - रेणू भेट अशीच एका देवळामागे होते. पहाः

"उभ्या गावात एकही कौलारु घर नव्हते. सारी घरे धाब्याची माळवदी. त्या माळवदावरसुद्धा भरमसाट चिमणचारा उगवून, वाळलेला. आम्ही तसल्या माळवदावर जात असू. सराटे टोचून टोचून, टाचा - पावलांची चाळण व्हायची." (पृ. ९) ह्यावरुन माणदेशात जी घरे आहेत. ती धाब्याची असल्याचे दिसून येते. तसेच सराटे नावाची काटेरी वेलही तेथे असल्याचे दिसून येते. तेथे असणारा निसर्गसुद्धा इतर प्रदेशापेक्षा वेगळा जाणवतो.

"गावात आणि गावाबाहेर झाडे होती ती कडुनिंबाची, बाभळीची. कुठे एखादा शेवगा, लिंबारा, नाहीतर हादगा, ओढ्याकाठी करंजाड, निवडुंग. गावठाण आणि रस्ता यांच्यामध्ये फड्या निवडुंगाचे दाट गचपण होते." (पृ. ९) ह्यावरुन माणदेशात कडुनिंब आणि बाभळ ही दोन झाडे मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. तसेच माणदेशातील शेती ही हलक्या प्रतीची आणि पावसावर अवलंबून असलेली दिसते. त्यासंबंधीचे वर्णन पहा : "जमिनीचा मगदूर हलका. पावसापाण्याची बोंब. वर्षातून दहापंधरा इंच पडला, तरी हरोम् हर. पाऊस पडावा म्हणून दरवर्षी मल्लेश्वराचा गाभारा पाण्याने भरुन, त्याची पिंड बुडवावी लागायची. ओढा तर आठ महिने कोरडाच. गल्ल्यागल्ल्यातली पोरे ओढ्याच्या वाळूचा उपयोग आखाड्यासारखा करायची. पावसाचे एवढे दुर्भिक्ष पण प्यायच्या पाण्याची पंचाईत मात्र कधी पडायची नाही." (पृ. १४) ह्यावरुन माणदेशात हलक्या प्रतीची जमीन असल्याचे दिसून येते. पावसाळा हा लहरी असल्यामुळे माणदेशातील माणूस दैववादी व अंधश्रद्ध बनल्याचेही दिसून येते.

'उभे धागेः आडवे धागे' (१९७२) मध्ये माडगूळ प्रदेशातील जातिभेदाबरोबरच तेथील परिस्थितीने नाडलेली माणसे समोर येतात. पहाः "तांबड्या मारुतीच्या देवळामागे म्हारवाडा. तिथे राहणारी माणसे दबलेली. लाचार गावकीच्या घोळात त्यांना काहीही किमंत

नव्हती.'' (पृ. १२) अलीकडच्या काळात माणदेशाच्या परिसरात वेगाने बदल होताना दिसतो. पहा: ''अिनामदार घराण्यात जन्मलेल्या माणसाच्या दैवी फेरीवाल्याचा धंदा यावा, हा काळाचा प्रभाव होता.'' (पृ. १७३) ह्या वर्णनावरुन बदलत्या युगाची नोंदही माडगूळकर घेताना दिसतात.

वरील सर्व विवेचनावरुन ग. दि. माडगूळकरांनी माणदेशाचे वास्तव भौगोलिक चित्रण केलेले दिसून येते.

### ५.४.२. माणदेशाचे सामाजिक व सांस्कृतिक चित्रण :

'आकाशाची फळे' (१९६०) ही माणदेशी कादंबरी ग्रामीण परिसराच्या पार्श्वभूमीवर खेड्यातील माणसांच्या जीवनाचे चित्रण करणारी आहे. त्यात लोकधारणा, समजुती, परंपरा ह्यांचे जतन करण्याची प्रवृत्ती व दारिद्र्य, अज्ञान, भ्रामक कल्पना ह्यांनी गांजलेल्या कुंभार समाजातील माणसें ह्यांचे चित्रण आलेले आहे. माणदेशातील सततच्या दुष्काळामुळे विठोबा कुंभाराच्या संसाराची वाताहत होते. विठोबा कुंभाराच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी पारू, त्याचा लहान भाऊ शंकर व विठोबाची सहा मुले ह्यांच्याभोवती ही कहाणी फिरत राहते. ह्या कादंबरीतील माणसे जीवनात व व्यवहारात पराभूत होताना दिसतात. जीवन जगताना परिस्थितीशी जुळवून घेत कशीबशी ती जगताना दिसतात.

'उभे धागे: आडवे धागे' (१९७२) ह्या माणदेशी कादंबरीत एका विधवा स्त्रीची करुण कहाणी आहे. सखू चोथीण नावाची ही स्त्री पाचवडी गावात राहणारी असून ती हातमागावर काम करणारी आहे. गावातील प्रतिष्ठित म्हणवणारे लोक तिचा संसार उध्वस्त करतात, तरीही ती धाडसाने जीवन जगण्याचा प्रयत्न करते. तिचा बाणेदारपणा हा माणदेशी स्त्रीचे प्रातिनिधिक रुप म्हणूनच समोर येतो. परंतु तिची मुले दुबळेपणाचे प्रतीक म्हणून पुढे येताना दिसतात.

- माणदेशातील अज्ञान, अंधश्रद्धा व अपशकुन :

माणदेशातील ग्रामीण समाज हा जुन्या रुढी - परंपरांचे जतन करताना दिसतो. त्यातूनच खऱ्याखोट्या समजुती एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येतात. ह्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्याठिकाणी पिढ्यानुपिढ्या चालत आलेले अज्ञान होय. माणदेशातील स्त्रिया मूल होण्यासाठी विविध उपाय करतात. विवस्त्र अवस्थेत रात्री पिंपळाला प्रदक्षिणा

घातल्या की मूल होते, असा समज आहे. त्या खेड्यातील शिंपी जगू हा निपुत्रिक असतो. ह्या संदर्भात पुढील वर्णन पहा: "याच पिंपळाला आपल्या बायकोने ओल्याने प्रदक्षिणा घातल्या होत्या , याची त्याला आठवण झाली." (पृ.१३) कृष्णजन्माच्या वेळचा नारळ जर एखाद्या सुवासिनीच्या ओटीत घातला, तर तिला ताबडतोब मुलं होतात, असा समज माणदेशात आहे. मुले होणे म्हणजे निसर्गघटना नसून 'ही आकाशाची देणगी आहे,' असे लोक मानतात. (पहा : पृ. १८)

मुलांच्या जन्माबाबतही माणदेशात अशाच अंधश्रद्धा असल्याचे दिसते. पहा: "देवाघरचा पानमळा असतोय ह्यो. जे प्वार जन्माला येतं, ते आपला शेर संगती आनतं" ('आकाशाची फळे' पृ. ३६) ह्याच अज्ञानातून विठोबा कुंभाराला दरवर्षी एक मूल होत राहते आणि त्याची परिस्थिती बिघडत जाते. माणदेशाची ही शोकांतिका असल्याचे दिसून येते. म्हणजेच माणदेशात मुले होणे, ही गोष्ट पूर्णपणे देवाच्या हाती असल्याचे मानण्यात येते. विठोबा घरातून संध्याकाळच्यावेळी जेवण करुन देवळात झोपण्यासाठी जातो. तेथे त्याच्याच जातीतील रामू आलेला असतो. तो दिवस कृष्णजन्माचा असल्यामुळे गावकऱ्यांनी तयार केलेल्या स्टेजवर गोप-गोपाळांचा नाच चाललेला असतो. त्यावेळी रामू आणि विठोबा ह्यांचे पुढील खाजगी बोलणे चालू होते.

"न्हाई... पर तुमाला तर ल्योक बिक..." विठोबा अडखळला.
"लेक दिला नाही देवानं, हेच तर दुखणं आहे माझं."
"मोठा लहरीच हाय देव... ज्येस्नी देतो, त्येस्नी पाचुंद्यानं देतो आन् देत न्हाई त्येंच्या घरच्या मांजरिनीबी वांझोट्या मरत्यात." (पृ. ३१) ह्यावरुन माणदेशी समाजातील अज्ञान व अंधश्रद्धा समोर येतात.

'उभे धागे: आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीत कोष्टी जातीच्या लोकांची माणदेशातील परिस्थिती, त्यांच्या व्यथा व त्यांची वर्तुळातून बाहेर पडण्याची धडपड ह्यांचे चित्रण आलेले आहे. हे सर्व ग्रामीण चित्रण असल्यामुळे त्यात अंधश्रद्धा, शकुन ह्यांचे वर्णन येते. घरामध्ये पालीच्या ओरडण्याचा अपशकुन मानून देवाचे नाव माणदेशात घेतले जाते. पहा: "कृष्ण, कृष्ण, कृष्ण, सोन्याची वाचा." (पृ. ४३) ह्यावरून माणदेशातील ग्रामीण समाज अपशकुन, अंधश्रद्धा ह्यांच्या आहारी गेल्याचे दिसून येते.

● माणदेशातील दारिद्रय व स्त्री :

'आकाशाची फळे' (१९६०) ह्या कादंबरीत विठोबा कुंभाराच्या मृत्यूनंतर सतत मुलांमध्ये गुरफटलेली त्याची बायको पारु, कुटुंबाची मनापासून काळजी वाहणारा लहान भाऊ शंकर, शंकरच्या प्रेमात रमलेली रामूची चंपा आणि त्याची म्हातारी आई आणि सोबतीला असणारे भयाण दारिद्रय ह्यांची कहाणी आलेली आहे. ह्यात शंकर ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा असली, तरी शेवटी 'पारु ' हीच केंद्रस्थानी येते आणि तिची वेदनेने भरलेली माणदेशी शोककहाणी होते. 'उभे धागे: आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीत सखू ही सर्वांना बरोबर घेऊन जाण्याच्या प्रयत्नात अपयशी ठरते, तरीही कादंबरीत ती केंद्रस्थानी येते.

'आकाशाची फळे' ह्या माणदेशी कादंबरीत पारु आपल्या मनाचा खंबीरपणा दाखवून घरची परिस्थिती नेमकी कशी आहे, ह्याचे शंकरजवळ पुढीलप्रमाणे वर्णन करते. "माया मटी एडी असती दाजीबा, ह्या नाचरगती खेड्यांतच दिस काडायचं हुतं, तर शहारात राह्यला कशाला? इल्लम कमीवली कशाला ? ह्येंनी उगडं कंदी सांगितलं न्हाई तुमाला; पर साऱ्या गावाचं देनं हाय आपल्याला. जिमिनीचा टुकडा व्हता, त्योबी न्येलाय. गाव पयल्यागत राह्याल्यालं न्हाई. जिमिनी पिकत न्हाईत. उंबरा वाढलाय्. तोंडं शेकड्यांनी उघडल्यात आन् काळीलामातुर वांझपना आलाय्. ह्या गावात जगनं म्हंजे चिपाडातला रस पिऊन उसना कैफ आनन्यागत हाय. दिसभर मडकी ठोकली अन् रातभर आवा भाजला, तरी तांबडा पैका दिष्टी पडायचा न्हाई हतं...!"(पृ.१२८) ह्यावरुन माणदेशातील सर्वसामान्य माणसाला जीवन जगताना अनेक संकटांना सामोरे जावे लागते, तरीही त्यांच्या पदरी निराशाच येते, ही दारिद्रयाची खंत पारुने व्यक्त केल्याचे दिसते.

शंकरच्या सर्व स्वप्नांचा चक्काचूर होऊनही तो समंजसपणाने नाउमेद ना होता आपल्या भावाचा संसार सावरण्याचा प्रयत्न करतो. तो कालव्याचे माती वाहण्याचे काम करायला सुरु करतो. एकदिवशी काम करता - करताच चक्कर येऊन तो पडतो व त्यावेळी तो बडबडतो, "विठोबानं नाही दिलं, तर मी देईन की ! इतके दिवस दम धरलांत, आणखी थोडा धरा... शिव्या नका देऊ तात्या; पाहिजे तर मी माझ्या सहीची प्रॉमिसरी करुन देतो... ती आशा नगा धरु बापू...चंपाचं आणि माझं लगीन होणार नाही....चंपा, माल कळतंय्... सारं कळतंय्... तुझ्या बापाला कळत नाही.... तू तरी समजून घे....तसं करता येतं.... माझ्या डोक्यावर फार ओझं आहे.... वैनी, तिची मुलं... त्यांना सांभाळणार आहे मी.... हो, हो दोन ग्रास तरी पुरे करीन... आई गं !" (पृ २००) ह्यावरुन माणदेशातील अनेक तरुणांचे भविष्य उध्वस्त

झाल्याचे निदर्शनास येते. तसेच माणदेशी माणूस हा दारिद्र्यामुळेच समंजस बनल्याचेही दिसून येते.

माणदेशात स्त्रीला दुय्यम स्थान असले, तरी संसाराचा गाडा धोरणीपणाने ओढण्याचे काम तिलाच करावे लागते. पारु जास्त मुले नको म्हणून विठोबाला सांगत होती, तरीही तो तिचे ऐकत नाही. त्याचे दुष्परिणाम दिसू लागल्यानंतर पारु उध्वस्त होते व दुःखाच्याही पलीकडे जाऊन ती पुढीलप्रमाणे भावना व्यक्त करते : "अगं, झालं काय रडायला? शंकर खेकसला. "पारुचं तान्हं पोर गेलं की रं, संकर, हजारदा सगळ्यांनी सांगितलं....लई झाली, लई झाली नगा म्हनू, कुनी ऐकत न्हवतं. न्हेलं देवानं !" शंकरला काय बोलावे ते सुचेना. तो छपरात शिरणार, तो पारु दारातच उभी असलेली त्याच्या दृष्टीला पडली. तिच्या डोळ्यांत पाण्याचा टिपूस नव्हता, मुद्रेवर दुःखाची सुरकुतीहि नव्हती.

"पोर गेलं, वैनी?" शंकरने गहिवरुन विचारले.

"गेलं, बरं झालं, दाजिबा. खानारं एक तोडं कमी झालं." (पृ. १६०)

ह्यावरुन माणदेशातील स्त्रीला प्रतिकूल परिस्थितीत संसारचा गाडा ओढून ओढून आलेला दिवस कसातरी ढकलावयाचा, अशाच भावनेतून जीवन जगावे लागते, हे लक्षात येते. गरिबी ही अतिशय वाईट असते व तिचे भोग हे भोगूनच संपवावे लागतात, ही जाणीव पारुच्या ह्या चित्रणावरुन होते.

माणदेशातील स्त्री प्रेमाची भुकेली आहे.परंतु मर्यादांचे बंधन ओलांडण्यास ती तयार नसते. शंकर व चंपा ह्यांचे उदाहरण येथे बोलके आहे. शंकर चंपाशी लग्न करण्यास नकार देतो. अचानक त्याची परिस्थिती बिघडते. त्यावेळी शंकरवर मनापासून प्रेम करणारी चंपा धावून येते. तिला पाहून शंकर म्हणतो, "चंपा-"

"बस्-" त्याच्या तोंडाजवळ हात नेत चंपा म्हणाली, "बस्, आता आणखी काही बोलला नाहीस तरी चालेल. अशी हाक मारलीस तरी मला पुरे आहे!" (पृ. २१७) ह्यावरुन माणदेशातील स्त्रीला सामाजिक बंधनात राहूनच प्रेम मिळवावे लागते. सत्शील माणसाला माणदेशी स्त्री आपल्या सोज्ज्वळ वागण्याने जवळ करते. हे माणदेशी स्त्रीचे कमालीचे वेगळे आणि वास्तव चित्रण येथे पहावयास मिळते.

'उभे धागे: आडवे धागे' (१९७२) ह्या माणदेशी कादंबरीत स्त्रीचे वेगळेच रुप पहावयास मिळते. सखू चोथीण ही विधवा स्त्री नेटाने संसाराचा गाडा हाकत असते. परंतु

गावातील चांडाळचौकडी असलेले पुरुष तिची सून इंद्रा हिला पळवून नेतात. त्यावेळी शंकरची आत्या चिंगामामी शंकरला काहीतरी सांगते पहा:

"इंद्रा पाचवडीतच आहे अजून..."

"कुठं ?"

"कालपातुर वाड्यात बसवून ठेवली होती तिला पहाऱ्यात !"

"तिथं कुणी नेली ?"

"नेतंय कोण ? तीच जाऊन पालथी पडली गुराप्पादादाच्या पायावर."

"का ?"

"का काय ? त्या देसायाच्या पोरांनी दिवसभर अंगाखाली घेतली तिला न् सोडली वाऱ्यावर. आता तुझी आई काय घरात घेणार आहे तिला ? घेणार असली, तर बघ म्हणावं ती वाडीत आहे." (पृ. ७०) ह्यावरुन माणदेशात ग्रामीण भागात कोणतीही गोष्ट लपून रहात नाही. गुप्त गोष्टींचा शोध लावून त्या पसरवण्याची कामे ग्रामीण स्त्रिया करतात. त्यामुळे माणदेशातील स्त्रीचे हे वेगळेच रुप आपल्यासमोर येते. माणदेशातील बहुतेक स्त्रिया आपल्या इज्जतीला जपताना दिसतात. कसलीही संकटे आली, तरी न डगमगता त्यांना समोरे जाऊन त्यातून मार्ग काढण्याचा केविलवाणा प्रयत्न त्या करताना दिसतात. पहा: "राजाच्या मर्जीतला म्हणून हा थेरडा मला शहाणपण सांगतोयू. वाघाची शिकार कुरतडून खाणारा कोल्हा हा... अब्रुचं वाळवण झालं ते झालं. जात काय करतेय् ? राजा काय करतोय् ? मी काही देसाई इनामदाराची बाईल नाही. हातावरलं पोट... जातीनं तोडलं न राजानं बाहेर काढलं, तर जाईन भागानगरला..." (पृ. ८५) ह्यावरुन सखूचा करारीबाणा आपल्यासमोर येतो.

- **माणदेशातील धूर्तपणा / कावेबाजपणा :**

माणदेशात सतत दुष्काळ असल्यामुळे सर्वसामान्य लोकांना जीवन जगणे नकोसे होऊन जाते. तेथे जे श्रीमंत आहेत, ते गरिबांना छळतात. सावकारीचे धंदे करून ते गरिबांना देशोधडीला लावतात. व्याजाने पैसे द्यावयाचे व त्याचे अव्वाच्या सव्वा व्याज घेत रहावयाचे, हा व्यवहार माणदेशात धूर्तपणाने चालताना दिसतो. पहा: "त्याचा जन्माचा दावेदार जोशीकाका लिंबाच्या पारावर बसला होता. स्टेशनवर दिलेली धमकी त्याने खरी केली होती. तो जप्ती घेऊन आला होता. बेलिफ, तलाठी, सरपंच सारे उभे होते. म्हातारी, पारु आणि सीता एका कोपऱ्यात गप्प बसल्या होत्या. शंकर पडत नव्हता, म्हणून त्या हरामखोरासमोर

उभा होता." (पृ. ११८) ह्यावरुन माणदेशात सावकारी व्यवसाय राजरोसपणे चालत होता व गरिबांना देशोधडीला लावण्याचे काम समाजातील उच्चवर्ण मनापासून करीत होता, हे लक्षात येते.

माणदेशात गरिबीमुळेसुद्धा लोकांना धूर्तपणाने वागावे लागते, असे दिसते. पहा: "आत्ता !" दचकल्यासारखे करुन मामा पारावरुनच बोलू लागला, " तू कशासाठनं बाह्यार आली, आका ? हवा ही असली पडलीय रोगाट. वल्या बाळातनीला न्हाई सोसायचं. जलम आन् मरान् मानसाच्या हातच्या गोष्टी न्हाईत. पोरांकडं बघून दिस ढकलायचं. उगं डोळं गाळत बसू नगा आता. धीराऽऽ दिवस काडा.. मी निगतो आता ! " (पृ. १२४) ह्यावरुन माणदेशात परिस्थितीमुळे रक्ताच्या नात्यालासुद्धा धूर्तपणाने दूर करावे लागते, हे लक्षात येते.

'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीत माणदेशातील वेगळे समाजजीवन पहायला मिळते. सर्वच श्रीमंत आणि सुशिक्षित लोक वाईट नसतात. काहीजण धूर्तपणाने गरिबांना चांगला सल्लाही देताना दिसतात. पहा : "बघ विचार कर, सखू , आज तुझी सून काढून नेली त्यांनी. उद्या आणखी कुणाची लेक उचलून घेऊन जातील. ही काही मोगलाई नाही. या संस्थानाचा राजा ब्राह्मण आहे. न्यायनीतींची चाड बाळगतो तो..." (पृ. ७१) ह्यावरुन गरिबांवरील अन्याय निवारण करण्यासाठी आपले नाव समोर येणार नाही, ह्याची दक्षता घेऊन धूर्तपणाने माणदेशातील लोक वागताना दिसून येतात.

पाचवडीतले शहाणे लोक सखू चोथणीच्या घरातील वाद मिटवण्याचा प्रयत्न करतात. परंतु ह्या लोकांनीच सखूच्या सुनेला पळवून नेलेले असते. मोठ्या धूर्तपणाने ते सखूला म्हणतात, "सखू", राजमाने मधेच घुसला, "महाराजांच्या कानापातुर गेल्यात गोष्टी तुझ्या दावणीची गाय चोरांनी नेली होती. चोरांना सजा झाली. आता तुझी गाय आपली माघार घरात घे."

"सुतासारखा की सरळ बोलतोस, बाबा. रावणाघरी राहिलेल्या शिताबाईला देवानंसुद्धा टाकून दिली होती. पोथ्यापुराणं ऐकली आहेस का नाही कधी ?"
"पुराणातली वांगी पुराणात, या मुलीचा काही दोष नाही. ती नांदायला तयार आहे."
"ती नांदेल मला तिला नांदवायची नाही."
"मग तिनं कुठं जावं ?"
"आहे की तुझं घर. पाहिजे तर पाट लाव. म्होतुर कर."(पृ. ८४) ह्यावरुन माणदेशातील श्रीमंतवर्ग आपला कार्यभाग संपल्यानंतर गरिबांवर दडपण आणण्याचा प्रयत्न करताना दिसून

येतो. गरिबांचे संसार उध्वस्त करावयाचे व नंतर त्यावर मीठ चोळण्याचे काम करावयाचे, असा हा सारा कावेबाजपणाचा प्रकार माणदेशात घडताना दिसतो.

- माणदेशातील परंपरा व सामाजिकता :

प्राचीन काळापासून माणदेशात साधुसंतांच्या परंपरेचा महत्त्वाचा वाटा असल्याचे दिसून येते. ग. दि. माडगूळकर ह्यांचे घराणे आध्यात्मिक परंपरा जोपासणारे असल्यामुळे साहजिकच ह्या परंपरेचा वारसा त्यांच्यापर्यंत आलेला दिसून येतो. गदिमांची सुरुवातीची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. माणदेशात सतत प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे माणदेशातील माणूस दैववादी व अंधश्रद्धाळू बनल्याचे लक्षात येते. ह्या सर्वसामान्य वर्गातूनच माणदेशी परंपरा खऱ्या अर्थाने जोपासण्यात येत असल्याचे दिसून येते.

माडगूळकरांच्या 'आकाशाची फळे' (१९६०) ह्या कादंबरीतील सगळेच पुरुष परिस्थितीने दडपलेले, पिचलेले दिसतात. परिस्थितीने भांबावून जाणे, हा माणदेशी माणसांचा स्थायीभाव असलेला दिसून येतो. जीवनात ही माणसे पराभूत होताना दिसतात. शंकरला कौटुंबिक जबाबदारीतून मुक्त करण्याच्या भावनेतून पारु मुंबईला जाते. तिचा लहान मुलगा बबज्या हा तर अन्न - अन्न करुनच मरतो, मुलगी वेश्या बनते, तर एक मुलगा चोऱ्या करतो. ह्यावरुन माणदेशातील परिस्थितीला कंटाळून शेवटी सर्वसामान्यांच्या वाट्याला पराभूत होणेच येते, हे लक्षात येते.

माणदेशातील गरीब स्त्रीला जीवन जगणे असह्य होते, ही सामाजिकता माणदेशात दिसते. ह्याविषयीचे चित्रण पहा: "ती मोठी कामसू व जिद्दीची बाअी होती. सांगोला, म्हसवड या गावांना ती अेकटी घोडयावरुन जायची. माझी आअी दिसायला कुरुप होती, बुटकी, कोळपलेल्या रंगाची, पाचवडीसारख्या खट्याळ गावात तिने दिवस काढले ते कुरुपतेमुळेच !" (पृ. १७) ह्यावरुन माणदेशी सामाजिकतेचा ठळक प्रत्यय समोर येतो. स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे. तिचा उपभोग कोणत्याही मार्गाने घेतला पाहिजे, हेच माणदेशात पहावयास मिळते.

माणदेशात सर्व जातिधर्माच्या परंपरेप्रमाणे सर्व सण, उत्सव, बाजार, जत्रा साजऱ्या केल्या जातात. जत्रेचे पुढील वर्णन पहा: "कासारांनी सवाष्णीचे हात हाती घेऊन बांगड्या भरण्याचा सपाटा चालविला होता. भडभुज्यांची भट्टी धगधगत होती. हॉटेलवाले भज्यांचे घाण्यांवर घाणे काढीत होते. वाघाच्या कातड्यांचे जाकिट पेहरलेला खंडोबाचा वाघ्या गर्दीतून

हिंडत होता. देणे - घेणे भरांत होते. बोलण्यांना सुमार नव्हता.'' (पृ. ९३) ह्यावरुन माणदेशी परंपरेची जोपासना वेगवेगळ्या जातिधर्मांमधील लोक करीत असल्याचे दिसून येते.

माणदेशात आजही लग्न झालेल्या मुलीला तिच्या सासरहून मुराळी पाठवून आणण्याची पद्धत आहे. पण त्यासाठी अगोदर सांगावा पाठवावा लागतो पहा: ''एवडं तालेवार व्हतं तुजं माह्यारगोत त नव्हरा गमावला तवाच का न्हाई गेलीस ? जाऊन राह्यचं व्हतंस की पोराठोरासंगट... !'' '' पनं माज्याव का गागतां गरीबाव ! तुमी न् तुमची सून. मला काय गरीबाला? सांगावा सांग ; सांगितला.'' (पृ. २१९) ह्यावरुन माणदेशात ग्रामीण परंपरेतील सर्व संकेत पाळले जात असल्याचे स्पष्ट होते.

आज सर्वत्र सुधारणा झालेल्या दिसून येतात. परंतु माणदेशात शाळा, दवाखाना, रस्ते, लोकसंख्यानियंत्रण ह्या बाबतीत सर्वत्र उपेक्षाच दिसते. लोकसंख्येबाबत जुन्याच संकल्पना आज अस्तित्वात असल्याचे दिसून येते. विठोबाला संसाराचे ओझे झाल्यामुळेच त्याने आत्महत्या केली. शंकर सारखा ह्या गोष्टीचा विचार करायचा. पहा: ''संसाराचे ओझे जिवापाड झाले होते. ते ओझे वाढविले कुणी ?... त्याचे त्यानेच...ते वाढते आहे हे त्याला कळले नसेल का ? कळले असेल... मग...? ते न वाढविण्याचा उपाय त्याला माहीत नव्हता. सांगणारेहि कुणी भेटले नाही.... कुणी सांगितले असते, तर त्याला ते पटले असते का ? पटले असते. वठले नसते का ? परंपरागत कल्पना. संतति म्हणजे देवाची देणगी. आकाशाची फळे.... या कल्पना नाहीशा करता आल्या पाहिजेत... पण कशा ? बाप आपली लेक परक्या मुलाहाती कशासाठी देतो ?... झाड फळाला यावे म्हणून....'' (पृ. २२६-२७) ह्यावरुन माणदेशातील रुढी - परंपरा पाठीमागे जुन्या राहिल्याचे दिसून येते.

'उभे धागे, आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीतूनही माणदेशात जुन्या रुढी - परंपरा शिल्लक असल्याचे दिसते. माणदेशात सासूने सुनेला त्रास देणे, जाच करणे, हा प्रकार आजही दिसून येतो. पहा : ''पसरसाकडे तरी एकटी जाऊ द्या की मला. का त्यातही आहेच सासुरवास?'' (पृ. २०)

अप्पा कोशीकर हा जगाचा लहानपणापासूनचा मित्र होता. माणदेशातील परिस्थिती तेथील माणसाला संयमी, कनवाळू बनविते. मानवता जोपासण्यासाठी माणसे एकमेकांना घासातला घास काढून देताना दिसतात. ही खास माणदेशी परंपरा म्हणावी लागेल पहा:

''जगा -''

"काय ?"

"कोशीला जातोयस नव्हे?"

"हो, का ?"

"हे घेऊन जा," तिने एक गाठोडे पुढे केले. पुरचुंडीसारखे ते पुढे करीत ती म्हणाली.

"काही नाही. बोटवं आहेत. अप्पाला आवडतात." (पृ. १७७) ह्यावरुन माणदेशात आजही माणुसकीच्या काही पद्धती पाळल्या जाताना दिसतात. सध्याचा अप्पा कोशीकर हा अतिशय श्रीमंत माणूस असतो. पूर्वीचा तो गरीब राहिलेला नसतो. त्यातही बोटव्याची किमंत ती काय? परंतु त्यामागील प्रेमाची भावना महत्त्वाची आहे. तीच माणदेशात परंपरा व सामाजिकतेच्या रुपाने सर्वसामान्य वर्ग जोपासताना दिसतो.

### ५.४.३. माणदेशातील व्यक्तिंचे व्यक्तिचित्रण :

माणदेशातील वेगवेगळ्या जाती- धर्मातील व्यक्तींचे त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यानुसार माडगूळकरांनी जे चित्रण केले आहे. त्यामुळे त्या व्यक्तिरेखा खरोखर जिवंत झाल्या सारख्या व त्या आजरामर झाल्याचे दिसून येते. 'आकाशाची फळे' (१९६०) ह्या कादंबरीत शंकरने स्वतःचे केलेले वर्णन पहा: "मी एका अनाथ विधवेचा दीर आहे. एका म्हाताऱ्या आंधळीचा नातू आहे. सात निराधार लेकरांचा काका आहे !" (पृ. १३१) ह्यावरुन शंकरच्या पाठीमागे असलेल्या कौटुंबिक व्यापाची जाणीव लक्षात येते.

जगू शिंपी हा गावातील एक गरीब माणूस असतो. त्याला मूलबाळ नसते. त्याची बायको एका साधूबरोबर पळून जाते, तेव्हा गावातील लोक त्याची कुचेष्टेने चौकशी करतात. तो संवाद पहा:

" कुणीही चावटपणाने यावे, जगूला विचारावे, "आली का शिंपीन?"

"न्हाई !"

"बुवा ?"

"न्हाई !"

"कुठं गेली ?"

"देवाला डोळं"

"पळूनच गेली म्हनकी"

"हुं !"

"मग आता ?"

"हुडकायला न्हाईस जानार ?"

"कुटं जायाचं हुडकायला ? अन् हुडकून गावली तरीबी ती कोन आपली ? उसावलेलं शिवाय येतं, निसावल्याला काय करायचं ?" (पृ. १७९) ह्यावरून जगूच्या बायकोचे वागणे आणि जगूचा मवाळ स्वभाव ह्या दोन्ही गोष्टी लक्षात येतात.

'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीत आलेले माणदेशातील पाचवडीसारख्या खेड्यातील सखू चोथीणीचे पुढील चित्रण पहा: "माझी आई दिसायला अगदी कुरुप होती. किडकिडीत बुटकी, कोळपलेल्या रंगाची. दोन पोरे पदरात घेऊन पाचवडीसारख्या खट्याळ गावात तिने दिवस काढले ते या कुरुपतेमुळेच. ती दिसायला थोडी चांगली असती, तर आणखी काही वेगळेच झाले असते. बाईमाणसाला एकट्याने सुधे जगू देण्याइतका आमचा गाव सरळ नव्हता. आई तापट होती पण तितकीच मायाळू. तिच्या माहेरची माणसे तिचा फायदा घ्यायची. एखादी मामी, मामा नेहमीच आमच्याकडे असासचे." (पृ. १७-१८) ह्यावरुन सखूच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू स्पष्ट होतात.

सखू चोथीण ही गरीब होती, तरी तिला आपल्या मूळ घराण्याचा एक मोठा अभिमान होता. पहा: "आईच्या माहेरचे नाव कवडे. म्हसवडचे कवडे. कुणी तलवारबहादूर नव्हते. तंतूला तंतू जोडणाऱ्या विणकऱ्याचाच वंश तो. पण आईला त्याचा विलक्षण अभिमान. अटीतटीची वेळ आली, झुंजाचा प्रसंग आला की ती हटकून म्हणायची , 'कवड्यांच्या पोटची आहे मी. यमाच्या हातातली फरशी हिसकावून घेईन.'" (पृ. ९८) ह्यावरुन सखूचा कणखर बाणा लक्षात येतो.

माणदेशात सगळीकडे दारिद्र्य व गरिबी ह्यांचे प्रमाण जास्त दिसते. ह्यातून जीवनाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न माणदेशी माणूस करताना दिसतो. अप्पा कोशीकराच्या घरात जगन्नाथ रहात असतो. त्यावेळी अप्पाला भेटण्यासाठी सरिता नावाची सामान्य मुलगी येते. तिचे वर्णन पहा: "सरिता सोळा सतरा वर्षाची असेल. रुपाने ती गोरी होती. पण नाकी डोळी तिला कुणी सुंदर म्हणणार नाही. तिचा वेष अगदी साधा होता. एक फिकट गुलाबी पातळ ती चापून चोपून नेसली होती. अंगात पांढरा शुभ्र ब्लाउझ. पाठीवर वेणी. उभ्या अंगावर कसला दागिना नाही की डोळ्यात एखादे पानफूल नाही." (पृ. १५८) माणदेशात सर्वसामान्य वर्गातच संस्कार शिल्लक असल्याचे वरील व्यक्तिचित्रणावरून स्पष्ट होते.

### ५.४.४. माणदेशातील आर्थिक स्थितीचे चित्रण :

माणदेशातील आर्थिक स्थितीचे चित्रण पाहताना त्यात मानवी जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचे किंवा प्रगतीला पोषक असे काहीच हाती लागत नाही. 'आकाशाची फळे' (१९६०) ह्या कादंबरीत दुष्काळामुळे गावात विठोबाने सर्वांकडून पैसे उसने आणलेले असतात, त्याविषयीची माहिती पुढीलप्रमाणे येते. ''गावात उधार मुळीच मिळत नव्हते. नष्ट्या वाण्याची बाकी खूप तुंबली होती. घसटीत असलेल्या साऱ्या घरातून शेरमापटे आणून झाले होते. गावातली सारी ठळक घरे, या ना त्या रीतीने कुंभारवाड्याची धनको झाली होती.'' (पृ. १०६) ह्यावरुन माणदेशातील सर्वसामान्यांचे आर्थिक जीवन खूपच हलाखीचे असल्याचे निदर्शनास येते. शंकरची भावजय पारु म्हणते, ''दिसभर मडकी ठोकली, अन् रातभर आवा भाजला, तरी तांबडा पैका दिष्टी पडायचा न्हाई हतं...!'' (पृ. १२८) ह्यावरुन माणदेशात कितीही कष्ट केले, तरी पैसे मिळतीलच, ह्याची शाश्वती नाही, हे लक्षात येते.

माणदेशात गरीब आणि श्रीमंत ही दरी स्पष्टपणे उठून दिसते. ज्यावेळी शंकरचे लग्न चंपाबरोबर करण्याचा प्रयत्न चाललेला असतो, तेव्हा शंकर म्हणतो, ''अगदी सरळ आहे. त्यांच्याकडे पैसा आहे. ते आपल्या नातवंडाच्या साऱ्या हौशी पुरवतील. चंपाची मुलं लोकरीचे कपडे घालतील आणि माझे पुतणे थंडीत कुडकुडत बसतील. ते मला पाहवणार नाही.''(पृ. १७१) नवरा मेल्यानंतर हलाखीच्या परिस्थितीला कंटाळून घर सोडून पारु निघून जाते, एक महिन्यानंतर तिचे खुलाशाचे पत्र येते. ते असे : ''तुम्हाला आजारी टाकून मी निघून आले, त्या गोष्टीला महिना होत आला. तुम्हांला माझ्याबद्दल काय वाटले असेल. माझा अगदी नाइलाज झाला. तुम्ही अंथरुणावर खिळलेले. घरांत मूठभर दाणे नाहीत. औषधपाण्याला पैसा नाही. मरुन जावं इतका कंटाळा आला. मरुन चालण्यासारखे नव्हते. मी पुष्कळ विचार केला आणि पारगावच्या बाहेर पडायचे ठरविले.'' (पृ. २४७) ह्यावरुन माणदेशात एकत्रित राहवयाचे ठरविले, तरी आर्थिक कारणांमुळे घर सोडावे लागते व वाईट मार्गाचा अवलंब करुन जीवन कसेतरी जगण्याचा केविलवाणा प्रयत्न करावा लागतो, हे स्पष्ट होते.

'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीत सखू चोथीण ह्या सूत विणकर स्त्रीचे भयाण जीवनचित्रण आले आहे. ''सणंगाला लागणारे सूत सांगोल्या - म्हसवडाहून आणायचे. त्याचे ताण बांधायचे, ते मागावर घालायचे. रात्रीचा दिवस करुन सणंग विणायचे.

ते बाजारात नेऊन विकायचे. रुपया दीड रुपया कमवायचा.'' (पृ.१६) ह्यावरुन माणदेशात कामगारांनी काम केले, तरी त्याचा योग्य मोबदला मिळत नाही, हे दिसून येते.

लग्न - मग ते गरिबांचे असो किंवा श्रीमंताचे, ते धूमधडाक्यात झाले पाहिजे, ह्या भावनेतून हवा तेवढा खर्च करण्याची तयारी मुला-मुलीकडील मंडळीची असते. माणदेशही ह्याला अपवाद नाही. अप्पा कोशीकरजवळ लग्नासाठी पैसे नसतात. तेव्हाचा प्रसंग - ''अरे, या सरितेचे वडील म्हणतात, येत्या मे महिन्यात लग्न उरकून टाका. आपल्याजवळ नाही दिडकी...''

''पैसे ते खर्च करतील. तुला कशाला हवेत ?''

''नवरीला चार दागिने, तर दिले पाहिजेत. मित्रांना जेवण दिले पाहिजे. सासरेही बिचारे गरीबच. मोठा प्रॉब्लेम आहे.'' (पृ. १५९) ह्यावरुन माणदेशातही एकमेकांच्या सहकार्याने समंजसपणाने खर्च करुनच लग्न केले जाते, हे लक्षात येते.

### ५.४.५. माणदेशातील आध्यात्मिक धार्मिक चित्रण :

माणदेशी माणूस श्रद्धाळू, देवावर विश्वास ठेवणारा, कष्टाळू आहे. माणदेशात प्रत्येक गावात मारुती, खंडोबा, मरीआई, बिरोबा, म्हसोबा इ. ग्रामदेवतांची मंदिरे आढळतात. आरेवाडीच्या बिरोबाचे सुंभराण (स्मरण) करण्यासाठी लाखो माणदेशी माणसे ही परंपरा चालविताना दिसतात, ही माणदेशी संस्कृती आहे. 'आकाशाची फळे' (१९६०) ह्या कादंबरीत गावातील पंडाभटजी देवाला प्रदक्षिणा घालत असतो. प्रदक्षिणा घालत असताना बोलावयाचे नसते, असा एक अलिखित नियम असल्याचे पुढील संवादावरुन दिसते : ''राम राम देवा....''

''काय आहेरे ?'' पंडाभट गुरगुरला.

''आपल्याकडेच निघालो होतो. आयते दिष्टी पडला.''

''प्रदक्षिणेच्या वेळी बोलायचं नसतं -''

''असं असतं न्हाई का ?'' एक नवा धर्माचार समजल्याच्या आविर्भावाने जगू म्हणाला - ''आता बोलू ?'' (पृ. १८) ह्यावरुन माणदेशात अनेक धार्मिक कल्पना मूळ धरुन आजही जिवंत असल्याचे दिसून येते.

माणदेशात अध्यात्माच्या व धार्मिकतेच्या नावाखाली फसवाफसवीचे अनेक प्रकार घडताना दिसतात. पण म्हणून माणदेशी माणूस धार्मिक प्रवृत्ती सोडून देईल, असे म्हणता येणार

नाही. जगूला मूल नाही म्हणून वेगवेगळे अघोरी प्रकार, नवस - सायास केले जातात. तरीही काही साध्य होत नाही. शेवटी जगू धार्मिकतेच्या माध्यमातूनच प्रयत्न करताना दिसतो. तो प्रसंग : 'अरे, जगूला नाही मूल. त्याच्या बायकोनं घातलं गाऱ्हाणं. स्वामी प्रसन्न झाले. म्हणाले, 'तुझ्या पोटी कृष्णावतार होईल!' आणि नुसतं म्हणून थांबले नाहीत. त्या दळभद्र्याच्या घरी मुक्कामाला येऊन राहिले. चातुर्मासभर राहणार आहेत. नगरीचं भाग्य म्हणायचं या. दर्शन तरी घेऊन ये, साक्षात्कारी पुरुष आहेत." (पृ. ७०) ह्यावरुन माणदेशातील धार्मिकता दिसून येते आणि आंधळेपणाने धार्मिकतेच्या नावाखाली चाललेल्या गोष्टीवरही जळजळीत प्रकाश पडतो. माणदेशातील लोकांच्या अज्ञानातून निर्माण झालेली ही वास्तवता आहे, असे म्हणता येईल. तसेच माणदेशात ग्रामीण समाजात एखाद्या साधु स्वामीबद्दलचे समज ताबडतोब पसरतात. कारण माणदेशी लोक देवभोळे आहेत. संकटातही त्यांची देवावरची श्रद्धा ढळत नाही. पहा: "आंदळ्याची गुरं देव राखतो." (पृ. १३८) "तिनं गाऱ्हाणं घातलं, तर दगडाच्या मूर्तीलादेखील देवाचे हात फुटतील." (पृ. २०५) माणदेशामध्ये खेडुत वातावरणामुळे हे घडत असल्याचे दिसून येते.

'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीतही माणदेशातील मानवी जीवनाचा कोणताही संबंध हा धार्मिकतेशी, आध्यात्मिकतेशी जोडण्याचा प्रयत्न होत असलेला दिसतो. रेणू ही जोगतिणीची मुलगी जगन्नाथला लग्नासंबंधी विचारते, तेव्हाचा दोघांचा संवाद पहा :

"खरंच, लग्न करशील माझ्याशी ?"
"करीन!"
"आई - दादा,"
"त्याचं ऐकणार नाही. कुण्णाचं ऐकणार नाही. मल्लोबाची शपथ."
"जगन्नाथ."
"खरंच देवाशपथ, रेणू." (पृ. १४६) ह्यावरुन माणदेशात धार्मिकता ही प्रत्येक गोष्टीत प्रमाण मानली जात असल्याचे दिसून येते.

ग्रामदैवताबद्दल माणदेशी ग्रामीण जनतेच्या मनात अपार विश्वास असल्याचे दिसते. पहा: 'तो म्हसोबा जागृत असल्याचे सांगितले जात होते.' (पृ. ९३) देवावर हात ठेवून घेतलेली शपथ माणदेशात सत्य मानली जाते. पहा : "प्रमाण करतोस का मल्लोबाच्या पिंडीवर हात मारुन ?" (पृ. १७०) ह्यावरुन ह्या कल्पना ग्रामीण माणसांच्या मनावर खोलवर रुजलेल्या आहेत, हे दिसून येते, परंतु माडगूळकरांनी परमेश्वरावर डोळस श्रद्धा असावी, असा संदेश

दिल्यांचेच दिसून येते. वारकरी - माळकरी हे मांस खात नाहीत. त्यांचे काही नियम, विधिनिषेध असतात. "सांगुतीचं? मला नको ते? का? वारकरी बिरकरी झालाय कां काय?" (पृ. ३८) ह्यावरुन माणदेशात आध्यात्मिक धार्मिक गोष्टींच्या पाठीमागे काहींना काही लोकसमजुती व धारणा असतात, हे स्पष्ट होते. ह्यात साधुस्वामीवरंच्या आत्यंतिक विश्वासामुळे एका निपुत्रिकाचा संसार उध्वस्त झाल्याचे दाखविले आहे. म्हणजेच देवावर कितपत श्रद्धा असावी, ह्याचा संदेशच ह्या माणदेशी कादंबरीतून माडगूळकरांनी दिलेला आहे.

## ५.४.६. माणदेशातील भाषिक चित्रण :

ग. दि. माडगूळकरांच्या माणदेशी कादंबऱ्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची मराठमोळी भाषा. ग्रामीण संवेदनशीलतेच्या आविष्कारामुळे कादंबरीला हा मराठमोळा बाज प्राप्त झालेला आहे. ह्यात संस्थानी वातावरण, ग्रामीण गुंडगिरी, नव्याने विकसित होत असलेली ग्रामसंस्था, नवे युग, स्त्री - पुरुषांचा व्यभिचार आणि ह्या सर्वांना पोटात घेऊन टिकवू पाहणारी संस्कृती ह्यांचा अंतर्भाव आहे. दोन्हीही कादंबऱ्यांना आत्मनिवेदनाचा महत्त्वाचा पदर आहे.

शंकर हा विठोबाचा संसार मनापासून ओढत असतो. तो तलावाचे काम करीत असताना कामाच्या दगदगीमुळे बेशुद्ध पडतो. त्यावेळी कामावरील लोक त्याला घरी घेऊन येतात. त्यावेळी शंकरची आई रघूला विचारते, " काय झालं माज्या लेकराला?" म्हातारी जवळ येत ओरडली. रघू पारुजवळ आला. शंकरला उतरवून घेण्याचा प्रयत्न करीत त्याने म्हातारीला सांगितले, "काम करतां करतांच झीट येऊन पडला म्हनं कालव्यावरच. गेन्या म्हार पळत वस्तीव आला. मग गेलो. आंन गाडीत घालून -" (पृ. १९८) ह्यावरुन माणदेशातील भाषा ही अस्सल मराठमोळी असल्याचे लक्षात येते.

शंकरचा आजार वाढत जातो. वेगवेगळे उपचार केले, तरी तो बरा होत नाही. देवदेवर्षी होतात. शेवटी देवाची भाकनूक करावी, असा विचार शंकरच्या आईच्या मनात येतो. तेव्हाची भाषा पहा :

"शंकऱ्या कंदी बरा होईल गं, पोरी ?"

"तेंच कळत नाई !"

"डागदाराचं औशीद...?"

"गून आला वता तेनं; पण...."

"उपकाराचं दिकुन पैसं घेत्यात आजच्या दुनियेत. मानुस मानसाला वळखीना झालाय !"
"देवाची भाकनुक करावी म्हन्ते !"
"काय करशील ?"
"लेकराई नवसाला पावती म्हून ऐकलंय् !" (पृ. २१३ - २१४)

ह्यावरुन माणदेशातील ग्रामीण बोलीचा प्रत्यय येतो.

'उभे धागे : आडवे धागे' (१९७२) ह्या कादंबरीत सखूची सून घरांतून पळून जाते. तिचा शोध घेण्यासाठी ती रघूला सांगते. तेव्हा - "लौकर माघारी ये . तिथेच पडू नकोस. गोफणीतल्या धोंड्यासारखा" दादा पुढे बघून निघाला. मीही त्याच्या पाठोपाठ चाललो.

"तू कुठं उलथतोस ?"
"दरवाजा बंद करतो"
"आता कर दरवाजा बंद. वाशेल गेलं सांडून अनं् आता बूच लाव बाटलीला. राहू दे दरोजा तसाच. येऊ दे गाव चौकशी करायला." (पृ. ५१-५२). अशा ठिकाणी माणदेशातील अस्सल बोलीचा नमुना पहावयास मिळतो.

एकंदरीत, 'आकाशाची फळे' व 'उभे धागे : आडवे धागे' ह्या दोन कादंबऱ्या माडगूळ परिसराचे चित्रण करणाऱ्या आहेत. ह्यात सर्वसामान्य समाजावर होणारे अन्याय-अत्याचार ह्यांची कहाणी येते. तरीही हे पीडित लोक जीवन जगण्याच्या दुर्दम्य इच्छेतून मार्ग काढताना दिसतात. पुरुषांना तर स्वत:चा चेहरा नसल्यासारखे वाटते. पहा: "कलालयात तर माझ्या समक्ष एका ड्रॉईंग मास्तराच्या मांडीवर बसली ती." ('उभे धागे : आडवे धागे'; पृ. १०८) ह्यावरुन नवऱ्यासमोर बायको दुसऱ्याच्या मांडीवर बसते, तरी नवरा काहीही करु शकत नाही, हे स्पष्ट होते. माणदेशातील स्त्री मात्र धाडसी व धोरणी दिसते.

माडगूळकरांच्या 'आकाशाची फळे' मध्ये बुवाबाजीचे वर्णन आले आहे; तर 'उभे धागे : आडवे धागे' मध्ये देवदासी, झुलवा ह्या सामाजिक रुढीपरंपरांचे वर्णन आलेले आहे. हे वर्णन संस्थानी काळातल्या माणदेशाचे आहे, हे वास्तव स्वीकारावे लागते. माडगूळकर हे माणूस जसा दिसला, तसा तो उभा करतात. 'उभे धागे : आडवे धागे' ही कथा जशी सखू चोथीणीची आहे, तशीच ती अयशस्वी व यशासाठी प्रयत्न करणाऱ्या महत्त्वाकांक्षी जगूचीही आहे. ह्यासंबंधी भालचंद्र फडके म्हणतात, "(ग.दि. माडगूळकर) आपल्या आयुष्याला उंचावण्यासाठी धडपडणाऱ्या नायकाच्या सुखदु:खाचा मागोवा उभे धागे : आडवे धागे' या

कांदबरीतून घेतात. त्याच्या आयुष्याची निव्वळ चित्तरकथा होते. त्याच्या भोवतालचे एकेक पाश तुटत जातात आणि त्याला वाटत राहते की, उभे धागे : आडवे धागे साधीत साधीत इथवर आणलेले वस्त्र अखेर अपुरेच राहिले."[१४]

थोडक्यात , माडगूळकरांच्या कादंबरीतून शाश्वताचा शोध, जुन्या मूल्यांवरील श्रद्धा, जुन्या परंपरेवरील निष्ठा ह्या गोष्टी दिसून येतात. ती जुनी नीतिमूल्ये व संस्कृती ह्यांचे प्रतिनिधित्व करणारी आहे.

## ५.५. व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण :

व्यंकटेश माडगूळकर हे माणदेशातील महत्त्वाचे कादंबरीकार होत. उजाड माळरानाला पडलेले सोनेरी स्वप्न म्हणजे व्यंकटेश माडगूळकर होत. त्यांनी एकूण आठ कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यापैकी माणदेशाचे चित्रण करणाऱ्या पाच कादंबऱ्या आहेत. त्या अशा : 'बनगरवाडी' (१९५५), 'पुढचं पाऊल'(१९७८), 'कोवळे दिवस'(१९७९), 'करुणाष्टक' (१९८२) व 'वावटळ'(१९८५) ह्यापैकी माणदेशाचे चित्रण करणारी पहिली कादंबरी म्हणून 'बनगरवाडी'(१९५५) ह्या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.

व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेशातील निसर्ग, पशु-पक्षी व माणसे ह्यांचे कलात्मक व कथनात्मक साहित्यातून चित्रण करुन संपूर्ण मराठी वाचकाला माणदेशाची ओळख करुन दिलेली आहे. 'बनगरवाडी'(१९५५) ही कादंबरी माणदेशातील सत्य घटना - प्रसंगांमधून साकार झालेली आहे. ह्या कादंबरीतून माडगूळकरांनी माणदेशी जीवनाचे व संस्कृतीचे जिवंत दर्शन घडविले आहे. म्हणूनच व्यंकटेश माडगूळकरांची कादंबरी माणदेशी समाज-संस्कृतीचे प्रातिनिधिक वास्तव चित्रण करणारी आहे, असे म्हणावे वाटते.

ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही माडगूळकरांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली दिसते. माणदेशावर लिहिलेल्या त्यांच्या कादंबऱ्यामधून प्रयोगशीलता दिसून येते. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीत ही प्रयोगशीलता दिसून येते. ह्या कादंबरीत नायक - नायिका असे काहीही नाही. संपूर्ण गावालाच व तेथील प्रदेशालाच त्यांनी नायकत्व बहाल केले आहे, 'वावटळ' (१९६४) ही त्यांची आत्मचरित्रपर कादंबरी आहे. परंतु ती तटस्थपणे लिहिली आहे. हेही जाणवते. गांधीवधानंतर झालेल्या दंगलीचे परिणाम माणदेशातील ब्राह्मण समाजावर कसे झाले, त्याची कहाणी ह्यात आहे. 'करुणाष्टक' (१९८२) ह्या कादंबरीत दारिद्र्याने वेढलेल्या व आठ मुले असलेल्या आईची शोककथा उभी केली आहे. 'कोवळे

दिवस' (१९७९) ह्या कादंबरीत स्वातंत्र्यसैनिकांना माणदेशात आलेले अनुभव कथन केले आहेत, आणि माडगूळकरांच्या स्वतःच्या तारुण्यातील अचानक जमलेल्या प्रेमसंबंधाचे हळुवार चित्रणही त्यात आलेले आहे. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत माणदेशातील दलित तरुणाला आलेला विदारक अनुभव चित्रित केलेला आहे.

व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबरीत संघर्ष, दुःख भरुन राहिलेले आढळते. माणदेशी जीवनाच्या अनेक पैलूंवर त्यांनी वास्तव रीतीने प्रकाश टाकलेला दिसतो. दारिद्र्यातून आलेले दुःख माणदेशी माणसांच्या पाठीमागे लागलेले दिसते, तरी कधी सामाजिक शक्तीच्या दडपणातून निर्माण झालेले दुःखही दिसून येते. ह्या दुःखात आक्रस्ताळेपणा किंवा कृत्रिमता नाही. कादंबरी वाचताना आपण माणदेशाच्या परिसरातच आहोत, असा भास होतो. ग्रामीण कादंबरीला अद्भुताच्या आणि कल्पनारम्यतेच्या कोंडीतून सोडवून वास्तव ग्रामीण कादंबरीचा आदर्श माडगूळकरांनी निर्माण केला, हे येथे पटते.

निसर्ग आणि मानवी जीवन ह्यांचे एकात्म रसायन माडगूळकरांच्या कादंबरीतून दिसून येते. आजच्या मराठी साहित्याला अनुभवाचा कसदारपणा बहाल करणारे जे विविध प्रवाह उदयाला आलेले आहेत, त्यामध्ये माणदेशी ग्रामीण साहित्याचा प्रवाह हाही एक मानला जातो. इ.स. १९४६ मध्ये लेखनाला प्रारंभ करणाऱ्या ह्या प्रतिभावंताने निसर्गाला जवळ केले. गुराख्याची पोरे जवळून पाहिली, पशुपक्षांचा अभ्यास केला, झाडाझुडपांचा अभ्यास केला व त्यातील ग्रामीण माणदेशी अस्सलपणा खुबीने रसिकांच्या मनात उतरवला.

व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण तपासत असताना माडगूळकरांच्या परंपरेचा विचार करावा लागतो. ज्या माणदेशात व्यंकटेश माडगूळकर जन्माला आले, तेथील सर्व ब्राह्मणी संस्कार त्यांच्यावर झालेले दिसून येतात. मातीशी इमान राखून आपल्याच मातीतील मेंढपाळांचे चित्रण करणारी 'बनगरवाडी'(१९५५) ही मेंढपाळांच्या गावची कहाणी आहे. वर्षानुवर्षे मेंढपाळ म्हणन व्यवसाय करणाऱ्या धनगर समाजाच्या अठराविश्वे दारिद्र्याचा प्रदेश म्हणूनच बनगरवाडीचे वेगळेपण सर्वदूर पाहोचले.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या आगेमागे माडगूळकर लिहू लागले. महायुद्धाची झळ, गांधीहत्या आणि पाठोपाठ उसळलेल्या दंगली अशा कारणांनी नागरी, तसेच ग्रामीणही जनजीवन ढवळून निघाले होते. माडगूळकर स्वतः १९४२ च्या चळवळीत सहभागी झाले होते. त्यांच्या 'कोवळे दिवस' (१९७९) ह्या माणदेशी कादंबरीत अशाच एका अल्पवयीन स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव

आलेले आहेत. गांधीहत्येनंतर गावोगाव जी दंगल उसळली आणि तिचा महाराष्ट्राच्या ब्राह्मण समाजावर जो दूरगामी भौतिक, मानसिक आघात झाला, त्याचे चित्रण 'वावटळ' (१९८५) मध्ये आलेले आहे. गांधीहत्येनंतरच्या दंगलीच्या काळात माणदेशात उद्भवलेल्या परिस्थितीचे चित्र पहा : "तालुक्याचे ब्राह्मण मामलेदार, जज्जसाहेब घाबरुन पळून गेले. लोकांना त्यांचा शोध लागला नाही. अधिकाऱ्यांचा हुकूम नसल्यामुळे फौजदारांना, पोलिसांना काही करता येईना. ते नुसते हवालदिल होऊन बघत राहिले. तासा दोन तासांत गावातील तीसपस्तीस घरे पेटली." (पृ. ८३)

माणूस आणि त्याच्या सभोवतालचा प्रदेश ह्यात एक घनिष्ठ आंतरिक नाते असते. साहित्यकृतीवर ह्या प्रदेशाचाही संस्कार झालेला असतो. प्रदेशाच्या संस्कारामुळे तेथील मने कशी घडतात, त्यातून त्यांची जीवनधारणा कशी बनते, ह्याचे दर्शन घडवण्याची व आपला प्रदेश चित्रित करण्याची प्रेरणा त्यामागे असते. माडगूळकरांच्या विशिष्ट संवेदनशीलतेमुळे ते अस्सल ग्रामजीवनाचा अनुभव घेऊ शकतात. त्यांच्या ह्या अनुभवात माणूस, पशू आणि निसर्ग एकरुप होताना दिसतात. तेथील कृषिजीवनाशी त्यांना ममत्त्व वाटते. माणदेशी संस्काराविषयी त्यांच्या अंत:कणात कृतज्ञता आहे. माणदेशाच्या वैराण मुलुखात व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या आयुष्याची जवळजवळ अठरा वर्षे घालविली. तेथे अंधश्रद्धा होती, दारिद्र्य होते, चूल पेटवण्यासाठी लागणारा विस्तू शेजाऱ्याकडून आणावा लागे. अठरापगड जातीच्या माणसांशी माडगूळकरांचा सपर्क यायचा. त्यांच्यासह माडगूळकरांनी गावातील उरुस, जत्रा, कुस्त्यांचे फड, कोल्हाट्यांचे खेळ समरस होऊन पाहिले. ह्या सर्व बाबींचा परिणाम माडगूळकरांच्या माणदेशी कादंबरीतील लेखनावर झालेला आढळतो.

एकंदरीत, माणदेशाच्या भूमीतील दैन्य - दारिद्र्य आणि त्याचवेळी तेथील माणसांचे समृद्ध मन ह्यांचा प्रत्ययकारी अनुभव माडगूळकरांच्या कादंबरीतून येतो. तसेच निरंतर लोकसंस्कृतीचा प्रत्ययही येतो. मातीचा सुगंध त्यातून जाणवतो. ह्यासंदर्भात सोमनाथ कोमारपंत म्हणतात, "तुमची वाट तुमच्या पायांना पाडू द्या. ही भूमी एवढी विशाल आहे की, नव्या वाटेसाठी तिच्यावर नित्य जागा असतेच. कोणासारखे होण्यासाठी खपू नका. स्वत:ला ओळखण्यासाठी खपा. प्रतिभावंतांची एकच प्रत निसर्ग काढतो आणि तो साचा मोडून टाकतो. एक झाड दुसऱ्या झाडासारखं नसतं. एक कलावंत दुसऱ्या कलावंतासारखा नसतो."[१५]

### ५.५.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांना आपल्या प्रदेशाविषयी आस्था होती. त्याचेच प्रतिक म्हणून 'बनगरवाडी' (१९५५) ह्या अक्षरकलाकृतीकडे पहावे लागते. माणदेशातील निसर्ग, शेती, प्रदेश, वातावरण ह्या सर्वांचे मिश्रण 'बनगरवाडी'त सूक्ष्मपणाने पहावयास मिळते. खिलारी जनावरे हे माणदेशाचे मोठे वैशिष्ट्य आहे. देशी म्हशी, शेळ्या - मेंढ्या व खिलारी गायी व खोंड हे पशुधन माणदेशात असल्याचे दिसून येते. तसेच नेपती, बोराटी, बाभूळ, लिंबारा, शेवगा हे वृक्ष माणदेशात असल्याचे दिसून येते.

व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी कादंबरीतून आपण एखादे चित्र पहात आहोत, असे वाटण्याइतपत प्रदेशाचे सूक्ष्म वर्णन आल्याचे दिसून येते. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत येणारे माणदेशाचे वर्णन असे :

"गावओढ्याच्या काठावर महारवाडा पसरलेला होता. ओबड - धोबड खोपटं पडवळ, घोसावळ्याचे वेल पांघरुन उभी होती. कुठं एखादं शेवग्याचं शेलाट झाड हलत होतं, कुठं एखादा लिबारा तरारला होता. वाटेवरुन वाहणाऱ्या सांडपाण्यात मुस्कटं बुचकळत डुकरं हिंडत होती - चमत्कारिक आवाजात ओरडत होती. काळ्या - बेऱ्या कोंबड्या हवेला लाथा देत खुराड्याकडे पळत होत्या. केसात शिरुन डसणाऱ्या गोमाश्यामुळे वैतागलेली कुत्री धुळीत लोळण घेत होती. महारांची नागडी - उघडी पोरं खेळत होती, भांडत होती." (पृ.५) माणदेशात गरिबी, दुष्काळ ह्या गोष्टी सतत असल्याचे ह्या व अन्य भौगोलिक चित्रणावरुन लक्षात येते. जीवघेणा कडक उन्हाळा हे माणदेशाचे एक प्रमुख वैशिष्ट्य होय. माणदेशातील सर्व घटक ह्या उन्हाळ्यामुळे कसे हैराण होतात, ह्याचे चित्रण पहा: "आता उन्हाळ्यांचे दिवस आले होते. रानातली लक्ष्मी नाहीशी झाली होती. उजाड वावरं उन्हाच्या झळ्या सोसत पडली होती. देवडीच्या ओढ्याचं पाणी आटलं होतं. गुरं - वासरं उन्हाळ्याला आरी पडून वाळली होती. आता वावरात आणि गावतही जिवाला करमत नव्हतं." ('पुढचं पाऊल', पृ. ६३) ह्यावरुन माणदेशात सर्वांना प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगावे लागते, हे लक्षात येते.

माणदेशातील भौगोलिक चित्रण पहात असताना तेथील प्राणिसृष्टीचाही विचार करावा लागतो. माणदेशात मेंढीपालन हा एक प्रमुख व्यवसाय चालतो. 'कोवळे दिवस'(१९७९) ह्या माणदेशी कादंबरीत मेंढरांच्याबरोबरीने येणारे प्रदेशाचे वर्णन असे : "माझ्यासमोर माळाकडून गावाकडं येणारी उभी गाडीवाट होती. ती ओलांडून काळ्या - पांढऱ्या मेंढरांचा थवा

अलिकडच्या मोकळ्या काळ्या रानात आला. पसरला. हरळी, कुरडू, शिप्पी असलं गवत दातलत माना खाली घालून तुरतुरु लागला. मागे बांधावर पांढरा मेंढका आणि त्याचं तांबडं मुंडासंही दिसलं. डोईवर तांबडंभडक मुंडासं आणि खांद्यावर काळीभोर घोंगडी हा वेष म्हणजे मेंढरंराख्यांचा गणवेषच.'' (पृ. ५३) ह्यावरुन माणदेशात मेंढरे कशी जगतात व त्यावर आधारित असलेल्या धनगरांचे जीवन कसे चाललेले असते, ह्याची नेमकी जाणीव होते.

निसर्गाच्या सानिध्यात एक जीव दुसऱ्या जिवाच्या आधाराने जगत असतो, स्वतःचे अस्तित्व जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो, ह्याची प्रचिती पुढील वर्णनातून येते. ''मेंढरांच्या मऊ पाठीवर बसून काळे कोतवाल पक्षी फेरफटका घेत होते. हा काही नुसताच मजेसाठी नव्हता. मेंढरांच्या चालण्यामुळे गवतातले टोळ, गवळणी, खरपुडे टणाटणा जमिनीपासून वर उडत होते आणि जमिनीवर चालण्यालायक पाय जवळ नसलेले कोतवाल हवेत गिरकी घेऊन खरपुडा चोचीत पकडून पुन्हा मेंढरापाठी साळसुदासारखे येऊन बसत होते.'' (पृ. ५३) अशा वर्णनामधून माणदेशातील भौगोलिकता साक्षात आपल्यासमोर उभी राहते. माणदेशात महत्त्वाचे पीक म्हणून ज्वारीचे पिक घेतले जाते व त्या पिकाचा प्राण्यांना वैरण म्हणून उपयोग होतो. खिलारी जनावरे ही माणदेशाला मिळालेली देणगी होय. पहा : ''रानातलं ज्वारीचं उभं पीक केव्हाच निघालं होतं. गुरं हिंडवायला रानं आता मोकळी होती. विहीर - बागाइतातल्या बांधावर हरळी, शिप्पी, कुरडू असलं गवत होतं. आता हरणीचं अंग पांढरं तुकतुकीत दिसू लागलं होतं. मुळात खिलार जातीची ही उत्तम कालवड होती.'' ('कोवळे दिवस', पृ. ७२)

माणदेशात कमी पावसावर येणारी पिकेच प्रामुख्याने घेतली जातात. त्यामध्ये ज्वारी, करडी, बाजरी, हुलगा ही पिके येतात. सगळीकडे माळाची जमीन आहे, त्याचे वर्णन 'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीत पुढीलप्रमाणे येते : ''आजुबाजूला पिवळ्याकरड्या रंगाचे माळ पसरले होते.पाहावे तिकडे उघडे माळ! अगोदर भगभगीत असलेले हे माळ उन्हाळ्यामुळे अधिक भगभगीत दिसत होते. क्वचित कुठे खोलगट भागात झाडाझुडपांचे हिरवे ठिपके होते. एरवी चोहीकडे दगडगोट्यांनी भरलेले माळ. नेपतीबोराटीची, बाभळमुरमुटीची खुरटलेली झुडपे आणि त्यामधून जाणारी, धुळीने भरलेली गाडीवाट.'' (पृ. २)

माणदेशात जरी सतत दुष्काळ पडत असला, तरी आहे ह्या परिस्थितीत तेथील लोक समाधानाने राहताना दिसतात. शेतात येणारे पीक कणसात आले की हुरडा खाणे, हा प्रकार माणदेशात दिसतो. पहा: ''हुरड्याच्या आगट्या ठिकठिकाणी पडल्या. भल्या सकाळी रानात

पेटलेल्या आगट्यांचा धूर आभाळात चढू लागला. तरण्या पोरांनी हुरड्याचा खुराक सुरू केला. म्हातारेकोतारेसुद्धा खलबत्त्यात कुटून हुरड्याची चव घेऊ लागले. बायकापोरी सवड काढून चार दाणे तोंडात टाकू लागल्या." ('बनगरवाडी', पृ. ६०) सततच्या दुष्काळामुळे चोरी करणे, धान्य लुटून नेणे, असे प्रकारही माणदेशात घडतात. ह्या संदर्भात 'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीतील पुढील वर्णन पहा : "ज्वारीची पिके निघाली. करडा निघाला. हरबरा निघाला. खळ्यांची धमाल सुरु झाली. लोकांनी खळी शिंपली. मोडणी झाली. मोगलीचे घाव कणसावर पडले. उपणणी झाली. वाऱ्याच्या झुळकीवर भुस्सा बाजूला गेला आणि मोत्यासारख्या ज्वारीची रास पडली. बारक्या बलुत्याची झिम्मड उडाली. राशी मोजल्या गेल्या. पाखरांनी, गुरांनी चोरांनी नेऊन उरले ते धान्य शेतकऱ्यांच्या घरी आले." (पृ. ६१)

माणसाने निसर्गावर कितीही मात केली, तरी शेवटी निसर्गापुढे माणूस हतबल ठरतो. माणदेशी माणूसही ह्याला अपवाद नाही. ह्यासंदर्भात आलेले चित्रण पहा : "जनावरे रोड झाली. त्यांच्या भकाळ्या दिसू लागल्या आणि अंगावर अस्वलासारखे केस वाढून ती मातकट दिसू लागली. लोकर कातरल्यामुळे अगोदरच भुंडी झालेली मेंढरे अगदीच बारीक झाली. त्यांची चरबी पार वाळून गेली. छपराचे जुने, कुजके काड उपसून लोक जनावरांपुढे टाकू लागले. पाण्यापायी मेंढरे लांबलांब न्यावी लागू लागली. चिमण्या, कावळे, होले दिसेनासे झाले. भुकेने वखवखलेले रानातले उंदीर गावात आले आणि त्यांनी धुमाकूळ घातला. धनगरांच्या घोंगड्या त्यांनी कातरल्या, पिठाच्या वासाने सुपे कातरली. दुरड्या कातरल्या." ('बनगरवाडी'; पृ. १२०)

एकंदरीत, माणदेशातील भौगोलिक चित्रण पाहता हा कमी पावसाचा प्रदेश आहे, हे लक्षात येते. कडक उन्हाळा, खुरटी झाडेझुडपे, भुकेने वखवखलेले जीव, दारिद्र्य, त्यातून निर्माण होणाऱ्या चोऱ्या हे चित्रण येथे पहावयास मिळते. तरीही माणदेशातील माणूस माणुसकीसाठी जिवाचे रान करताना दिसतो. हा त्या प्रदेशाचा संस्कार म्हणावा लागेल.

### ५.५.२. माणदेशाचे सामाजिक व सांस्कृतिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी चित्रण करणाऱ्या सर्व ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये बहुतांशी गावगाड्याचे चित्रण आलेले आहे. त्यात ग्रामीण परंपरा, स्त्री - पुरुष संबंध, जातीयता, दारिद्र्य, अज्ञान ह्या चित्रणाचा मोठ्याप्रमाणावर अंतर्भाव आहे. माणदेशात व्यक्तीचे भांडण जातीच्या पातळीवरती जाते. ह्याचेही चित्रण माडगूळकरांच्या माणदेशी

कादंबरीतून पहावयास मिळते. माणदेशातील अनेकविध जीवनाचे पैलू माडगूळकरांनी आपल्या कथात्मक साहित्यातून प्रकट केले आहेत. व्यंकटेश माडगूळकरांचे जीवन हे माणदेशाच्या जीवनरसावर पोसले आहे. त्यामुळे ग्रामीण लोकांकडे पाहण्याची त्यांची स्वतःची अशी वेगळी दृष्टी असल्याचे दिसून येते.

'बनगरवाडी' (१९५५) ह्या ग्रामीण प्रादेशिक कादंबरीमध्ये गावगाड्यातील सर्व गोष्टी व प्रादेशिकतेचे सर्व संदर्भ सहजतेने एकवटलेले दिसतात. ह्यासंदर्भात प्रा. अरविंद मंगरुळकर म्हणतात, " 'बनगरवाडी'त केवळ धनगरांच्या जीविताविषयी नाही, तर यापेक्षा अधिक काही आहे. मानवाचे दुःख, त्याची आगतिकता, तडजोड, त्याचे स्थाणुत्व, दुःख गिळण्याची मानवाची अपार ताकद, अशा कितीतरी जिव्हारी लागणाऱ्या गोष्टींचे एक अद्भुत रसायन यात आले आहे. रुढ अर्थाने या कादंबरीला कथानक नाही. पण धनगरांच्या वासना व दुःख यामुळे त्याला आकार सापडतो."[१६] ह्या कादंबरीत तेथील प्रदेश, माणसांची जीवन जगण्याची पद्धत, समाजातील काही संकेत, त्यांची अशी खास भाषा, त्यांची श्रद्धास्थाने, सवयी ह्यांचा प्रामाणिकपणे विचार आलेला दिसून येतो. ह्यासंदर्भात ल. ग. जोग म्हणतात, "त्यांच्या पहिल्याच कादंबरीने जी उंची गाठली, त्यामुळे आता लेखन करताना त्यांचे त्यांनाच अडू लागावे व लेखनातून निवृत्त व्हावे, अशी भावना निर्माण करील, इतकी अद्वितीय आहे ही कादंबरी 'बनगरवाडी'."[१७]

• माणदेशी रुढी - परंपरा :

माणदेश हा सततच्या दुष्काळामुळे आणि प्रतिकूल वातावरणामुळे खूपच मागासलेला भाग राहिला आहे. ह्या मागासलेपणामुळे माणदेशी माणूस जुन्या काळातील बऱ्याच रुढी - परंपरा आजही आपल्याबरोबर जतन करताना दिसतो. ग्रामीण भागात बारा बलुतेदारांची पद्धत अस्तित्त्वात होती. त्यातून गावगाड्यातील कोणती कामे कोणत्या समाजाने करावयाची, ह्यांची परंपरा ठरलेली दिसून येते. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत कृष्णा महाराला परंपरेनुसार गावातील लोक कसे बोलतात, ते पहा : "बरा आलास. आता एवढं फोडून जा. सकाळचा चहा थटलाय सर्पणापायी." (पृ. १३)

ग्रामीण समाजव्यवस्थेत एकत्र कुटुंबाला महत्त्वाचे स्थान असते व ह्यात कुटुंबात सर्व घटकांना स्थान असते. सर्वांनी मिळून - मिसळून एकत्रित रहावयाला पाहिजे, हे ग्रामीण कुटुंबव्यवस्था मजबूत राहण्यापाठीमागील महत्त्वाचे कारण असावे. सध्या 'राजा - राणी'

कुटुंबव्यवस्था शहरात अस्तित्वात आलेली आहे. माणदेश ह्याला अपवाद आहे. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत घरातील सून सासऱ्यासह सर्वांना जीव लावून सांभाळते. ते वर्णन पहा : ''भरल्या कपाळानं गेली ती... तिच्या म्हागारी काय उणं पडू दिलं न्हाईस, पोरी. रामाचं राज नांदवलंस घरात !'' (पृ. ५०) माणदेशातील लोक जुन्याच परंपरा डोक्यांत ठेवून निर्णय घेतात. त्याविषयीचे वर्णन पहा: '' अरं, मोटारीनं जानं खरं न्हवं. आपन कुटं इकतं तालेवार हाय ? आन् वारी पायीच करावी.'' (पृ. ११४) ह्यावरुन माणदेशातील लोक जुन्या रुढी - परंपरा पाळताना दिसतात.

माणदेशात धनगर समाज मोठ्याप्रमाणावर आढळतो. ह्या धनगरांचा आणि इतर जगाचा प्रत्यक्ष संबंध फारसा येत नाही. त्यामुळे ही लोक जुन्या परंपरा जतन करताना दिसतात. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीत धनगरांना मेंढराचे नवीन खांड करावयाचे असेल, तर त्यासाठी असलेली प्रचलित परंपरा पहा: ''नव्याने मेंढरे करायची झाली, तर मालकाला मेंढरे विकत घेऊनच सुरुवात करावी लागत नाही. असा माणूस खोबऱ्याची एक वाटी आणि त्यावर थोडा भंडार घालून चांगल्या मेंढक्याकडे जातो आणि ती खोबऱ्याची वाटी देऊन त्याला म्हणतो, 'मी बेणं करतोय''' (पृ. ३१) ही एक माणदेशातील समता प्रस्थापित करणारी जुनी परंपरा सुशिक्षित माणसाला विचारप्रवृत्त करणारी खास माणदेशी परंपरा म्हणावी लागेल.

माणदेशातील माणसाचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. त्याठिकाणी कृषिकेंद्रित ग्रामव्यवस्था अस्तित्वात आहे. ग्रामव्यवस्थेतील चित्रणात सर्व जातिधर्माचे लोक सुखाने एकत्रित नांदताना दिसतात. कारण वर्षभर शेतात पीक जोपासायचे आणि ते काढल्यानंतर वेगवेगळ्या समाजातील लोक बलुतं मागण्यासाठी शेतात येतात. त्या मोबदल्यात ते लोक शेतकऱ्यांची वर्षभर सर्व कामे कोणताही मोबदला न घेता करुन देतात. ह्यात बलुतेदारांबरोबर अलुतेदारांची संख्याही भरपूर असल्याचे दिसून येते. ते वेगवेगळ्या प्रकारचे करमणुकीचे खेळ करुन दाखवतात व शेतकऱ्यांकडून धान्याच्या रुपाने मोबदला वसूल करतात, ही परंपरा 'बनगरवाडी' (१९५५) ह्या माणदेशी कादंबरीत दिसून येते. त्याचे वर्णन पहा : ''कोल्हाटी येऊन उड्या मारु लागले. दरवेशी येऊन अस्वल खेळवू लागले, गारुडी हातचलाखी दाखवू लागले. हे खेळ बघून लोक मन रिझवू लागले, हसू लागले. खूष होऊन शेर - पायली धान्य गारुड्याला, कोल्हाट्याला दरवेशाला देऊ लागले.'' (पृ. ६१) 'पुढचं पाऊल' (१९५०) मध्येही ही परंपरा दिसून येते. पहा : ''माजलाय लेको तुम्ही अलीकडं. कामं ऐकत नाही. खळ्याच्या वेळी तेवढे येता नाही रे ? धेड साले !'' (पृ. १३)

माणदेशात ब्राह्मण समाजाला मानाचे स्थान असल्याचे दिसून येते. गाईला हिंदू धर्मात देवता समजले जाते. माणदेशात खिलारी गाय घरात असणे म्हणजे तिच्यापासून मिळणारा खिलार खोंड व खाण्यासाठी दूध मिळेल, असा व्यावहारिक दृष्टिकोन दिसतो. ब्राह्मणाच्या दारामध्ये मात्र गाय असणे, हे माणदेशी परंपरेचे लक्षण म्हणावे लागेल. "कोवळे दिवस" (१९७९) ह्या कादंबरीतील पुढील वर्णन पहा : 'राजा, मला काही आता ह्या कालवडीमागं रानोमाळ हिंडणं व्हायचं नाही, तूच तिला सांभाळ. चांगली जोपासलीस, तर हजार - बाराशाचा खोंड मिळंल. शिवाय थोडंफार दूधदुभतं होईल आणि ब्राह्मणाच्या दारात गायी असावी.' (पृ. ४६)

माणदेशी माणूस सहज कोणावरही विश्वास ठेवतो. तो मंत्र - तंत्र, गंडेदोरे ह्यावरही विश्वास ठेवतो. माणदेशी ग्रामीण परिसरात साप निघाल्यावर किंवा दिसल्यावर मांत्रिकाच्या साहाय्याने मंत्र मारला जातो. हे चित्रण जुन्या काळापासून परंपरेने चालत आल्याचे दिसते. 'करुणाष्टक' (१९८२) ह्या कादंबरीतील पुढील वर्णन पहा : "लिंबू, कुंकू, ऊद, उडीद असे काहीबाही मागून घेऊन त्यानं एका बाजूला जाऊन ही वाळू मंतरली आणि पानाभोवती रांगोळी घालावी, तशी ती घराभोवती पेरली." (पृ. १६)

एकंदरीत, माणदेशात जुन्या काळापासून चालत आलेल्या मंत्र - तंत्र, बुवाबाजी अशा जुनाट कल्पना परंपरेच्या रुपाने शिल्लक आहेत, असे दिसते.

• माणदेशातील जातियतेचे चित्रण :

माणदेश हा भाग मागासलेला असल्यामुळे तेथे जातीयता दिसून येते. वेगवेगळ्या जाती-धर्माशिवाय कोणत्याही खेड्याला परिपूर्णता प्राप्त होऊ शकत नाही. कारण ग्रामीण भागातील दैनंदिन व्यवहार हे एकमेकांवरती अवलंबून असतात. त्यातूनच जाती - जातीतील उच्च - नीचता ठरवली जाते. प्राचीन काळापासून वर्णव्यवस्था अस्तित्वात आहे. त्यात ब्राह्मणांकडे विद्येचा अधिकार असल्यामुळे तो समाज प्रगत असल्याचे जाणवते. साहजिकच संपूर्ण गाव त्यांना घाबरुन वागतो, ह्याचे वर्णन 'वावटळ' (१९८५) ह्या माणदेशी कादंबरीत आलेले आहे. ते असे : म्हातारा म्हणतो, "अरं तीच्या मायला !"

"तर वं ! जातच म्हनलिया बामनाची. जानवी तिडा घातल्याबिगार राहील कां ?"

"हे मातुर खरं हाय."

"आन् मंग ?" (पृ. २३)

माणदेशात दलित समाजाला अतिशय हीनतेची वागणूक मिळते. दलित असली, तरी तीसुद्धा माणसे आहेत, ह्याचा माणदेशात कोणीही विचार करीत नाही. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या माणदेशी कादंबरीतील हे चित्रण पहा: 'माजलाय लेको तुम्ही अलीकडं. कामं ऐकत नाही. खळ्याच्या वेळी तेवढे येता नाही रे ? धेड साले ! ' (पृ. १३) ह्या चित्रणावरुन माणदेशात उच्चं जातीतील लोक दलितांना तुच्छतेची वागणूक देतात व त्यातूनच जातीयता जोपासली जाते, हे दिसून येते.

माणदेशात जातीयता जोपासण्यात फक्त पुरुषच आघाडीवर आहेत, असे नाही; तर माणदेशी स्त्रियासुद्धा ह्याला अपवाद नाहीत. दैनंदिन जीवनात ज़े आपल्या डोळ्यांना दररोज दिसते. त्याचा नकळत परिणाम आपल्या मनावर होतो. माणदेशातील पुरुष दलितांना जातीवरुन बोलतात, ते स्त्रियांना ऐकावयास मिळते आणि त्यासुद्धा आपला तोरा ह्या समाजावर मिरवण्यास मागेपुढे पहात  नाहीत. उदाहरणार्थ , 'पुढंच पाऊल' (१९५०) ह्या माणदेशी कादंबरीत तात्याकाकांच्या घरासमोर देवा महार येतो आणि मोठ्याने ओरडून पोटाला मागतो, तेव्हा तात्याची बायको देवाला म्हणते, ''पण मागायचा हक्क तेवढा राखून ठेवलाय तुम्ही. काम करता का मेल्यांनो कधी ? चार लाकडाच्या फाळी काढ म्हटलं तुझ्या गण्याला, तर मला रोजगार आहे म्हणून निघून जातो.'' त्यावर देवा मऊ शब्दांत बोलतो, 'परपंच वाढलाय आई, रोजगार करावा लागतो.' त्यावर बाई म्हणतात, 'मुलगा धाडलास मुंबईला, त्याच्या मनिऑर्डरी येत असत्याल.' त्यावर देवाला राग येतो आणि सणाच्या वाढणाची वाट न बघताच चालू लागला. यावर ती बाई म्हणते, ''द्वाड ! म्हार ते म्हार आणि राग कसा नाकावर आहे की !'' (पृ. ९६) ह्यावरुन माणदेशात पारंपरिक पद्धतीची जातीयता शिल्लक आहे, हेच लक्षात येते.

- माणदेशातील दारिद्रय :

माडगूळकरांच्या माणदेशी कादंबरीतील दारिद्रय हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे. कारण दारिद्रय  हे माणदेशाच्या पाचवीलाच पुजलेले आहे. अशा दारिद्रयाचे ताकदीने केलेले चित्रण कादंबरीत दिसून येते. माडगूळचा परिसर हा कायमस्वरुपी दुष्काळी आहे. अशा लोकांच्या अंत:करणात प्रवेश करुन माडगूळकरांनी माणदेश चित्रित केलेला आढळतो. जीवन जगण्यासाठी पैसा आणि धान्य लागते. माणदेशात हेच मिळवण्यासाठी जिवाचा आटापिटा करावा लागतो. व्यापारी कोणताही असला, तरी तो स्वत:चा स्वार्थ बघतो. परंतु भौगोलिक

वातावरणामुळे माणदेशातील व्यापारीसुद्धा व्यापाऱ्याला न शोभणारे बोलून जातो. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीतील वर्णन पहा : "अरं, दोन दिस पुरलं असतं हे जोधळं. फटाकड्या काय, जळून राख व्हायच्या !" (पृ. १००) ह्यावरुन एक व्यापारी असे बोलतो, हेच माणदेशी जीवनचित्रणाचे वेगळेपण म्हणावे लागेल.

'दारची शेरडी आटली. घरात दुभत्याचा दुष्काळ आला. देवाच्या काल्याला दूध मिळेनासं झालं. सकाळ - संध्याकाळ कोरड्याशात भिजवलेली भाकरी अगर पातळ कण्या यावरच त्याचं जेवण होऊ लागलं.' (पृ. १०२) ह्यावर्णनावरुन माणदेशातील दुष्काळामुळेच तेथे दारिद्र्य आल्याचे दिसते.

माणदेशातील दारिद्र्याविषयी स्वत: कादंबरीकार 'कोवळे दिवस' (१९७९) ह्या कादंबरीत म्हणतात, "प्रवास करायचा, तर बैलगाडी, घोडा, नाही तर स्वत:चे पाय. इथं ना पोस्ट, ना आठवड्याचा बाजारहाट. पाऊसकाळ लहरी. गावचे बहुसंख्य रहिवासी सदैव अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीन मूलभूत गरजांच्या फिकिरीत असलेले,हा आमचा अडाणी मुलूख, ही आडवळणी दुष्काळी खेडी म्हणजे साक्षात दैन्यभूमी होती." (पृ. ५२) ह्या वर्णनावरुन माणदेशाला सतत दारिद्र्याशी सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास येते. ह्यातून माणदेशी माणसांना सतत आर्थिक अडचणींशी सामना करावा लागतो. एक रुपयासुद्धा त्यांना प्राणाहून प्रिय असतो. एकतर माणदेशी माणूस जास्त श्रीमंत असलेला दिसून येत नाही. त्यामुळे स्वत:जवळचे काही थोडे रुपये जे असतात, ते त्यांना जास्त महत्त्वाचे वाटणे साहजिक आहे. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या माणदेशी कादंबरीत आलेले चित्रण पहा: 'रात्री घरी आणून त्याने तो रुपया माझ्यापाशी दिला. एखादे जडजवाहीर देतात तसा दिला. तो देताना त्याचा जीव धाकधूक करत होता, हे मला समजले. रुपया मास्तरने खाल्ला तर?' (पृ. २९)

माणदेशातील माणूस सर्वत्र पिचलेला, दडपलेला, धास्तावलेला दिसून येतो. त्याला कारण त्याठिकाणची प्रतिकूल परिस्थिती हे आहे. निसर्गाशी सतत टक्कर देऊन त्याचा स्वभाव संयमी बनलेला दिसतो. आलेल्या परिस्थितीला तोंड देऊन त्यातून मार्ग काढत जीवन जगत रहावयाचे हा आशावाद त्याच्याठिकाणी असल्याचे पुढील चित्रणावरुन जाणवते: "काडाने शाकारलेली घरे गळू लागली. सुरेख सारवलेली जमीन ठिकठिकाणी ओली होऊन उखणू लागली. तेव्हा धनगरणी चरफडल्या आणि गळणाऱ्या जागी त्यांनी लहानमोठी भांडी ठेवून दिली. धाब्याच्या घरातून गळू लागले, तेव्हा धनगर रिकामी पोती घेऊन माळवदावर चढले.

जिथे पाणी साचले होते, माळवदाला भोक पाडून आत शिरत होते, ती भोके त्यांनी दगडमाती घालून तात्पुरती बुजवली.''(पृ. ३५)

दुष्काळ आणि दारिद्र्य हे माणदेशी माणसाच्या मागे कायमस्वरुपी लागल्याचे दिसून येते. 'बनगरवाडी' (१९५५) तील पुढील चित्रण पहा: ''दुष्काळी मुलूख ओलांडायचा आणि पलीकडे जायचे. मग ते ठिकाण कितीही दूर असो, कुठेही असो. धनगर तिथे पोचणार होते. घेता येईल तेवढे सामानसुमान पाठीवर घेऊन धनगर बाहेर पडले. बें - बें करुन ओरडणाऱ्या मेंढरांना हाकलीत, त्यांच्या थकलेल्या पोरांना उराशी उचलून घेत त्यांची माया सुरु झाली.'' (पृ. १२६) ह्यावरुन दारिद्र्यामुळेच माणदेशी धनगरांना आपल्या गावापासून पोरके व्हावे लागल्याचे दिसून येते. ह्यावरुन माणदेशात पराकोटीचे दारिद्र्य असल्याचे दिसते.

- माणदेशातील अज्ञान व अंधश्रद्धा :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रातील इतर प्रदेशांमध्ये सुधारणा झाल्या, तशा माणदेशात सुधारणा न झाल्यामुळे हा प्रदेश मागासलेला राहिला. पारंपरिक पद्धतीने ज्या अनेक रुढी - परंपरा चालत आलेल्या आहेत, त्याच माणदेशात अज्ञानातून व अंधश्रद्धेतून पुढे चालू असलेल्या दिसतात. माणदेशातील बहुतांशी समाज हा सरळमार्गाने जीवन जगणारा आढळतो आपण आणि आपले काम एवढ्यापुरते मर्यादित त्याचे जग असल्याचे दिसते. ह्यामुळेच अनेक गोष्टीत त्याचे अज्ञान दिसून येते.

'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत येणारे पुढील चित्रण पहा: 'सांग जा डागदाराला, आमची माणसं म्हायेरला गेल्यात म्हणून. कोण येतंया खरं - खोटं बघायला?' (पृ. १५) ह्यावरुन माणदेशातील माणूस सरळपणाने हे बोलताना दिसतो. परंतु ग्रामीण भागात कोणतीही गोष्ट लपून राहू शकत नाही, ह्याची जाणीव त्या येदू लिगाड्याला नसते. हे सर्व अज्ञानामुळे घडत असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीमुळे संपूर्ण माणदेशात शिक्षित लोकांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. निरक्षरांचे प्रमाण तुलनेने जास्त आहे, हे पुढील चित्रणावरुन दिसून येते : ''आता मला काय येतंय जी ? तुमीच आपलं समजून लिवा की सविस्तर अक्षी. बावऱ्यानाना, भोजाला दंडवत लिवा. रखमाची खुशाली, पोरं कशी हायेत, म्हाताऱ्याला कामाला लावू नगंस म्हणावं गनाला - तूच कर...'' (पृ. ६२)

सध्याच्या आधुनिक काळाचा विचार करता जातीयता बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येते. माणदेशात मात्र पारंपरिक जातीयता जोपासली जाताना दिसते. तेथील माणसांना

अज्ञानामुळे जातीयतेचे काहीच वाटत नाही. कारण त्यांची मने दडपलेली आहेत, प्राप्त परिस्थितीत समाधान मानून ते अज्ञानाचे प्रदर्शन करताना दिसतात. ह्यासंदर्भात पुढील चित्रण पहा : 'हक्कच हाय तुमचं उष्टं खाण्याचा आई आमचा !' (पृ ९६) ह्यावरुन माणदेशात अज्ञानामुळे पारंपरिक जातीयता पाळली जात असल्याचे दिसून येते.

माणदेशामध्ये परंपरागत मेंढीपालन व्यवसायामुळे शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. शासनाच्या धोरणानुसार प्राथमिक शिक्षण सर्वांना आवश्यक म्हटले, तरी त्याला माणदेशात म्हणावा असा प्रतिसाद दिसत नाही. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीतील चित्रण पहा : 'हायेत, बक्कळ हायेत. आन् हुत्याल की, दरसाल दहाईस लगीन उभं ऱ्हातंय. पोरं हुत्याल. तू शिकवायचं काम कर म्हंजे झालं.' (पृ. ६-७) ह्यावरुन शाळेत जाण्यासाठी सहा वर्षावरील मुलांना परवानगी आहे. हेही अज्ञानामुळे माणदेशातील लोकांना माहीत नसल्याचे दिसते. मास्तराने शिकवण्याबरोबर प्रत्येकाला हातभार लावलेला असतो. परंतु माणदेशातील अडाणी लोकांना आपण मास्तरला कोणती कामे सांगितली पाहिजेत व कोणती सांगायला नकोत, हेसुद्धा अज्ञानामुळे कळत नसल्याचे चित्रण पहा : "मास्तर, एक बैल बगून दे की मला. पेरनी थटली गा !"
"तू मागितलास म्हंजे मिळेल माझ्यापाशी एकच हाय. एक मेला. दुसरा मिळाला तर पेरीन. न्हाई तर वरीसभर उपाशी मरन्याची पाळी हाय." यावर मास्तर म्हणतात, "मग मी कुणापाशी मागू?"
"ते तू काय बी कर, पण माजी नड भागव. सगळं गाव म्हणतं, मास्तर येळंला येतो, अडचण वळकतो. मग माझ्याएकीच का असं?" (पृ. ३८-३९) ह्यावरुन 'बनगरवाडी' ह्या कादंबरीत शेकूचे अज्ञान स्पष्टपणे चित्रित झालेले आढळते.

माणदेशात चालत आलेल्या परंपरागत अंधश्रद्धा दिसून येतात. एखाद्याच्या वंशाला वारस नसेल, तर त्याची संपत्ती जो कोणी घेईल, त्याचे चांगले होत नाही, अशी एक अंधश्रद्धा माणदेशात आढळते. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या प्रादेशिक कादंबरीत आलेले ह्याविषयीचे चित्रण पहा: "म्हणजे या जागेला आता कोणी वारसा उरलेला नाही. मग तालमीसाठी ती घ्यायला गावाला काहीच हरकत नाही. पण याही गोष्टीला कोणी तयार होईना. वाण्याची जागा कशी घ्यावी म्हणून जो तो गप राहू लागला." (पृ. ८०) ह्यातून वाण्याची जागा घेणे म्हणजे आपल्या कुटुंबाचे वाटोळे होणे, अशी अंधश्रद्धा माणदेशात असल्याचे दिसून येते.तसेच माणदेशात मुले होण्यासाठी आजही लोक देवाला नवस करताना दिसून येतात. शेकूच्या

बायकोला लग्न होऊन बारा वर्षे झाली, तरी मुले होत नाहीत. तेव्हा ती म्हणते, "पोर न्हाई ते खरं हाय. पर कुटं आता इस्टेट वाया चाललीय ? आन् आपली पुण्याई असली, तर देव दील की. का वं ?" (पृ. ११२-११३). ह्यावरुन माणदेशी साधा माणूस अंधश्रद्धा कशी जोपासतो, ते स्पष्ट होते.

माणदेशातील लोकांचा सतत शेती, मेंढरे, रानातील रानपक्षी ह्यांच्याशी संबंध येतो. त्यातून त्याचप्रकारच्या रूढी, अंधश्रद्धा निर्माण होताना दिसतात. माणदेशात ह्यासंदर्भात एक म्हण प्रचलित असलेली दिसते. ती म्हणजे, 'कावळा बसायला आणि फांदी मोडायला गाठ पडली' म्हणजे प्रत्येक गोष्टीच्या पाठीमागे तार्किक कारण असते. तरीही माणदेशी समाज तो मानयला तयार होत नाही. त्यातून त्याची अंधश्रद्धाच प्रबळ असलेली दिसून येते. 'बनगरवाडी' (१९५५) मध्ये ह्यासदंर्भात आलेले चित्रण पहा: 'काही मेंढरांचे पाय लुळे पडले आणि ते ओढत ती चालू लागली. लोक म्हणू लागले, मेंढराला व्हल्याने व्हलगाडले, तांबडा व्हला त्याच्या पाठीवर बसला आणि उडताना त्याने पंखे मारली, त्यामुळे जखमी मेंढरु कमरेपासून लुळे पडले.' (पृ. १२१) ह्यावरुन माणदेशात वातावरणाशी निगडित अशाच अंधश्रद्धा समाजमानसात प्रचलित असल्याचे दिसून येते.

- माणदेशातील स्त्री - पुरुष संबंध :

माणदेश हा सुरुवातीपासूनच मागासलेला प्रदेश असल्याचे दिसून येते. त्यामुळे आपल्या प्रचलित परंपरेनुसार माणदेशातही पुरुषसत्ताक पद्धती अस्तित्वात असलेली दिसते. त्यामुळे स्त्रियांना गौण स्थान दिले जाते. परंतु समाजाच्या स्त्रीविषयीच्या भावना अत्यंत टोकाच्या असल्याचे दिसून येते. तसेच तेथे पुरुषाला वेगवेगळी व्यसने (दारु, बाई, तमाशा इ.) असल्यामुळे संसाराचा गाडा स्त्रीलाच ओढावा लागतो. सामाजिक बंधनामुळे ती ह्या परिस्थितीला काहीही करु शकत नाही. प्राप्त परिस्थितीला निमूटपणे शरण जावयाचे आणि जिवंत असेपर्यंत मरमर कष्ट उपसावयाचे, अशी स्त्रियांची जीवन जगण्याची पद्धत असल्याचे दिसून येते.

सततच्या दुष्काळामुळे पुरुष हे स्त्रीच्या जिवावर संपूर्ण कुटुंबाला सोडून दुसऱ्या गावी पोटभरण्यासाठी म्हणून निघून जातात. लहान मुलांना संभाळता संभाळता स्त्री बेजार होते. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीतील स्त्रीचे पुढील चित्रण पहा : 'पटकी येऊन मरंनास का एकवार. चार दिस रडीन आन् मोकळा व्हईन. अरं, तुला घातला मातीत- एवढा घोडा

झालास, तर तुला गुरं संबाळायची कशी कळत न्हाईत ? आता कोंडवाडा भर आईला इकून !' असे तोंडाला येईल ते बडबडायची आणि राग शांत झाल्यावर मालकाकडं जायची आणि पदर पसरुन म्हणायची,

'तुमच्या पायाची धूळ जी मालक आमी, एकवार माफी करा. चार जोडं हाना शिवट माज्या टकुऱ्यात, पन गुरं सोडा.' यावर मालक म्हणायचा,

'साले धेड, तुमी असलंच. पाया पडायच्या निमतानं साखळ्या काढून घेणारी जात तुमची. तू चालती हो.' (पृ. १०३) ह्यावरुन माणदेशात स्त्री-पुरुष संबंध हे वेगवेगळ्या पातळीवरील असल्याचे दिसून येते.

माणदेशात स्त्रीला पळवून नेण्याचे प्रकार सर्रास होताना दिसतात. परंतु त्यातून पुरूष रागाला जाऊन त्या स्त्रीचे जीवनच उध्वस्त करतो, ह्याचे चित्रण 'कोवळे दिवस' (१९७९) ह्या माणदेशी कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेले आहे : 'ताई तेलिणीच्या रुपवान मुलीनं आपला पहिलवान नवरा टाकला आणि पलटणीत हवालदार म्हणून हुद्दा कमावलेल्या आपल्या धाडसी याराचा हात धरुन ती परगावी गेली. त्याच्याबरोबर राजरोस राहू लागली, तेव्हा नवऱ्याच्या कुणा भाऊबंदानं तिला हिकमतीनं आडरानात बोलावून तिच्या साजऱ्या नाकाचा शेंडा काकडीच्या बुडक्यासारखा चाकुनं उडवला. तिला जन्माची बेरुप केली. बापडीच्या उभ्या आयुष्याचं पोतेरं झालं.' (पृ. ३७) ह्यावरून माणदेशात स्त्री - पुरुष ह्यांचे गैरसंबंध स्वीकारले जात नाहीत, हेच दिसून येते, तसेच तरुण मुला - मुलींनी एकत्रित फिरणे, गप्पा मारणे ह्याचेही वेगळे अर्थ काढले जातात. यमू आणि स्वत: कादंबरीकार लहानपणापासून एकत्रित वाढल्यामुळे बाजारला जातात. ठरलेल्या वेळी ते घरी परत येत नाहीत. तेव्हा यमूचा चुलता कादंबरीकाराच्या घरी चौकशीसाठी येतो, तेव्हाचे चित्रण पहा : 'यमीचा चुलता. म्हणे, सकाळी बाहेर पडलीय. कधीही, अंधार झाल्यावर बाहेर राहात नाही ती. आज तुमचा मुलगा सोबत आहे, म्हणे, तिच्या अजून दोघं का आले नाहीत, म्हणून चौकशी करायला आलो.'
हे ऐकून मी चकित झालो.

'यमू माझ्याबरोबर नव्हतीच परत येताना. मी एकटा आलो. ती बैलगाडीतनं आली वाटेकऱ्याच्या'. (पृ. १०८) ह्यावरुन तरुण मुला-मुलींची निखळ मैत्रीसुद्धा माणदेशात संशयाच्या भोवऱ्यात अडकलेली दिसून येते.

माणदेशात लहान - सहान प्रसंगावरुनही स्त्री - पुरुष संबंध ताणले गेलेले दिसून येतात. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या माणदेशी कादंबरीत कारभाऱ्याची मुलगी अंजी ही मास्तरांना चोळी शिवून आणण्यास सांगते. ह्यावरुन मास्तर व अंजी ह्यांचे संबंध गावातील काही लोक प्रस्थापित करताना दिसून येते. ह्याविषयीचे चित्रण असे: 'अंजीने उगीच पदर सावरला. ती मुरडमुरड मुरडली आणि म्हणाली,

"तालुक्याला कधी जायचं आता, मास्तर !"

"जाणार उद्या सकाळी का ?"

"आमचं काम कराल का एक?"

"सांग की. करण्यासारखं असेल, तर करीन."

अंजी म्हणाली, "माजी एवढी चोळी शिवून आना !"

चोरुन करतीया बगा. म्हाताऱ्याला सांगू नका आमच्या. रोजगार करुन मी पैसं साटवलं आन् खन घेतला. दोन महिनं झालं, अजून शिवणंच झालं न्हाई. शिवून आना म्हंजे मी पैसं दीन शिवनावळीचं !' (पृ. ४७) ह्यावरुन ग्रामीण भागातील मास्तरवर गावातील जणू प्रत्येक व्यक्तीचा हक्कच आहे, अशा पद्धतीचे स्त्री - पुरुष संबंध ह्या माणदेशी चित्रणावरुन दिसून येतात. खेड्यापाड्यात धर्मादाय संस्थेच्या मदतीने माणसांच्या विकासासाठी काही नवीन करणाऱ्या माणसाला काहीतरी गालबोट लावून गावाच्या बाहेर फेकून देण्याची रीत स्वातंत्र्यानंतरही आजतागायत चालू असलेली दिसून येते.

पोरीबाळींचा आळ घेऊन गावभर बोंब मारणाऱ्या मोकाट माणसांचा व्यवहार 'बनगरवाडीत' दिसून येतो. जुन्या काळात कुणाच्याही पोरीबाळींकडे बघणे, हा गुन्हा समजला जायचा. कोणत्याही खेड्याचा मानवी व्यवहार हा गुंतागुंतीचा असतो. कारभाऱ्याची मुलगी अंजी ही मास्तरवर भीत भीत का होईना, जीवन ओवाळून टाकण्याचा भास निर्माण करते. त्याचा फायदा घेऊन जगन्या रामोशी मोकाटपणाचे धंदे कसा करतो, ह्याचेही चित्रण 'बनगरवाडीत' आलेले आहे. दुसऱ्याची बाई पळविल्यानंतर कुणाच्या तरी अंगाची लाही लाही होते आणि ही सुडाची भावना दुसऱ्याच्या जिवावर उठते. ह्याविषयीचे चित्रण पहा : "आम्ही वांगीची माणसं हाय. तुमच्या गावच्या जगन्या रामुशानं वांगीची, आमच्या जातीतली एक रंडकी बाई काढून नेलीय, त्येला बगायला आम्ही आलोय." (पृ. १००) लोक म्हणाले, "जातोय कुटं ! जितं असंल, तितनं आमी हुडकून काढू आन् मारु" (पृ. १००) ह्यावरुन माणदेशात अनैतिक संबंधाबद्दल लोकांच्या भावना तीव्र असल्याचे दिसून येते.

- स्वत्वाची जाणीव :

माणदेशात जरी सगळीकडे पारंपरिक पद्धतीचे व्यवहार दिसत असले, तरी काही ठिकाणी अन्यायाचा अतिरेक थांबवण्यासाठी आपण काही तरी केले पाहिजे, पारंपरिक रुढी - परंपरा नाकारुन किमान माणूस म्हणून जीवन जगले पाहिजे, असाही एक सूर पहावयास मिळतो. माणदेशातील देवडी गावात देवी डॉक्टर येतो. गावातील तराळकीचे काम कृष्णा महार करीत असतो. तो गावात सगळीकडे दौंडी देतो. परंतु लहान मुलांना टोचण्यासाठी कोणीही येत नाही. तेव्हा डॉक्टर कृष्णावर उसळतो. त्याला आई - बहिणीवरून, जातीवरुन शिव्या देतो. तेव्हा कृष्णाला राग येतो. कारण माणूसच माणसाचा वैरी असलेला ह्याठिकाणी दिसून येतो. येथे फक्त कृष्णाची गोड बोलण्याची अपेक्षा असते. परंतु गरिबी व जात ह्या दोन गोष्टी माणदेशात प्रबळ असल्यामुळे कृष्णा हा माणूस असूनही त्याला किंमत मिळत नाही. त्याला राग अनावर होतो, असे मुर्दाड जीवन जगण्यापेक्षा स्वत्वाने ताठ मानाने जीवन जगावे, असे त्याला वाटते. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या माणदेशी कादंबरीत ह्याविषयी आलेले वर्णन पहा : "डागदार सायेब, उगंच तोंड वाजवू नका. माझं काम मी चोख केलंया." डॉक्टरला उलटं बोलून घ्यायची सवय नव्हती. 'साल्या धेडा, उलटूनं बोलतोस ? तोंड फोडीन.' कृष्णाचा राग अनावर होतो. दात - ओठ खात तो ओरडतो. 'ये, चावडीच्या खाली ये सायबा, बचाळी उपसून हातात देतो तुझ्या.' (पृ. २२-२३) ह्यावरुन माणदेशातील सामाजिक विषमता स्पष्टपणे दिसून येते. ह्या विषमतेमधूनच स्वत्त्वाची जाणीव प्रबळ बनल्याचे दिसून येते.

प्रत्येक जातीमधील लोकांनी खेड्यात कोणते काम केले पाहिजे, हे ठरलेले असते. रामोशांनी शेतीची व गावाची राखण करणे, कोणाची चोरी झाल्यास त्या चोरीचा माग शोधून काढणे, ही कामे करावी लागत. माणदेशात रामोशांना ह्या कामाचा विशेष अभिमान वाटतो, असे दिसते. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या माणदेशी प्रादेशिक कादंबरीतील पुढील वर्णन पहा : "रामुशाचं बीज सांगणार न्हाई. मसनात जाऊ द्या त्येला, मास्तर. मागावर जाऊन आनतो का न्हाई बगा !" (पृ. १०२) 'बनगरवाडी'त जेव्हा जगन्या दुसऱ्याची बाई घेऊन पळून जातो, तेव्हा आनंदा रामोशी मास्तरांना हे वाक्य बोलताना दिसते. ह्यावरुन माणदेशात रामोशी माणसांकडे आपल्या समाजापुरती का होईना, स्वत्वाची प्रबळ भावना असल्याचे दिसून येते.

● माणदेशातील माणुसकी व नि:स्वार्थीपणा :

माणदेशी संस्काराचा, वातावरणाचा, त्याठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता माणदेशी माणसांकडे माणुसकी ठासून भरलेली दिसून येते. जीवन जगण्यासाठी माणसाच्या किमान गरजांची पूर्तता होणे अपेक्षित असते. परंतु माणदेशात दुष्काळामुळे किमान गरजा भागवताना माणूस हतबल होतो. त्यातून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होताना दिसून येते. जे आहे, ते सर्वांनी थोडेथोडे वाटून घ्यावे व सर्वांनी कठीण परिस्थितीच्या वेळी धीराने व संयमाने वागावे, ही शिकवण माणदेशी माणसाला त्याठिकाणची परिस्थिती शिकवते. मागासलेले लोक असल्यामुळे ते जुन्या रुढी सांभाळताना दिसतात. ग्रामीण समाजरचनेत जात हा घटक महत्त्वाचा असतो. त्यातही ब्राह्मणांना मान मिळतो. ह्याविषयाचे माणदेश चित्रण 'वावटळ' (१९६४) ह्या कादंबरीत पहावयास मिळते. ते असे : "गावच्या लोकास्नी अक्कल नाही. अरे, तुमच्यासारख्या मूर्ति कशाला येतील ह्या गावांत ? आं? चला माझ्या घरी. कोन काय करतंय ते बघूं. तुमच्या केसाला धक्का, तर माझ्या प्राणाला धक्का." (पृ. ४१) ह्यावरुन माणदेशातील लोकांची माणुसकी व नि:स्वार्थीपणे एखाद्याची पाठराखण करण्याची पद्धत ह्या गोष्टी स्पष्टपणे दिसून येतात.

माणदेशात गांधीजींच्या खुनावेळी सर्व ब्राह्मणांची घरे पेटवून देण्यात आली. त्यावेळी माणदेशातील काही सामान्य लोकांनीच त्यांना आधार दिलेला दिसतो. पहा : "अवं पळा, पळा. ती मानसं हिकडंच आली आपलाच गोठा जाळायला !" (पृ. ५९) ह्यावरुन माणदेशातील सामान्य माणूस हा गावातील व्यवहार महत्त्वाचे मानून नि:स्वार्थीपणाने माणुसकी दाखवताना दिसून येतो.

माणदेशातील माणसांच्या ठिकाणी अस्सल ग्रामीणता दिसून येते. ह्या ग्रामीणतेमधूनच 'बनगरवाडी'मधील विभुतेवाडी ह्या गावात माणुसकीचे वेगवेगळे प्रकार घडताना दिसतात. आनंदा रामोशी भाकरीच्या आशेने मास्तरांच्या भाकरी चोरतो. परंतु त्या गाठोड्यातच पैसेही असतात. पैसे पाहून आनंदाचे मन फिरते व ते पैसे परत द्यावयाचे नाहीत, असे तो ठरवतो. परंतु माणदेशी संस्कार त्याला गप्प बसू देत नाहीत. तो पैशाचे गाठोडे घेऊन मास्तरांजवळ येतो. त्यावेळचे वर्णन पहा : "मास्तर, मी जातीचा बेरड. एवढं रुपयं पचवायला काय जड नव्हतं. पर आठ दिवस रुपयं जवळ ठेवलं आन् सारकं मनात याला लागलं - लेका आनंद्या, मास्तरचा पैका का रं घेतलास ? मास्तर काय जहागीरदार का सावकार त्याला हा धोका कशापायी ? कायम बैठकीत बसून हा असा दगा देनं खरं न्हाई. आन् मास्तर, आज हे रुपये

पायापाशी आनल्यात तुमच्या. आता फिर्याद करा, तुरुंगात डांबा, न्हाई तर मोकळं सोडा.'' (पृ. ५५-५६) ह्यावरुन माणदेशातील माणसांचा नि:स्वार्थीपणाच आपल्याला दिसून येतो.

कोणतेही काम करताना काम करणाऱ्याला खूप कष्ट उपसावे लागतात. त्यात व्यत्यय आणणारे- ही पुष्कळ असतात. त्यातही एखाद्या आडवळणी निरक्षरांच्या गावात तर अशा गोष्टी खूपच अवघड असतात. मास्तर विभुतेवाडीत तालीम बांधण्याचा मनोदय व्यक्त करतो, तेव्हा गाव त्याच्या पाठीमागे उभे राहते. परंतु गावातीलच काही आडव्या विचारांच्या माणसांमुळे तो वैतागतो. तेव्हा गावचा कारभारी माणुसकीच्या नात्याने मास्तरला म्हणतो, '' लेकरा, तू गेल्यावर कुठली रं इमारत ! केला एवढा आटापिटा पाण्यात जाईल. लाकडं कुजतील, दगडं पाडली ती लोक उचलतील. अरं, इमारत बांधायची म्हणजे सोपं न्हाई. तरास हुयाचाच. धा जणांचं काम म्हणजे त्यात म्हारकी आलीच. आता पत्करलंय ते कडंला नेऊ या !'' (पृ. ८१) ह्यावरुन माणदेशातील लोकांच्या ठिकाणी असणारी माणुसकीची भावना प्रखरपणे दिसून येते.

### ५.५.३. माणदेशातील व्यक्तिंचे व्यक्तिचित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' (१९५५), 'कोवळे दिवस' (१९७९) ह्या कादंबऱ्या व्यक्तिचित्रणात्मक आहेत. माणदेशात माडगूळकर ज्या पद्धतीचे जीवन जगले, तेच जीवन तेथील व्यक्तींच्या रुपाने कादंबरीतून अवतरलेले दिसून येते. माडगूळकरांच्या घरात त्यांची आई लहानपणी अनेक गोष्टी त्यांना सांगायची. त्या गोष्टीतूनच त्या - त्या पद्धतीची व्यक्तिचित्रे माडगूळकरांना साक्षात् त्यांच्याच प्रदेशात अनुभवण्यास मिळाली. त्यातूनच अस्सल माणदेशी व्यक्तिचित्रे आपणाला पहावयास मिळतात. कादंबरीतून प्रत्येक व्यक्तिचित्राबद्दलचा जिव्हाळा, आपुलकी, प्रेम पहावयास मिळते.

साहित्य हे मानवी जीवनाचा आरसा असते, हे माडगूळकरांनी ओळखले होते. त्यामुळे आपल्या माणदेशी कादंबरीत ते कोणत्याही व्यक्तीचे वर्णन त्याच्या रंगारुपासह, लकबींसह करतात. त्यातून ती व्यक्ती जिवंत होते. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत आलेले सुका पाटलाचे वर्णन पहा : ''रंगानं डांबरी काळा असलेला सुका पाटील धावपळ करीत होता. ही असामी मोठी और होती. त्याचा आवाज कायमचा बसलेला होता. घामानं काळे झालेले कपडे घालून तो गावची उठाठेव करीत हिंडे. गावात कुठंही मयत झालं की त्याची ओढ्यावर जाण्याची सर्व व्यवस्था मोठ्या उत्साहानं करी. आपल्या बसक्या आवाजानं तो थट्टा करु

लागला की, त्याच्या तोडांला ओढायच्या कडक तंबाखूचा वास येई.'' (पृ. १०) ह्या व्यक्तिचित्रणातून जाणवणारा सुका पाटील ह्याचा जिवंतपणा आणि लकबी खरोखर उठून दिसतात. तो कधीही अशा कामामध्ये आक्रस्ताळेपणा करीत नाही, तर स्वतःहून अशाप्रकारची जबाबदारी घेतो व ती पार पाडतो, हा माणदेशी व्यक्तीचा वेगळेपणा असल्याचे दिसून येते.

व्यक्तिचित्रणातून माणसाच्या परिस्थितीचाही अंदाज घेता येतो. प्रत्येक व्यक्ती तर माडगूळकरांनी जवळून पाहिलेली आहेच, पण त्याहीपेक्षा त्यांच्याशी असणारे भावनिक संबंधही प्रकट होतात. माणदेशी दुःखाबद्दलची, दारिद्र्याबद्दलची जाणीव त्यांच्या व्यक्तिचित्रणातून सारखी व्यक्त होताना दिसते. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या माणदेशी कादंबरीतील रखमाचे व्यक्तिचित्रण पहा: ''आपल्या खोपटात रखमा उगीच पडून राहिली होती. शेणानं सारवलेल्या जमिनीवर तिनं पटकूरसुद्धा टाकलं नव्हतं, ती तशीच भुईवर लोळत होती. शेणाच्या कोंड्यानं तिचे भुरके केस आणि एका बाजूचं लुगडं भरलं होतं. तरी मी तशीच पडली होती. काळजीकाळजीनं, उपासातापासानं तिचं सगळं मांस झडलं होतं. हाडांची चौकट तेवढी राहिली होती. गालांची, गळ्यांची, गुडघ्यांची हाडं वर आल्यामुळं रखमा अगदी कसनुशी दिसत होती. तिच्या अंगावरच्या लुगड्याला जागजागी भोसके पडले होते आणि त्यातून तिचं सुरकुतलं अंग जागजागी उघडं पडलं होतं.'' (पृ. १६६) ह्या व्यक्तिचित्रणावरुन माणदेशातील दारिद्र्य, भुकेकंगाल अवस्था, दैववादी दृष्टिकोन ह्याबाबी प्रकर्षाने लक्षात येतात.

माणदेशातील माणूस आपल्या नित्याच्या व्यवहारापेक्षा वेगळा व्यवहार करण्यास उत्सुक असलेला दिसत नाही. त्यामुळेच तो इतर भागातील माणसांपेक्षा पाठीमागे राहिलेला दिसून येतो. माणदेशात सदैव गावगाड्यातील व्यवहारात एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रसंगच जास्त घडताना दिसून येतात. ह्यातून समोर येतात ती वेगवेगळ्या रंगारुपाची, पण शेवटी पोटासाठीच कोणताही उद्योग करणारी माणसे. त्यात आयबू, आनंदा रामोशी, शेकू, जगन्या रामोशी, कारभारी, दादू बालट्या ही सर्व माणसे वेगवेगळ्या नमुन्याची आहेत. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीत आनंदा रामोशाचे येणारे वर्णन पहा : ''पस्तीस - चाळीस वयाचा आनंदा रामोशीही मोकळाच होता. तो उंचीने बुटका आणि अंगाने वाळलेला होता. दाढीची खुटरे सदोदित वाढलेली. वाढलेल्या केसांवर एक गांधीटोपी, अंगात नुसता कोट आणि खाली आखूड चड्डी, अशा वेषात तो नेहमी असे. वाडीत जी रामोशांची चारदोन घरे होती, त्यापैकी हा एक. हे सारेच रामोशी कधी कसलाही उद्योग करीत नसत, तरी त्यांचे पोटपाणी चाले.'' (पृ. २५) ह्यावरुन माणदेशातील व्यक्तिचित्रण पाहत असता हे माणदेशी

लोक सतत दारिद्र्यात पिचत असलेले, पोटासाठी भटकंती करत असलेले दिसून येते. रामाचे व्यक्तिचित्रण पहा : "रामा बनगर हा माणूस मात्र चांगला मुलेबाळे असलेला होता. वयाने तीस-पस्तिशीचा असावा. ओठावर मनगटासारख्या मिशा आणि मोठे जाबाड, यामुळे तो चांगला दांडगेश्वर दिसे. त्याच्या घरी शंभर मेंढरु होते; पण त्याची उसाभर बाप करीत होता. पोरगा करीत होता. रामाला उद्योग नव्हता. नव्हतां म्हणण्यापेक्षा तो करत नव्हता. तोही शाळेत येऊन उगाच बसे." (पृ. २८) ह्यावरुन माणदेशात घरातील कर्ता पुरुष मोठेपणाच्या नावाखाली गावांतून उगीचच फिरत असल्याचे दिसून येते. तसेच घरातील सर्वांनी आपले ऐकले पाहिजे, आपल्याला मान दिला पाहिजे, असा उगीचच मोठेपणाचा बडेजावही माणदेशात दिसून येतो.

व्यंकटेश माडगूळकर फक्त माणदेशातील दुष्काळ, दारिद्र्य ह्याचेच चित्रण करतात, असे नव्हे; तर त्यांच्या माणदेशी चित्रणातून कलात्मकताही असल्याचे जाणवते. अतिशय संयत पद्धतीने ते स्त्रीचित्रण करताना दिसतात. माणदेशी संस्कार न सोडता, कोठेही उथळपणा येऊ न देता अतिशय ठसठशीत, मनावर बिंबणारे चित्रण 'कोवळे दिवस' (१९७९) ह्या कादंबरीत आलेले दिसते. ते असे: " यमू गावरान, उफाड्या बांध्याची अशी होती. मागून पुढून भरलेली. नाकीडोळी ठसठशीत. तिचा रंगही देशस्थाला न शोभणारा - तांबूसगोरा होता, जाडंभरडं खादीचं नऊवारी पातळ चापून चोपून नेसल्यामुळं सगळे उठाव नजरेत भरत होते." (पृ . ९३) व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या माणदेशी कादंबरीचा विचार करता, माणूस व निसर्ग हेच त्यांच्या चित्रणाच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.

## ५.५.४. माणदेशाचे आर्थिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी कादंबरीत ग्रामीण जीवनाचा पुरेपूर प्रत्यय येतो. हे ग्रामजीवन, शेतकरी, त्यांच्या परंपरा, ग्रामजीवनाची रहाटी ह्यांचे व्यापक अशा प्रकारचे चित्रण कादंबरीत पाहायला मिळते. माणदेशी ग्रामजीवन हे तेथील माळरानाशी, निसर्गाशी व तेथे असणाऱ्या माणसांशी निगडीत आहे. माणदेश हा सतत निसर्गाची अवकृपा होणारा भाग असल्यामुळे येथील आर्थिक चित्रणही कादंबरीतून जेमतेमच आलेले आढळते. माणदेशातील माणूस हा सतत आर्थिक विवंचनेत अडकलेला दिसून येतो. 'पुढंच पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत आलेले माणदेशी चित्रण पहा : "ऐन दिवाळीला हा प्रकार घडला. देवाच्या झोपडीतून आनंद निघून गेला. सगळी सुतक्यासारखी वागू लागली ; पण बिंच्याला इतका पोच

नव्हता. त्यानं फटाकड्याचा नाद सोडला नाही. गणाकाकाला गळ घातली. मग गणा उठला आणि पोरांची हौस पुरवायसाठी धोतरात जोंधळे घेऊन सदा वाण्याच्या दुकानात गेला.'' (पृ.१००) ह्यावरुन माणदेशातील परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे दिसून येते.पैसा ही गोष्ट माणदेशी माणसांना सारखी बघायला मिळत नसल्यामुळे खूपच महत्त्वाची वाटते, हेच ह्यावरुन लक्षात येते.

माणदेशात खूप कष्ट करुनही पोटाला भरपूर मिळत नाही. याला कारण त्याठिकाणची सततची हलाखीची परिस्थिती हेच आहे. कारण ज्यांच्याकडे पैसा आहे, तो माणूस पुढच्या काळाचा विचार करुन खर्च करत नाही. परिणामी अनेकांना दोन वेळच्या अन्नासाठी वणवण भटकंती करावी लागते. एकंदरीत हे माणदेशी चित्रण मन विषण्ण करणारे असे आहे. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत याविषयीचे माणदेशी चित्रण असे: 'रखमानं मारमारुन बिच्यालाही कामाला जुंपला होता. महिन्याकाठी दीड रुपाया या रोजगारावर तो बामणाची गुरं राखुळीला नेऊ लागला होता.' (पृ. १०२) ह्यावरुन माणदेशाची आर्थिक परिस्थिती किती हलाखीची आहे हे दिसून येते.

माणदेशात सतत आर्थिक ओढाताणीचे प्रसंग घडून येतात. तरीसुद्धा माणदेशी माणूस आर्थिक ओढाताण सहन करुन कुटुंबातील सर्वांना एकत्रित ठेवण्याचा मनापासून प्रयत्न करताना दिसतो. याविषयीचे चित्रण 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत आलेले आहे. घरातील वडीलधारी माणूस काळाच्या पडद्याआड गेल्यानंतर घरात भावा-भावात फूट पडते व त्यांना म्हाताऱ्याचा आपणाला किती आधार होता, हे पटते. 'तसंच काय म्हनता येनार न्हाई. त्येचं भरलं, त्यो मेला. पर आपन मातूर उघडी पडलो. म्हाताऱ्याचा आधार मोठा होता. त्येच्या म्हागारी बघ दादा, घर नुसतं मसणवाटंवाणी वाटतं. वयनीनं तर लई आकांत केला. शेरडी इकून मला वाटखर्चासाठी पैका दिला अन् तुला घिऊन याला सांगितलं' (पृ. १५९) ह्या आर्थिक चित्रणावरुन हृदयाला गरे पडल्याशिवाय रहात नाहीत.

माणदेशातील लोक आर्थिक दृष्टीने गरीब असले तरी या आर्थिक व्यवहारातून त्यांच्या मनाचा मोठेपणाही दिसून येतो. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीतील वर्णन पहा : ''पुढच्या आठवड्याला निघालो तेव्हा रामाने बारा रुपये माझ्यापाशी दिले. मी अठरा आण्यांप्रमाणे मोडून आणून दिले. पानतमाखूला चार आणे घेण्याबद्दल रामाने पुन्हा आग्रह केला. मी नाही म्हटले.'' (पृ. ३१) किंवा ''पर तालीम बांधायची म्हंजे बक्कळ पैसा लागलं तो कुनी द्याचा ?''

"गावानं वर्गणी करावी. घरटी दहावीस रुपये द्यावेत !"

"हं, हायेत कुणापाशी ?"

"पुष्कळांच्यापाशी आहेत. मला ठाऊक आहे. ज्यांच्यापाशी नसतील तर त्यांनी रोजगार द्यावा. गाडीबैलं द्यावीत. आपल्या रानातील झाडं द्यावीत. जर सगळ्या वाडीनं मनावर घेतलं तर एक दहाखणी इमारत बोलबोल म्हणता होईल." (पृ. ७५-७६)

माणदेशात दुष्काळ हा तेथील माणसांना नवीन नाही. त्यातूनही टिकून राहणे महत्त्वाचे आहे. आर्थिक दुष्काळ माणसाला शहाणे करतो व माणसाला लाचारही बनवतो. 'बनगरवाडी' (१९५५) तील हे चित्रण पहा: "लोकांच्या तोंडावरची कळा नाहीशी झाली. त्यांच्या डोळ्यांत भूक दिसू लागली. घरातले धान्याचे साठे रोडावत, तसे रुपया - दोन - रुपये घेऊन ते बाजार गाठू लागले. मोठ्या मिनतवारीने मिळविलेले महागडे धान्य घेऊन येऊ लागले." (पृ. १२०) ह्यावरुन माणदेशातील आर्थिक चित्र हलाखीचे असल्याचे दिसून येते. ह्या हलाखीतच माणदेशी माणूस कायमस्वरुपी पिचत असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

### ५.५.५. माणदेशाचे आध्यात्मिक - धार्मिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या माणदेशी मातीशी इमान राखून 'बनगरवाडी' ही कलाकृती तेथील माणसांच्या स्वभाववैशिष्ट्यांसह चित्रीत केलेली दिसते. या माणसांचे विश्व लहान असले तरी विलक्षण संपन्न आहे. माणदेशातील माणसांची जीवन जगण्याची पद्धत, त्यांची श्रद्धास्थाने याविषयी प्रामाणिकपणे माडगूळकरांनी चित्रण केलेले दिसून येते. माडगूळमधील त्यांच्या सहवासात आलेली सारीच माणसे ही संयमी, दुःख सहन करणारी, भोळीभाबडी, गरीब आहेत. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या माणदेशी कादंबरीत ह्याविषयीचे धार्मिक चित्रण पहा: ' अरे, जाईन बसत-उठत . इटुबा दील माज्या पायांत बळ !' (पृ. ११४) ह्यावरुन ह्या भोळ्याभाबड्या लोकांच्या मनात असणारी देवाविषयीचा भाव व्यक्त होतो.

माणदेशात जातीयता पाळली जात असल्याचे दिसून येते. परंतु ह्या जातीयतेमुळेच अनेक दलित लोक देवधर्मापासून दूर राहिल्याचे दिसून येते. अलीकडे सर्वांना मंदीरात प्रवेश मिळत असल्यामुळे देवाच्या दारात जातीयतेचा विचार दिसत नाही. परंतु माणदेशातील दलित माणसांच्या मनातून हा विचार गेलेला दिसत नाही. ह्याविषयीचे चित्रण 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या कादंबरीत आलेले आहे. ते असे : "जाईनात का बापडं! मी कुठं नगं म्हणतीया. आन् आता म्हनं देवळंबी आपल्या लोकास्नी उघडी झाल्याती. थेट इटुबारायाच्या

पायावर डोक्सं टेकाय मिळतंय म्हनं.!'' (पृ. ११५) ह्या चित्रणावरुन माणदेशात धार्मिकता ही प्रत्येक माणसाला आवडणारी, मनाला विसावा देणारी गोष्ट असल्याचे दिसून येते.

माणदेशात निरक्षरांचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याचे दिसते. निरक्षरतेमुळेच माणदेशी लोक जुन्या रुढी - परंपरा, श्रद्धास्थाने सोडण्यास तयार नसल्याचे दिसते. ग्रामीण भागात लोक एकमेकांना मदत करणार नाहीत, गावातील सामुहिक कामात एकमेकांना अडथळे निर्माण करतात. परंतु देवासमोर मात्र सर्व लोक वैरभावना, संकुचितता विसरुन एकत्रित येताना दिसतात. म्हणजेच माणदेशात धार्मिकता ही महत्त्वाची बाब असल्याचे दिसून येते. 'बनगरवाडी' (१९५५) ह्या माणदेशी प्रादेशिक कादंबरीत ह्याचे आलेले चित्रण पहा : ''माज्या पांडरीपुढं मी पदर पसरतो, माजी चुकी माफ करा. मला तुमच्यात घ्या. मला गुलाल लावा. तुमी माझं झाड घ्या, घर घ्या, माजा जीव सुदीक घ्या; पर मला असं लांब ढकलू नका !'' लोकांची कुजबूज झाली. सर्वानुमते बाळाला गुलाल लावला -
''मावल्याईचं चांगभलं !''
मग धनगर लोकांनी 'चांगभलं गाजवलं, गुलाल उधळला, मुठी - मुठींनी उधळला. रताळी, गाजरे उधळली, तो प्रसाद शोधण्यासाठी झुंडीच्या झुंडी खाली वाकल्या. रेटारेटी, आरडाओरड झाली.' (पृ. ११८) ह्यावरुन माणदेशातील देवीच्या यात्रा पूर्ण श्रद्धेने साजऱ्या केल्या जातात, असे दिसून येते.

तसेच माणदेशात धार्मिक पारंपरिक अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. अंगात येणे, अंगात येणाऱ्या माणसाने संपूर्ण लोकांना भविष्यवाणी सांगणे व सर्वांनी त्याचपद्धतीने वागणे असे धार्मिक प्रकार दिसून येतात. 'बनगरवाडी' तील वर्णन पहा : ''आई आली, आई आली !'' असे म्हणून धनगर त्याच्याभोवती गोळा झाले. मग शेकूने विचारले,
''आई, अवंदा पाऊसपाणी न्हाई. काय चुकी झाली?'' आई घुमत म्हणाली,
''पाप फार झालं, लबाडपंना बोकाळला रे ! त्येनं पाऊस गेला!''
''पर आई, पाऊस गेला, तर मेंढरांनी खावं काय ? आमी जगावं कसं?'' डोळे मिटल्याच आई बोलली,
''माजी जत्रा नीट करा - मला निवदनारळ नीट करा... सगळं चांगलं हुईल.''
''पाऊस पडंल?''
''हां, पडंल''

"पर आई, कवा ? मिरग निघाला, सगळ्या जगात पानी पडलं, अन् वाडीवर काळा ढगसुद्धा उठला न्हाई !" (पृ. ११८-११९)

ह्यावरुन माणदेशात मनाच्या समाधानासाठी लोक अशापद्धतीच्या धार्मिक गोष्टीवर भर देताना दिसून येतात. परंतु त्यातून त्यांच्या हातात काहीही मिळत नाही. उलट दारिद्र्यात भर पडत जाताना दिसून येते.परंतु माणदेशी माणूस मनापासून देवाची भक्ती करणारा आहे, हे निश्चित दिसून येते.

### ५.५.६. माणदेशाचे भाषिक चित्रण :

व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी माणदेशाचे चित्रण करताना त्यांनी माणसांच्या धर्मनीतिचे, जगण्याचे आणि दैनंदिन व्यवहाराचे सूक्ष्म चित्रण करीत असताना बोलीभाषेचा पोत आणि पीळ हा कायम देशी वाणाचा कसा राहील, हेच पाहिल्याचे दिसून येते. मराठी बोलीतील लय आणि ढब या दोन्हींचा उत्तम मिलाफ माडगूळकरांच्या कादंबरी लेखनात झालेला दिसून येतो. माणदेशी बोलीचा वाण दिमाखाने ग्रामीण साहित्यात मिरवणारा एक अस्सल जादूगार म्हणूनच व्यंकटेश माडगूळकरांच्याकडे पहावे लागेल. कारण त्यांच्या निवेदनाची आणि भाषेची जी वैशिष्ट्ये आहेत ती देशीपणातून निर्माण झालेली आहेत असे आपल्याला म्हणता येईल. व्यंकटेश माडगूळकरांना ग्रामीण जीवनाची उपजत जाण होती, त्यासाठी त्यांना करामतीची आवश्यकता भासली नाही. माडगूळकरांच्या भाषेत कमालीचा साधेपणा दिसतो. परंतु त्या साधेपणातूनच माणदेशी भाषा वाचकांच्या मनाचा ठाव घेताना दिसते. 'पुढचं पाऊल' (१९५०) ह्या माणदेशी कादंबरीत निवेदनासाठी नागर व बोली भाषा ह्याचा वापर केलेला दिसून येतो. पहा: 'कुणीबी टेपलावं चेंडवागत म्हार झाला म्हणून त्येला काय जीव न्हाई काय? त्यो काय जनावर हाय काय?'

या बोलण्यानं रखमा चरकली. उठून नवऱ्यापाशी आली.

"या बया ! का झालं वं?"

देवानंही मागं वळून बघितलं. पोराचं कपाळ फुटून रक्तबंबाळ झालेलं दिसलं तसा तोही उठला आणि कृष्णापाशी आला.

'का झालं रं पोरा?। डोक्सं कशानं फुटलं, आं?' (पृ. ५०)

माणदेशी बोलीचा खरा नमुना 'बनगरवाडी'त पहावयास मिळतो. ह्या कादंबरीतील मानवी जीवनाचे साचेबंद स्वरुप आहे. परंपरेच्या चाकोऱ्या सहजासहजी मोडायला ही माणसे

तयार नाहीत. साधी, सरळमार्गाने जाणारी, दुष्काळामुळे वैतागून आपला बैल विकायला घेऊन गेलेला शेतकरी त्याला तसाच माघारी घेऊन येतो आणि म्हणतो, "खाटकाच्या सुरीनं मरन्यापरीस आपल्या दारात मेलेला काय वाईट ?" (पृ. ३९) मेंढरांची पोरं ही त्याच विशिष्ट मेंढीची कशी? या प्रश्नाचे उत्तरही, 'त्याचं तोडगं असतं लेकरा, चेहरा, रंग, रुप कळल्याशिवाय कसं राहील?' (पृ. ३४) ह्या माणदेशी भाषेतच मिळताना दिसते.

माणदेशात सरळ बोलतानासुद्धा लोक स्वतःच्या भाषेत बोलताना दिसतात. मास्तर म्हणून राजाराम विठ्ठल सौंदणीकर विभूतेवाडीत येतो. तेथे आल्यावर दादूने त्याला दम दिला. तो असा, "हसू नकंस मास्तरा ! ही हसण्यासारकी गोष्ट न्हाई. तू नवा आला हायेस. नीट आपलं काम कर. गावात चबाढब करु नकंस. पोरं साळंत आली तर त्येस्नी शिकव. गावाला शिकवायच्या भानगडीत पडू नकंस !" (पृ. १७) ह्यावरुन ही बोली खास त्यांचीच असल्याचे जाणवते.

निवेदनातील सहजता ही माडगूळकरांच्याकडे त्यांच्या माणदेशाच्या संस्कारातून आलेली दिसते. 'वावटळ' (१९६४) ह्या माणदेशी कादंबरीत गांधीहत्येच्या वेळी ब्राह्मणांची घरे जाळण्यात आली. तेव्हाचे वर्णन पहा :

"लेकांनु मुकाट्यानं हे सामान उचला. आता बामनांच भ्या नाही. भेता कुनाला ?"

"मग, नेलं सामान लोकांनी?"

"न्हेलं की व काईनी. काय करावं? न्हाई न्हेलं तर धोपाट्या बसत्यात काटीच्या. आपल्या गावचं लोक पयलंच भेकाड. भिऊन कैकांनी सामान न्हेलं."

"आमचा वाडा जाळला तेव्हा तुम्ही लोक आडवे गेलां का नाही ?"

"तर हो! मी, आपला भीमा, आन शिरपती वाकून पाया पडलो. म्हनलं , 'सरकार, हे घर र्‍हाऊं द्या. कुनाशी वाकुडपना न्हाई -'"

"मग?"

"न्हाई ऐकलं" (पृ. १२० - १२१) ह्या माणदेशी बोलीवरुन तेथील माणसांची स्वभाववैशिष्ट्ये सूक्ष्मपणाने दिसून येतात. ह्यामधील दुःख हे संयत रुपाने अवतरताना दिसते. हा सर्व माणदेशी वातावरणाचा परिणाम म्हणावा लागेल.

एकंदरीत, माणदेशी कादंबरीतून जाणवणारे माणदेशाचे चित्रण पाहता, खऱ्या अर्थाने ग्रामीण अस्सलपणा व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' ह्या कादंबरीतून दिसून येतो. माणदेशी लोकांच्या भाव - भावनांसह, त्यांचे आचारविचार, संस्कृती, भौगोलिकता, निसर्ग,

श्रद्धा, सामाजिकता ह्या सर्वांचे चित्रण प्रामुख्याने जाणवते. त्यात कृत्रिमता कोठेही जाणवत नाही. ह्याविषयी माणदेशच्या चित्रणावर अधिक प्रकाश टाकताना गंगाधर गाडगीळ यांनी असे म्हटले आहे की, "माणदेशाच्या आणि त्यांच्या नंदनवनाच्या सीमारेषा एकच आहेत. माणदेशाच्या जीवनाचे जवळ जवळ असे एकही अंग नाही की, ज्यातून माडगूळकरांनी एखादे कलाकृतीचे लेणे कोरलेले नाही."[१८]

## ५.६. शंकरराव खरात ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण :

स्वातंत्र्योत्तर काळातील माणदेशातील महत्त्वाचे दलित कादंबरीकार म्हणून शंकरराव खरातांचा उल्लेख करावा लागेल. खरातांच्या माणदेशी कादंबरीतून सामाजिक जाणीव त्यांना असल्याचे पहावयास मिळते. स्वातंत्र्यलढ्यापासूनची सर्व सामाजिक परिस्थिती हाताळल्याची जाणीव त्यांच्या साहित्यातून होते. समाजातील सर्व उपेक्षित घटकांचे चित्रण त्यांच्या कादंबरीतून आल्याचे दिसते. ह्या सर्व उपेक्षित वर्गात ते स्वत: मिसळले आणि सर्व अनुभव सूक्ष्मपद्धतीने चित्रित केल्याचे दिसून येते. ह्यासंदर्भात ते स्वत: म्हणतात, "खरे सांगायचे तर माझी प्रत्येक ललितकृती कथा-कादंबरी हे माझ्या जीवनातील आत्मकथनच आहे. माझ्या कथेतील पात्रे माझ्याशी बोलली आहेत. मीही त्यांच्या घरी गेलो आहे. त्यांच्या पालावर राहिलो आहे. तेव्हा मला त्यांच्या जीवनातील अस्पृश्यता, दारिद्र्य, अज्ञान हे दिसले. त्याचबरोबर त्यांनी भोगलेल्या व्यथा, वेदना, माझ्या काळजाला भिडलेल्या आहेत. त्यांच्या त्या जीवनातील वेदनांना मी माझ्या कथा - कादंबरीतून वाट काढून दिली. झोपडपट्टी, फूटपाथ, मी माझ्या गावाच्या शोधात व पारधी अशाच माझ्या इतर कादंबऱ्यातील पात्रे, माणसे माझ्याबरोबर सतत वावरलेली, बाळगलेली व जगलेली आहेत."[१९] ह्या विधानांवरुन खरांताचे साहित्य हे स्वानुभावर आधारलेले आहे, असे दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात निरनिराळी सामाजिक, राजकीय आंदोलने झाली. ह्या आंदोलनांमधून समाजप्रबोधन मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसते. ह्यातूनच परिस्थितीसापेक्ष कादंबरी निर्माण होऊ लागली. खेड्यातील दलितांचा प्रश्नही कादंबरीतून चित्रित होऊ लागला. त्यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेऊ लागले. ह्याच सुमारास प्रादेशिक कादंबरीचाही जन्म झाला. निसर्ग, ग्राम पातळीवरील व्यक्ती व त्यांची दु:खे ह्यांना शब्दबद्ध करण्याचे काम प्रादेशिक कादंबऱ्यांनी केलेले दिसते. ह्यातूनच उपक्षितांच्या प्रश्नांना हात घालत असतानाच झोपडपट्टीचे निरर्थक जिणे, दारिद्र्य, हैदोस, तेथील दूषित वातावरण, गुन्हेगारी विश्व ह्यांचे चित्रण करणारी कादंबरीही प्रकाशित होऊ लागली. ह्यात 'हातभट्टी',

'झोपडपट्टी', 'फूटपाथ नं. १' ह्यासारख्या समर्थ अशा कादंबऱ्यांचा समावेश होतो. ह्याच सुमारास व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' ही माणदेशी पार्श्वभूमी असलेली कादंबरी प्रकाशित झाली. म्हणूनच १९६० नंतरच्या मराठी कादंबरीत विषय, व्याप्ती, अनुभव ह्यांची खऱ्या अर्थाने भर पडल्याचे पहावयास मिळते.

ह्याच सुमारास दलित साहित्याचा उदय झाला. ह्या साहित्यात आजवरचे उपेक्षित जीवन प्रतिबिंबित होऊ लागले. दलितांची दुःखे, समाजासमोर मांडली जाऊ लागली. स्वातंत्र्योत्तर काळानंतर मराठी कादंबरीत जी स्थित्यंतरे झाली, त्याच्या मुळाशी हे समकालीन संदर्भ कार्य करीत असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यानंतर राजकीय गुलामगिरी जरी संपली, तरी दलित शोषितांची सामाजिक गुलामगिरी तशीच होती. ही गुलामगिरी माणदेशात मोठ्या प्रमाणावर असल्याचे जाणवते.

शंकरराव खरात ह्यांच्या माणदेशी कादंबऱ्यांचा विचार करता त्यात माणदेशी समाजजीवनाचे प्रतिबिंब स्पष्ट पडलेले दिसते. सामाजिक समरसता हा खरातांच्या माणदेशी कादंबरीचा प्राणभूत गुणधर्म असल्याचे पहावयास मिळते. ह्याविषयी कुसुमावती देशपांडे म्हणतात, "आजचा कादंबरीकार केवळ माणूस म्हणून माणसाजवळ जाऊ शकला, तरच त्याला ही समरसता लाभणे शक्य दिसते. एरवी माणसामाणसात तटबंदी उभी करण्यासाठी आज कित्येक शक्ती सज्ज आहेत. माणसाच्या अंत:करणाविषयी आपुलकीची भावना, सुहृदय समाज व मानवी जीवनाविषयी व्यापक अनुभव व सुसंगत दृष्टिकोन हे आजच्या कादंबरीला अवश्य असणारे निदानीचे गुण आहेत."[२०]

शंकरराव खरातांनी आजपर्यंत अकरा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ह्या सर्वच कादंबऱ्या माणदेशाचे चित्रण करणाऱ्या आहेत, असे नाही. चारच कादंबऱ्यांमधून मात्र माणदेशाचे चित्रण दिसते. 'माणुसकीची हाक'(१९५८), 'गावचा टिनोपाल गुरुजी'(१९७१), 'पारधी'(१९८०), 'मी माझ्या गावाच्या शोधात'(१९८३) ह्या त्या चार कादंबऱ्या होत. ह्या कादंबऱ्यामधून त्यांनी आपला पीडितांच्या, शोषितांच्याच जीवनावर लिहिण्याचा मूळ धागा सोडलेला नाही, हे लक्षात येते.

शंकरराव खरातांनी माणदेशातील अस्पृश्यांच्या जीवनाचा वेध घेतलेला दिसतो. 'माणुसकीची हाक'(१९५७) ह्या कादंबरीत प्रामुख्याने सवर्णांच्या कचाट्यात सापडून दलित लोकांच्या जीवनाची वाताहत कशी होते, ह्याविषयीचे चित्रण आलेले आहे. 'गावचा टिनोपाल

गुरुजी'(१९७१) ह्या कादंबरीत माणदेशातील ग्रामीण भागात शिक्षणाच्या नावाखाली समाजात चालू असलेला सावळा-गोधंळ पहावयास मिळतो. तसेच नीतिमत्तेची पायमल्ली जाणूनबुजून कशी केली जाते, ह्याचेही चित्रण पहावयास मिळते. 'पारधी'(१९८०) ह्या कादंबरीतून माणदेशातील पारधी समाजाच्या व्यथा मांडलेल्या आढळतात. कोणत्याही विकासाचा गंध नसलेली, मालकीच्या घरापासून वंचित असलेली, भुकेकंगाल जिवांची व्यथा ह्या कादंबरीतून मांडलेली आहे. 'मी माझ्या गावाच्या शोधात'(१९८३) ह्या कादंबरीतून दलितांच्या मूक वेदनेला वाचा फोडण्याचे तसेच रुढी, परंपरा नाकारण्याचे काम त्यांनी केले आहे. जातीयतानिर्मूलनास तयार झालेल्या समाजाचे वास्तव चित्रण ह्या कादंबरीतून आलेले आहे.

### ५.६.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

शंकरराव खरातांच्या माणदेशी कादंबरीत उपेक्षित समाजातील महार, मांग, चांभार, कैकाडी, घिसाडी, पारधी ह्या लोकांचे वास्तव चित्रण आलेले आहे. खरातांचा जन्मच मुळी माणदेशात झालेला असल्यामुळे आणि आयुष्यातील लहानपणातील महत्त्वाची पंधरा- सोळा वर्षे त्यांनी माणदेशातच घालविलेली असल्यामुळे त्यांच्या चित्रणात अस्सल ग्रामीणता आल्याचे दिसून येते. ही ग्रामीणता सामाजिक घटकांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्या लेखनाचे प्राणभूत तत्त्व सामाजिकता हेच असल्याचे लक्षात येते.

उपेक्षित समाजातील पारधी हा घटक समाजाने चोर ठरवलेला असल्यामुळे तो कायमच गावापासून लांब वस्ती करुन रहात असल्याचे दिसून येते. पारधी समाजाबरोबर गावगाड्यातील कोणताही वर्ग जुळवून घेताना दिसत नाही. ह्याला कारण काही जुन्या पारंपरिक रुढी आहेत. त्यातूनच त्यांचे जीवन पशुवत बनते. माणूस असूनही त्यांना माणसासारखे जीवन जगता येत नाही, ही त्यांची खंत असल्याचे दिसून येते. दारिद्र्य, अज्ञान हे त्यांच्या पाचवीलाच पुजलेले असते.

पारधी समाजाचे एकट्याने राहणे, हेच त्या समाजाचे मागासलेपण वाढवण्यास कारणीभूत असल्याचे दिसून येते. गावाच्या बाहेर डोंगरात राहिल्यामुळे निसर्गातील सर्व प्राणिमात्रांशी त्यांचा संबंध येताना दिसतो. त्याचे चित्रण पहा : "पारध्यांच्या पालांचा अन् बाकी जगाचा काही संबंध दिसत नव्हता. पालांचा संबंध होता तो खरा त्या डोंगराशी, त्या डोंगरातील झाडा- झुडपांशी; त्या झाडा-झुडपातील चिमण्या - पाखरांशी, चित्तर - लाव्ह्याशी, सरडा-खारोटीशी, अन्य वन्य प्राण्यांशी. फासेपारध्यांची पालं अन् त्यांचं

आजुबाजूचं जग वेगळंच दिसत होतं." (पृ.९) ह्यावरुन माणदेशी भौगोलिकता आणि त्या भौगोलिकतेचा पारधी समाजाशी असलेला संबंध स्पष्ट होतो.

माणदेशात अस्पृश्य समाजात दारिद्र्य व अज्ञान ह्या गोष्टी परंपरागत पद्धतीने चालत आलेल्या दिसतात. अस्पृश्यांची घरे पाहिली तरी ह्याची जाणीव येऊ शकते. 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीत दलित समाज कसा राहतो, त्या घराविषयीचे वर्णन पहा : "वाड - वडलांचंच ते घर. घर कसलं ते खोपाटच! डोक्या इतक्या उंची भिंती त्यावर आडवं वासं. त्यावर उभ्या बांदाट्या. वर बाभळबोराटीच्या झुडपांचे फेस - फांजी हातरल्या होत्या. त्यावर नदीतल्या पाणकणसी गवतानं शेकारलं होतं. त्यात आत पुन्हा दोन मेढीचा आधार. त्या आधारावर माझं घर उभं होतं." (पृ. ६) ह्यावरुन माणदेशातील बिनमालकीच्या निसर्गसंपत्तीचा आधार घेऊनच अस्पृश्यांची घरे उभी असतात, ही भौगोलिकता येथे लक्षात येते.

माणदेश हा सतत निसर्गाची अवकृपा असलेला प्रदेश म्हणूनच ओळखला जातो. त्यातच ह्या प्रदेशात जातीयतेचे बीज खोलवर रुजलेले दिसून येते. दलित समाजाने पाणी कोठून आणावे, ह्याचेही काही संकेत माणदेशातील ग्रामीण भागात रुढ असलेले दिसून येतात. त्यातून माणदेशाची भौगोलिकता ठळकपणाने समोर येते. पहा : 'तोंडावरचा पाऊस गेला. गडप झाला. माणसांच्या तोडचं पाणी पळालं. त्याचं डोळं पांढरं होऊ लागलं. कडक ऊन पडू लागलं. आमच्या गावच्या ओढ्याचं पाणी आटलं. ओढा कोरडा ठणठणीत पडला. त्यातच गावच्या ओढ्याची वाळू तापू लागली. ओढ्यातलं गावचं पाण्याचं झरं आटलं. ओढ्यातलं आमच्या समाजाचं झरं तळाला गेलं. करट्या - वाट्यांनी एक एक घागर भरायला एक एक घंटा लागू लागला. दिवस दिवस पाण्यासाठी गडी - बायांची परवड बसायला लागली होती.' (पृ. ६९) ह्या माणदेशी भौगोलिकतेवरुन तेथील जातीय तीव्रता, कडक उन्हाळा, त्यातून निर्माण होणारे दारिद्र्य ठळकपणे दिसून येते.

### ५.६.२. माणदेशाचे सामाजिक व सांस्कृतिक चित्रण :

एकंदरीतपणे, शंकरराव खरात ह्यांनी आपल्यावर माणदेशात जे संस्कार झाले, त्यांच्या अधीन राहून 'उपेक्षित समाजाला फक्त माणसासारखे वागण्याची संधी द्या, त्यांच्यावर पशुवत अत्याचार करु नका; नाहीतर एक दिवस हा समाज बंड करुन उठेल व संघर्ष करुन सर्व हक्क प्राप्त करेल' असा इशारेवजा सामाजिक विचार मांडलेला दिसून येतो. कारण माणदेश हा

मागासलेला भाग आहे. तेथे नवीन विचारांना प्राधान्य न देता. 'जुनं तेच सोनं' हा विचार मानणारे लोक दिसून येतात. परंतु एखाद्या समाजावर अन्यायाची परीसीमा झाल्यानंतर तो समाज पेटून उठतो, आपले स्वतःचे अस्तित्व दाखवून देतो, परंपरागत रुढी-परंपरा नाकारतो, ह्याचे चित्रण शंकरराव खरातांच्या माणदेशी ग्रामीण कादंबरीतून पहावयास मिळते. ह्यासंदर्भात भालचंद्र फडके ह्यांचे विधान महत्त्वपूर्ण वाटते. ते म्हणतात, "आपल्या जुन्या ग्रामव्यवस्थेचे आधार म्हणजे महार, मांग, रामोशी, कुंभार, चांभार, कोळी, परीट, न्हावी, सुतार, लोहार, सोनार आणि गुरव ह्यांच्या जीवनाभोवती गुंफलेल्या कथा वाचीत असताना एक अपरिचित, अनोखे विश्व उलगडत होते. या माणसांच्या वेदना मनाला अस्वस्थ करीत होत्या."[२१]

● सामाजिक विषमता व समाजवास्तव :

संपूर्ण माणदेशाचा विचार करता, हा प्रदेश बहुतांश ग्रामीण, दुष्काळी व मागासलेला असा दिसून येतो. तेथील अनेक जाती - जमाती एकमेकांवर अवलंबून असल्याचे दिसून येते. परंतु ज्या लोकांनी समाजातील खालच्या दर्जाची मानली गेलेली कामे केली, त्यांना त्याच कामावरुन व्यवसायावरुन जातिविषयक नाव देण्यात आले. त्यामुळे साहजिकच समाजात उच्च - नीचतेची भावना वाढीस लागल्याचे दिसून येते. त्यातूनच समाजाकडून खालच्या मानलेल्या जातींमधील लोकांवर अमानुष अत्याचार माणदेशात झाल्याचे दिसून येते.

'माणुसकीची हाक' (१९५७) ह्या कादंबरीत माणदेशातील महार जातीवर झालेल्या अन्यायाचे वास्तव चित्रण आलेले आहे. गावकीच्या कामामुळे महार जात वैतागून गेलेली दिसून येते. तिला कसलीच किंमत समाजात मिळताना दिसत नाही. गावकीच्या कामामुळे महार लोकांना आपल्या घराकडे, मुलांकडे लक्ष देण्यासही सवड मिळत नाही. ह्याविषयीचे चित्रण पहा : "ह्या गावकीच्या कामापायी पोटच्या पोराकडं बघायलाबी सवड घावंना." (पृ. ६६) " काय बायला ह्यो जुलूम ! कुणाकुणाला म्हणून पुरावं आमी ? सरकारंच काम बघावं का गावाचं करावं..?, व्हय तर काय....! आमी काय मानूस हाय का गुरं - ढोरं हाय...? कवाबी म्हारास गावकीच्या कामाला जुपावं!, गेला जलम ह्या कामानं...! पोटभर आन मिळंना, अंगाला धडूतं घावंना.. या कामापाय पोटचा गोळा मातीत घातला." (पृ.६८) ह्या चित्रणावरुन माणदेशातील दलित समाजातील लोकांना माणूस असूनही माणसासारखे जीवन जगता येत नाही, ही सामाजिक विषमता दिसून येते.

माणदेशात पारधी लोकांना समाजाने त्यांच्या चारित्र्याबद्दल व प्रामाणिकपणाबद्दल शंका घेऊन कायम दूर लोटलेले दिसून येते. पारधी कितीही चांगले वागले, तरी सर्वसामान्य माणसाची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी कलुषितच असते. त्यामुळे अशा परिस्थितीसमोर हतबल होऊन त्यांना चोऱ्या कराव्या लागतात. त्यातूनच त्यांच्याविषयीचा दृष्टिकोन बळावत गेल्याचे दिसून येते. पारध्यांना प्रसंगी चोऱ्या करताना पकडलेही जाऊ शकते. अशाच एका प्रसंगाचे चित्रण 'पारधी' (१९८०) ह्या माणदेशी कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेले आहे :

'तुझ्या घराचा नंबर ? गल्ली ? बोळ ?'

'सायेब, मला घर नाही. पाल आहे. मी पालात राहतो.'

'अरे, घराशिवाय माणूस कायमचा पालात कसं राहातं? काहीतरी कायमचा निवारा पाहिजे. निदान झोपडी तरी ?'

'झोपडी पण नाही. माजं फकस्त पालचं!'

साहेब चित्र्याला विचारतात,

'अरे, घराशिवाय माणूस कसा राहतो?' त्यानंतर साहेबांनी चित्र्याला विचारलं,

'अरे, तुझा धंदा काय ?'

'मला धंदा काही नाही' पुन्हा साहेबांनी विचारलं,

'म्हणजे तुला शेती - जमीन काही नाही ?'

'काय नाय, साहेब ! आमाला शेत असतं, तर आम्ही असं भटकं राहिलोच नसतो.!'

'तुम्हाला स्वत:ची अशी जमीन नाही ?'

'नाही ना, साहेब !'

'हे खरंच आश्चर्यकारक आहे! म्हणजे हा माणूस तरी कसा ?' तोच पारध्याचे वकील मॅजिस्ट्रेटसाहेबांना सांगतात-

'साहेब, यांचं जीवनच असं वाऱ्यावर, उघड्यावर आहे. ते धक्का देणारं आहे.' (पृ. ३६-३७)

ह्या चित्रणावरुन माणदेशी समाजरचनेतील विषमता लक्षात येते.

माणदेशातील लोक कितीही मागासलेले असले, तरी तेथे माणुसकी मोठ्याप्रमाणावर असल्याचे दिसून येते. तेथील गरीब माणूस स्वत:जवळची भाकरी भुकेलेल्या माणसाला देताना दिसतो. हे समाजवास्तव निश्चितपणे माणुसकीच्या दृष्टीने सुखावह असल्याचे दिसून येते. ह्याविषयीचे चित्रण 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेले आहे: 'असं कसं, बाबा! तुझी आय मला काय म्हणंल ! मी तुला जाऊ

देणार नाय. माझ्या दारी आलास, चार घास घे अन मग जा.' 'माजी तुला 'आन' हाय बघ! तसा गेला तर !' (पृ. २४) माणदेशी लोकांच्या जीवनाचा हा वेगळाच पैलू आपल्याला दिसून येतो.

माणदेशात जातीयता मोठ्या प्रमाणावर असल्याचे जाणवते. त्याचबरोबर सवर्ण समाजाचा वचक अस्पृश्यवर्गावर असल्याचे समाजवास्तव ठळकपणे प्रत्ययास येते. त्याविषयीचे चित्रण पहा: 'ते तुमचं खरं! पण आमाला या गावात जगायचं हाय! या गावच्या येसीतनं येणाऱ्या माणसाला तुमी उदम्यानं हीतं आमच्या मांगाच्या झऱ्यावर पाणी पेल्याचं बघितलं, तर ते आमाला गावात जगू देतील का?' (पृ. ५३) ह्यावरून माणदेशात जे अस्पृश्य लोक आहेत, त्यांना कोणत्या कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागते, हे समाजवास्तव स्पष्ट होते. ह्यासंदर्भात प्रा. अंबादास माडगूळकर व प्रा. सूर्यकांत खांडेकर म्हणतात, "बहुशः खरातांच्या कथा - कादंबरीविश्वातील व्यक्ती दारिद्र्याने गांजलेल्या व सवर्ण हिंदूच्या अरेरावीने दबलेल्या अशा आहेत."[२२]

अलीकडे माणदेशातही अस्पृश्य समाज कोणत्याही रुढी - परंपरा पाळण्याच्या फंदात पडत नाही. कारण सवर्ण लोक पण माणसे आणि आम्ही पण माणसेच, असा विचार त्याच्या मनामध्ये रुजल्याचे दिसून येते. नुसते दुसऱ्याचे वेडेवाकडे बोलूनही तो घेत नाही. ह्याविषयीचे चित्रण पहा : " अरं ये, मला रंडी म्हणणाऱ्या ! मी रंडी हाय काय, कोण हाय, हे माज्या दाल्ल्याला ठावं ! तू नाकानं वांगी सोलणाऱ्या भाड्या, तुझी आय-भन दुसऱ्याखाली पडती, गावातली घरं पुंजत हिंडती, तेचा इचार कर ! अन् आता तुझी भन, तर म्हाराखाली पडायला येती, भाडकावू ! त्या तुज्या रंडीला आवर ! तिनं गाव नासवला !" (पृ.८१) ह्यावरून माणदेशातील अस्पृश्य स्त्रीसुद्धा अलीकडे स्वाभिमानाने जीवन जगताना दिसून येते. हे समाजवास्तव खरोखरच समतेच्या दृष्टिकोनातून निर्माण झाल्याचे दिसून येते.

- माणदेशातील जातीयता :

माणदेश हा मागासलेला, रुढी - परंपरा पाळणारा प्रदेश असल्यामुळे तेथे जातीयता पहावयास मिळते. जात ही मानवी समाजाला आतून पोखरणारी कीड आहे, ह्याचे वास्तव चित्रण शंकरराव खरातांच्या माणदेशी कादंबरीत पहावयास मिळते. माणदेशात दलित समाजावर अन्याय होताना दिसतो. त्याची पिण्याच्या पाण्याविषयी चालेलेली तडफड, मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून होणारी जिवाची तगमग, बहिष्कार, अन्याय, जुलूम ह्यांचा भेदक प्रत्यय

माणदेशी कादंबरीतून येतो. 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या कादंबरीतील पुढील चित्रण पहा: ''माझ्या समाजाची वस्ती लांब - गावाबाहेर. गावतटाच्या बाहेर. वाळीत टाकल्यावानी लांब लांब. सामाजिकदृष्ट्या बहिष्कृतच. आमची घरं वाळीत. माणसंही वाळीतच. अशा वस्तीत माझं बालपण व पुढं वयाची पंधरा - सोळा वर्षे गेली.'' (पृ.६) ह्यावरुन माणदेशातील जातीयता पराकोटीची तीव्र असल्याचे दिसून येते.

माणदेशात दलित समाजातील माणसाला कसलीही किंमत असलेली दिसत नाही. फक्त कामासाठी त्याला वापरुन घेतले जाते. काम झाल्यानंतर त्याला कोणी विचारतही नाही. समाजात राहूनच एखादा शिक्षण घेऊन नोकरीला लागला की, त्याची माणदेशात हेटाळणी होताना दिसते. शिवा महाराचा मुलगा ज्यावेळी इंजिनियर होऊन गावात येतो, तेव्हा त्याला पाहून गावातील लोक म्हणतात, 'काय रं! तू आमच्या उरावरनं बूट घालून चाललास ! डोळं का माथ्यावर आलं!' (पृ. ११) ह्यावरुन दलित माणसाने संवर्णासमोरुन जाताना खाली मुंडी घालूनच गेले पाहिजे, असा संकेत माणदेशात असल्याचे दिसून येते.

माणदेशात दलित स्त्रियांवर अत्याचार होताना दिसतात. दलित स्त्री म्हणजे संपूर्ण गावची भोगवस्तू असल्याचा समज माणदेशात दिसून येतो. एक सवर्ण माणूस ज्यावेळी एका दलित स्त्रीवर अत्याचार करु लागतो, तेव्हा ती स्त्री व तो पुरुष ह्यांच्यातील संवाद पहा :

'माजी इज्जत काय घेऊ नको!'

'अगं, तुज्या जातीला कसली अब्रु अन् इज्जत ! अशीच तू!....'

'कोण म्हणतंरं असं ! त्याचं मढं गेलं....आम्ही गरीब असलो, तरी अब्रुदार हाय ! कुलवान है! तू माज्या जातीला का मंधी आणतूस, भाड्या ! मुडद्या !' (पृ. ९८) थोडक्यात, माणदेशातील जातीय चित्रण मन विषण्ण करुन टाकणारे आहे.

- माणदेशातील अत्याचार :

माणदेशात जातीयता तीव्र असल्यामुळे प्रत्येक गावात सामाजिक संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो. दलितांनी पारंपरिक कामे केली पाहिजेत, असा सवर्णांचा आग्रह असलेला दिसून येतो. दलितांनी सवर्णांची लाकडे फोडावीत, मढ्याच्या गोवऱ्या - लाकडं मसणवट्यात टाकावीत, सवर्णांच्या वाड्यात झाडलोट करावी, सवर्णांचे शिळे राहिलेले खावे, मयताचे निरोप पोहोचवावेत, अशाप्रकारची पारंपरिक कामे दलितांनी सोडल्यामुळे त्यांच्यावर माणदेशात अत्याचार होताना दिसतो. 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी

कादंबरीतील चित्रण असे: '- म्हणूनच तुम्ही दंडेली करुन आमच्या लग्नाच्या वरातीची मिरवणूक सार्वजनिक रस्त्यांनी जाणं बंद केली. गावच्या मंदिरातही तुम्ही आम्हाला जबरदस्तीनं आमची पायरी दाखविली. गावच्या विहिरीचं पाणी जनावराच्या स्पर्शानं विटाळत नाही, पण तेच आमच्या स्पर्शानं विटळतं - बाटतं, अशी तुमची मनातील घट्ट भावना' (पृ.१७) ह्यावरुन माणदेशातील अस्पृश्य वर्गावर सतत अत्याचार होतात, असेच दिसून येते.

शंकरराव खरातांच्या माणदेशी दलित कादंबरीत वास्तवता दिसून येते. ग्रामीण भागातील माणूस कायद्यापेक्षा ताकदीचा वापर करुनच इतरांना धमकावत असतो. परंतु जातीय संघर्षात कायद्याचे रक्षण करणारे पोलीससुद्धा आपल्याच जातीच्या पाठीमागे राहून अस्पृश्यांचा छळ करताना दिसून येतात. ह्यासंदर्भात येणारे चित्रण असे : 'साल्यांनो ! असा माणसं मारण्याचा गुन्हा करता काय ! अन् उलट तुमीच बोंबलताय ! चला पोलीस स्टेशनावर ! माझ्याशी तुमची गाट आहे! मग तुम्ही आपोआप गुन्हा कबूल कराल ! ' (पृ. ७९) ह्या चित्रणावरुन माणदेशात जातीय संघर्ष अस्पृश्यांचा बळी घेताना दिसतो.

माणदेशात दलित स्त्रीवर शारीरिक अत्याचार होताना दिसून येतात. कारण दारिद्र्यामुळे अस्पृश्य लोक लाचार बनलेले असतात. त्यांना कोणीही मदत करीत नाही. अशावेळी दलित स्त्री पुरुषी अत्याचाराला बळी पडताना दिसून येते. त्याविषयीचे चित्रण 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या कादंबरीत असे येते :

'धावा ! धावा ! मला वाचवा ! वाचवा!'
'अगं, गप्प बसं. उगं का वरडतीस?'
'भाड्या ! दारु ढोसल्यावर का माणूस आय - भण इसरतं ? का जनावर होतं ? बोकडाच्या आवलादीच्या.'
तोच पुन्हा त्या पुरुषाचा गुर्मितच बरळता आवाज उठतो,
'अगं ! तू तर अशा खालच्या जातीची... तुला गं काय त्याचं?'
'मेल्या, खालच्या जातीच्या बायाला काय अब्रु न्हाय ? तुझं मढं गेलं !' (पृ. ९५) ह्यावरुन माणदेशातील अत्याचार हे जातीय संघर्षातूनच होताना दिसून येतात.

- माणदेशातील दारिद्र्य :

शंकरराव खरातांच्या माणदेशी कादंबरीतून उपेक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांचे चित्रण आलेले दिसून येते. हा समाज इतर वर्गातील समाजापासून दूर असलेला दिसून येतो.

त्यामुळे त्याचे नित्याचे व्यवहार हे अतिशय मर्यादित असलेले दिसून येतात. शेवटी निसर्गनियमानुसार 'बळी तो कान पिळी' ह्या न्यायाने माणदेशातील उच्च वर्णीय लोक खालच्या जातीतील लोकांना प्रत्येक व्यवहारात अडवताना दिसून येतात. दारिद्र्य हे माणसाच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचवते, ह्याचाच प्रत्यय कादंबरीतून येतो.

'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीतून दारिद्र्याचे येणारे चित्रण असे: 'घरात तर आई-बापाचा नाचार - गती दुबळा संसार गाडग्या - मडक्यांचा अन् चार भांड्या - बासणांचा. घरातल्या भांड्याकुंड्यातून, फाटक्या कपड्या - चिंध्यातून दारिद्र्य ऑ तोंड वासून बघत होतं. सगळ्या घरा - दाराला गिळायला ते आपला जबडा आऽऽ वासून कायमच उंबऱ्यात बसलेलं होतं.' (पृ. ६)

उच्च वर्णीय लोक माणदेशातील गरिबांना वेगवेगळी आमिषे दाखवून त्यांच्या दारिद्र्याचा फायदा स्वत:साठी उठवताना दिसून येतात. पैशाच्या जोरावर आपण काहीही करु शकतो. अशी खुमखुमी माणदेशी श्रीमंत लोकांना असल्याचे दिसून येते. त्यामुळेच माणदेशी स्त्री ह्या दारिद्र्याचा बळी ठरताना दिसून येते पहा :

'सोने ! तुला नवं लुगडं - चोळी करतो ! जत्रेवर सिनेमा दावतो ! मांज्याबरोबर येती का?'
'मी आपलं न्हाय म्हणून गप्पच !'
'मग तुम्ही तक्रार का केली न्हाय?'
'कशी वो तक्रार करायची ! तेच्या मळ्यात ऊस तोडायचं काम करत होतो ! तेच्या रोजगारानं पोटाला खात होतो. म्हणून तो आपला जवा तवा असं काय तसं काय बोलला, तरी मी आपली गप्पच! तरी ही गोष्ट मांज्या आयच्या कानावर घातली होती.' (पृ. ११२-११३)

- **माणदेशी परंपरा :**

माणदेश हा तसा शहरी संस्कृतीपासून दूर असल्यामुळे आणि माणदेशी माणसांचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्यामुळे तेथे वर्षानुवर्षे चालत आलेल्या रुढी - परंपरा पाळण्यात लोकांना धन्यता वाटते. माणदेश हा निसर्गाची अवकृपा असणारा प्रदेश आहे. पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे तेथील शेती ही निसर्गावर अवलंबून असलेली दिसते. त्यामुळेच माणदेशी माणूस हा दैववादी, परंपरावादी झाल्याचे दिसून येते.

माणदेशात जातीयता असल्याचे अनेक प्रसंगांवरुन दिसून येते. दलित लोकांची सावली अंगावर पडल्यास विटाळ होतो, आपली जात भ्रष्ट होते, अशा खुळचट कल्पना माणदेशात असल्याचे दिसते. त्यामुळे ह्या वर्गातील लोकांना आपल्यात मिसळून घ्यावयाचे नाही, असा दंडक असल्याचे जाणवते. नदीत पाणी भरताना दलितांनी नदीच्या खालच्या उतारावरुन पाणी घ्यावे किंवा नदीत खालच्या अंगाला झरे पाडून पाणी भरावे, असा तेथे दंडक असलेला दिसतो. परंतु तेथील लोकांना ह्याचे काही विशेष वाटत नाही. कारण माणदेशातील सांस्कृतिक परंपराच तशी आहे, 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीत ह्याविषयीचे चित्रण आलेले आहे, ते असे : '- तोवर गावच्या वाटेवरनं एक गडी खांद्यावर पाण्याची घागर घेऊन तरा तरा चालत झऱ्याकडं आला. तो झऱ्यावर आला, मजकडे बारीक नजरेनं बघून मला बोलला,

'ये बाबा ! आम्हा मांगाचा झरा हाय ! तुमी आमच्या झऱ्यावर कसं ?'' (पृ. ५२) ह्यावरुन माणदेशात गावच्या नदीतील पात्राच्या झऱ्याझऱ्यात जाती अडकलेल्या दिसून येतात. ही माणदेशाची वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा असल्याचे दिसून येते.

माणसाच्या मनात काही परंपरा कायमच्या कोरल्या जातात. माणदेशात हे चित्र ठळकपणे दिसून येते. ग्रामीण भागात मांगवडा - महारवाडा हे गावाच्या बाहेर असतात. ते गावात नसतात. ह्याची जाणीव अस्पृश्य वर्गातील लोकांच्या चांगलीच मनावर बिंबल्याचे दिसून येते. गावात एखादा चांगल्या कपड्यातील अनोळखी माणूस पाहताच हेच लोक त्याला सांगतात, तिकडे तुमची वस्ती आहे. पहा: 'हिकडं कुठं वाट चुकलाय ! गाव त्या येसीच्या आत हाय ! हिकडं बाहेर आमच्या वस्त्या. म्हारोडा - मांगोडा हाय !' (पृ. ५४) ह्यावरुन माणदेशात माणसाच्या अंगात जातीय परंपरा कशी भिनलेली आहे, हे दिसून येते.

ग्रामीण भागात कोणतेही सार्वजनिक काम करताना महार - मांग समाजातील लोकांना राबवून घेतले जाते. माणदेशही ह्याला अपवाद नाही. पहा : 'गावातल्या माणसाच्या जन्मापासून ते मरणापरंत आमची संगत. आमच्यांशिवाय गावचा खडा हालला न्हाय. इतकं असून आमी आमच्या गावात असून नसल्यागत. गावच्या भल्यासाठी आमी रातन ध्या राबलो. पावस म्हटला नाय का उनवारा म्हटलं न्हाय ! आमी आपला जीव तळातात घेऊन गावासाठी राब - राबलो. मर मर मेलो.' (पृ. ६७) ह्यावरुन माणदेशात सामाजिक परंपरेनुसार खालच्या जातीतील लोकांना राबवून घेतले जाते आणि तरीही त्यांना गावाच्या कोणत्याही प्रक्रियेत कोणतेही स्थान नाही, हे दिसून येते.

• परिवर्तनशीलता :

कोणत्याही माणसाला आपल्या जीवनात बदल हा हवा असतो. तसेच अन्याय सहन करण्यालाही काही मर्यादा असतात. त्या अन्यायाचा अतिरेक झाल्यास कोणताही माणूस सामाजिक रुढी - परंपरांची बंधने तोडण्यास उद्युक्त होतो. माणदेशी माणूसही ह्याला अपवाद नाही. खरातांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर असा दोन्ही काळ पाहिलेला, अनुभवलेला असल्यामुळे त्यांच्या माणदेशी कादंबरीत परिवर्तनशीलता दिसून येते. १९६५ च्या आसपास दलित साहित्याची चळवळ सुरु झाली. ह्या चळवळीचे अधिष्ठान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार असल्याचे दिसून येते. त्यातून दलित वर्गाची मानसिकता बदलत गेली.

माणदेशात पारधी समाजावर अत्याचार केले जातात. पारधी समाज हा आता पूर्वीसारखा राहिलेला दिसत नाही. त्याला आपल्या दररोजच्या जीवनात बदल असावा, असे वाटू लागल्याचे दिसून येते. 'पारधी' (१९८०) ह्या माणदेशी कादंबरीत ह्याविषयीचे चित्रण आलेले आहे, हे असे :

'काय रं चित्र्या, आता नोकरीची भाषा करतोस ?'
तोच चित्र्या सरळच म्हणतो -
'वकिला, आता चोरीचा अन् भीक मागायचा कंटाळा आला बघ !....नको ते भीक मागणं अन् शिळा भाकरीचा तुकडा अन नको ती विटलेली आमटी - वरण ! अरं, कुत्री - मांजरं - जनावरं खायची नायत ते अन आमी खातो !' (पृ. ४४)

माणदेशातील दलित समाज पेटून उठलेला दिसून येतो. कारण दलितांनी पिढ्यानूपिढ्या सर्व कामे केली. परंतु त्यांना माणूस म्हणून सवार्णांनी किंमत दिलेली दिसून येते नाही. शेवटी दलितसुद्धा हाडामासाचा माणूस आहे. त्यांनाही भावभावना आहेत आणि त्याच भावनांचा उद्रेक ह्या परिस्थितीत माणदेशात झालेला दिसून येतो. 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीत ह्याविषयी आलेले चित्रण पहा : 'बोला, तुम्हा गावाकऱ्यांचं काय म्हणणं आहे ? ही तुमची रुढी, परंपरा, वाडवडीलांची चाल आम्ही पाळावी ! पण का म्हणून ? ही तुमची रुढी, परंपरा आता आम्ही ठोकरीनं उडवतो ! आम्ही ती आता मातीत गाडतो ! तुमच्या या रुढी - परंपरेनंच आम्हाला तुमचं गुलाम केलं.' (पृ. १६)

माणदेशात दलित समाजाचे सवर्ण समाजातील लोकांची घरातील, शेतातील, मयतांची अशी सर्व कामे केली. सवर्ण समाजाने मात्र दलिताला एक माणूस म्हणून कधीच

किमंत दिलेली दिसत नाही. अलीकडील काळात शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाल्यामुळे अस्पृश्य वर्गाने परंपरागत कामे नाकारलेली दिसून येतात. ह्याविषयीचे चित्रण , 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेले आहे: "माणसावाणी वागायचं म्हणूनशान आमी गावची कामं सोडली, पड - झड्याची कामं बंद केली. झाडलोट बंद केली. सगळी कामं बंद केली. मढ्याची लाकडं असू का लग्नाची लाकडं असू, ती कामं बंद केली. आता आमा म्हाताऱ्याला बी कळायला लागलं. त्यात तरण्या - पोरांचं काय इचारता ! ती तर आमच्या म्होरं दोन पाऊलं ! त्यात आमची पोरं शाळेत जावून तेंच्या पोरांच्या मांडीला मांडी लावून बसू लागली. आता हेच आमच्या गावाला बघवना." (पृ. ६४-६५) ह्यावरुन माणदेशात अस्पृश्य समाजात नवविचाराचे व कृतीचे वारे वाहण्यास सुरुवात झाल्याचे दिसून येते.

माणदेशात सध्या दलित समाज वैचारिकदृष्ट्या जागृत झाल्याचे दिसते. पूर्वीच्या काळी माणदेशात दलित लोक ज्याच्या शेतामध्ये, घरामध्ये परंपरा म्हणून काम करीत व त्याच्याकडून मोबदला म्हणून बलुत्याच्या स्वरुपात मिळेल ते घेत. त्यामुळे मालकाचा वचक दलित समाजावर असल्याचे दिसून येते. वेळप्रसंगी मालकाकडून दलितांना चूक नसताना मार खावा लागे. दलित लोक मात्र त्याविरुद्ध एक शब्दही उच्चारत नसत. आज माणदेशात हे चित्र बदललेले दिसते. कोणताही माणूस दुसऱ्याचे ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. पहा : 'तुमी असा डाव करुन आमाला अंधारात गाठून मारता काय ? आमाला सरळ सांगून मारायचं ! मग आम्ही पण...!' (पृ. ७५) ह्यावरुन माणदेशात दलित समाजात परिवर्तन होत असल्याचे लक्षात येते.

### ५.६.३. माणदेशातील व्यक्तिचित्रण :

शंकरराव खरातांचा जन्म माणदेशातील एका दलित कुटुंबात झालेला असल्याने त्यांच्यावर तेथील सर्व सामाजिक संस्कार झालेले दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनात त्यांच्याबरोबर वावरत असताना खरातांना ग्रामीण सुखदु:खाची तेथील दलितांच्या व्यथा वेदनांची आणि त्यांच्या धर्मास्तव समाजकृत अध:पतनाची प्रत्यक्ष प्रचिती आली. खरातांचे बालपण भीषण दारिद्र्य आणि अस्पृश्यता ह्यांच्या दाहक अनुभवांनी करपून गेले होते. त्यामुळे त्यांचे संवदेनशील मन रक्तबंबाळ झाले होते. ह्या पार्श्वभूमीवर खरातांनी ग्रामीण जीवनातील सुखदु:ख विशेषत : तेथील दलितांच्या व्यथा - वेदना आपल्या व्यक्तिचित्रणातून

व्यक्त केलेल्या दिसून येतात. खरातांना सुरुवातीला ग्रामीण लेखक म्हणून ओळखले जात होते. ग्रामीण साहित्य व्यक्तिकेंद्रित असते. ग्रामीण व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत कृषिकेंद्रित संस्कृती, तेथील लोकमानस, सर्व गावगाडा हे घटक कारणीभूत असतात. अशा व्यक्तिमत्वाला केंद्रस्थानी ठेवूनच ग्रामीण साहित्यात व्यक्तिचित्रण येत असते.

माणदेशातील पारधी समाजातील एका मनी नावाच्या स्त्रीचे चित्रण 'पारधी' (१९८०) ह्या कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेले आहे : "वकिलांशी बोलताना तिचे दातवण लावलेले काळेश्यार दात उठून दिसत होते. ओठही दातवणाने काळे पडले होते. फासेपारध्याची ही मनी तशी वयानं झालेली बाई, पन्नाशीच्या पुढं, पण रानच्या खोकडागत चिवट. तिचा सावळा करपलेला चेहरा, पण तिच्या अंगातली तरतरी, चलाखी तशीच होती. मनीच्या डोक्यावरच्या झिंज्याचं बुरकुलं झालं होतं. अस्ताव्यस्त, कसंतरी. झिंज्या एकदम कोरड्या. राठ, पण अजूनही काळ्या " (पृ. ५-६) ह्या व्यक्तिचित्रणावरुन माणदेशातील पारधी समाजाचे दारिद्रय व मागासलेपणा दिसून येतो. पारधी समाज काटक कसल्याचेही दिसून येते.

ज्याप्रमाणे पारधी स्त्रिया काटक असतात. त्याच पद्धतीने पुरुषही दणकट असल्याचे जाणवते. 'चित्र्या' ह्या पारध्याचे व्यक्तिचित्रण पहा : 'त्याच्या गालावर दाढीची खुंटं उभी, मिशाला आकडे. अंगात तांबूस वाणाची पैरण पण त्याला बटणं नव्हती. त्यामुळं त्याचं छाताड उघडंच. खाली मात्र कापडी धडप्याची लंगोटी. त्याच्या मांड्या पिळदार, घोटीव - पण - उना - ताननं काळपट पडलेल्या. त्यातच तो पायानं अनवाणी. पाय धुळकटलेले. त्याच्या डोक्याला लांब लांब केस. फासेपारधी डोक्याचे केस कधी कापतच नाहीत. त्यांचा तो तसा रिवाज, परंपरा '(पृ. १५) ह्या व्यक्तिचित्रणावरुन पारधी समाजाच्या रुढी - परंपराही समजतात.

माणदेशातील अस्पृश्य समजाला सतत दारिद्र्याशी, प्रतिकूल सामाजिकतेशी व निसर्गाशी सामना करावा लागत असल्यामुळे हा समाज ह्या परिस्थितीशी सतत जुळवून घेऊन मनाने मजबूत झाल्याचे दिसते. अशा पद्धतीचे व्यक्तिचित्रण 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीत पहावयास मिळते, ते असे : 'ती बाई तशी चाळीशीतली. रंगानं काळसर - सावळी, नाकाडोळ्यानं तरतरीत. दाताला दातवण लावल्यानं दात काळं पडलेलं. कष्ट करुन बाई ठढलेल्या झाडाच्या बांडागत दिसत होती. त्यात अंगावर सोलापुरी तांबूस वानाचं लुगडं, अंगात हिरवट खनाची सैल दंडापर्यंतची चोळी, कपाळावर बिजवरासारखं गोंदलेलं, हातावरही गोंदलेलं. डोईचं वाळकं केस तसंच चोपून पदराखाली

घातलेलं.' (पृ. ७०) ह्या व्यक्तिचित्रणावरुन माणदेशात प्रचलित असलेल्या परंपरा, माणदेशी पोषाख व माणदेशी दारिद्र्य ह्यांची कल्पना येते.

एकंदरीत, माणदेशातील दारिद्र्य, माणसांचा दणकटपणा, प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेण्याची त्यांची हातोटी ह्या गोष्टी माणदेशी व्यक्तिचित्रणातून लक्षात येतात.

### ५.६.४. माणदेशाचे आर्थिक व धार्मिक चित्रण :

माणदेशाच्या आर्थिक चित्रणाचा विचार करताना स्पष्टपणे एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे सततच्या दुष्काळामुळे लोक आर्थिक विवंचनेत अडकलेले दिसतात. माणदेशी परिस्थिती व तेथील वातावरण हेच ह्यापाठीमागचे कारण दिसते. आर्थिकतेशी उपेक्षित वर्गातील लोकांचा जेमतेम संबंध येताना दिसतो. त्यामुळे ह्या उपेक्षित समाजातील लोकांची मानसिक कुचंबणा होताना दिसते. पारधी समाजातील स्त्री - पुरूष भीक मागण्यासाठी गावात येतात, जे मिळेल ते पोटाला खातात. एकदा एका वकिलाची बायको पारधी समाजतील भीक मागणाऱ्या 'खारी' नावाच्या तरुण मुलीला 'तू आमच्या घरी धुणी - भांडी करण्यासाठी येणार का,' असे विचारते; तेंव्हा ती लगेच होकार देते. त्यावेळचे चित्रण 'पारधी' (१९८०) ह्या कादंबरीत आलेले आहे, ते असे :

'अगं, तुला मी राहिलेली भाकरी - आमटी देईनच, पण तू महिन्याला कामाचं काय घेणारं?'
'माय ! तू दिलं, ते घेईन'
'पण पैसे ठरविलेले बरे !'
तिनं पुन्हा विचारलं -
'अगं! पण तू किती पैसे घेणार?'
'तू दिलं, ते घेईन ना, माय !'

तिचं तेच उत्तर. ती तरी दुसरं काय सांगणार ! तिनं दुसऱ्याकडे काम कलेलं नसणार. दिवसभर अशी भीकच मागायची ! तिला किती पैसे मागायचे, याचा काहीच हिशेब नाही. फक्त तिचा हिशेब हा भाकरीचा ! पोटाचा !! पोटातील भुकेचा!!' (पृ. २१) ह्या आर्थिक चित्रणावरुन माणदेशातील उपेक्षित समाजाचे वास्तव रुप प्रकर्षाने लक्षात येते.

माणदेशात पारंपरिकता जोपासली जाते, हे तेथील यात्रा-जत्रा, सण - समारंभ ह्यांच्या चित्रणावरुन स्पष्ट होते. धार्मिकता हा माणदेशी समाजाचा महत्त्वाचा गुण असल्याचे दिसते. ग्रामीण परिसरात प्रत्येक महिन्यातील सण - समारंभ वेगवेगळे असतात. माणदेशात आषाढ

महिन्यात यात्रा साजऱ्या केल्या जातात. त्याविषयीचे चित्रण, 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या कादंबरीत पुढीलप्रमाणे पहावयास मिळते: 'आषाढ महिन्यात आमोशा - पुनवेला आख्खं गावं अन् मावशीची भावकी - या देवीची पूजा करत होतं, हे मी लहानपणी पाहिलेलं होतं. या देवीपुढं बकरं कोंबडं पडत होतं. देवीला नवसानं कुणी लहान घाटी बांधत होतं. गोंडे तोरणे बांधत होते, हे लहानपणी पाहिलं होतं. आवस - पुनवेला देवीला सेंदूर लावलेला असायचा. तिला हिरवां खण नेसवलेला अन् हिरवा चुडा भरलेला असायचा' (पृ. २५) ह्यावरुन माणदेशातील अस्पृश्य समाजातील लोकांचीसुद्धा धार्मिकता इतर समाजापेक्षा वेगळी नसल्याचे लक्षात येते.

दलित लोक श्रद्धेने मंदिरात जाऊन नवस - सायास करतात. माणदेशात हा प्रकार मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळतो. 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या माणदेशी कादंबरीतील पुढील चित्रण पहा : 'बाईने, गड्याने पुन्हा हात जोडले. पुजाऱ्यानं बाईला अंगारा दिला. तिनं नवऱ्याच्या कपाळाला लावला. आपल्याही कपाळाला तिनं अंगाऱ्याचं बोट लावलं. बाकीचा अंगारा तिनं लुगड्याच्या पदरात बांधला. देवाच्या उंबरठ्यावर मारण्यासाठी बाईनं पुजाऱ्याच्या हाती चकचकीत पाच रुपये दिले. ती दोघं गाभाऱ्याबाहेर पडली.' (पृ. २८) ह्यावरुन माणदेशातील लोकांच्या मनात असणारा देवाविषयीचा भाव व्यक्त होतो.

माणदेशातील लोकांची मानसिकता कमालीची धार्मिक असल्याचे दिसते. कारण देवळासमोरुन एखादा माणूस सहज जरी चालला असला, तरी तो मंदिरात जाऊन मनोभावे दर्शन घेतो. ह्याविषयीचे चित्रण 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेले आहे : 'काठी, कांबळी खाली ठेवली. तो हात जोडून उभा राहिला. डोळं मिटून तोडानं पुटपटला ! देवाचा नामोच्चार केला. 'शंभोऽऽ !' मग भक्तिभावानं पायरीवर मस्तक ठेवलं. पायरीवरची धूळ - माती कपाळाला लावली. गळ्यातल्या माळेला मातीचं बोट लावलं, त्यानं देवळांभोवती फेरी टाकली. पुढे येऊन पुन्हा त्यानं एकवेळ मान वाकवून देवाला हात जोडले.' (पृ. २९) ह्यावरुन माणदेशात देवावर लोकांची मनापासून श्रद्धा असल्याचे जाणवते.

### ५.६.५. माणदेशाचे भाषिक चित्रण :

भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाषेवरुन माणसाचा सामाजिक स्तर समजण्यास मदत होते. माणदेशातील दलित समाजातील लोकांची भाषा ही खास माणदेशी बोली असल्याचे आढळते. त्यातील विशिष्ट शब्द, वाक्प्रचार व म्हणी प्रादेशिक भाषेचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणून सांगता येतात.

शंकरराव खरातांना ग्रामीण जीवनाचा अनुभव चांगलाच होता. त्यांचे बालपण माणदेशात गेल्याने त्याठिकाणच्या रीतिरिवाजांची व उद्ध्वस्त नीतिमत्तेची त्यांना जाणीव होती. त्यांनी केलेली वातावरणनिर्मिती, त्यांचे चित्रणकौशल्य, त्यातील चपखल शब्दयोजना ह्या सर्वांचे प्रभावी दर्शन त्यांच्या कादंबरीतून घडते. म्हणूनच 'गावचा टिनोपाल गुरुजी' (१९७१) ही स्वातंत्र्यानंतरची खेड्याला देणगी आहे, असे उद्गार ह्यासंदर्भात डॉ. भालचंद्र फडके ह्यांनी काढले आहेत.[२३] खरातांची भाषा साधी, सोपी आणि प्रवाही आहे. सामान्य माणसांची वेदना त्यांच्याच भाषेत मांडल्यामुळे चित्रण प्रभावी वाटते. ओघवत्या भाषाशैलीमुळे कोणतीही व्यक्तिरेखा उभी करताना त्यांच्या प्रतिभेला कैफ चढतो. 'पारधी' (१९८०) ह्या कादंबरीतील पुढील चित्रण पहा : 'मनीनं आपली अब्रु झाकण्यासाठी कंबरेला एक विटक्या - फाटक्या, जीर्ण लुगड्याचा मळकट तुकडा गुंडाळलेला होता. वर गुडघ्यापर्यंत त्यामुळे तिच्या पोटरीचा भाग उघडाच होता. तिचे पाय मात्र बाभळीच्या लाकडागत खणखणीत. तिच्या धुळकटलेल्या पोटऱ्यावर ओरखाडे ठळक दिसत होते.' (पृ. ६) आटोपशीर संवाद, प्रभावी निवेदन, जिवंत व्यक्तिचित्रण व अर्थपूर्ण शब्द ह्यामुळे 'पारधी' ही माणदेशी कांदबरी यशस्वी ठरते.

शंकरराव खरातांनी माणदेशी संस्काराचा वापर आपल्या कादंबरीलेखनात पुरेपूर केलेला दिसतो. दलितांच्या वास्तव निवेदनपद्धतीचा वापर करुन त्यांनी दलित समाजाच्या दु:खाचे प्रत्यककारी दर्शन घडविले आहे. 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ह्या कादंबरीत दलित स्त्रीची अब्रू म्हणजे कवडीमोलाची, तिला कधीही चुरगळावे अशी धारणा माणदेशात दिसते. एक मालक दलित स्त्रीची इज्जत लुटण्याच्या उद्देशाने तिला कोंडून ठेवतो. तेव्हा तिच्या शब्दावरुन ती दलित असल्याची जाणीव दलित तरुणाला होते व तिला मदत करण्यासाठी तो जातो, तेव्हाचा संवाद पहा :

'दार उघड!' त्यावर काहीच प्रतिसाद येत नाही. थोड्यावेळाने आतून पुरुषाचा आवाज येतो.

'अंग ! तुला बंगल्यात ठेवीन ! फटफटीवर फिरवीन !' तेव्हा चिडलेल्या स्त्रीचा आवाज येतो.
'जळूदे तुझी फटफटी अन् बंगला ! मला माझी आब्रु लाखमोलाची हाय !'
'अगं ! तुला कशाची अब्रु ! इज्जत ! कुठंही अशी उघड्यावर पडणारी तू !'
'आमच्यावर या काळात परसंग आला !' त्याचा फायदा घेतोस व्हय रं मेल्या ! मला सोड ! सोड !'
'तुला सोडण्यासाठी हितं आणली व्हय गं !'
'भाड्या ! मुड्या ! माझी अब्रु लुटलीस तर तुजा जीवच घेईन ! अन् मी फासाला जाईन !' (पृ. ९६) ह्या संवादातून माणदेशी भाषेचे वास्तव दर्शन घडते.

खरातांनी माणदेशी म्हणी व प्रतिमा ह्यांचा आपल्या कादंबरीलेखनात वापर केलेला दिसतो. पहा : 'तिकडं आड, इकडं विहीर' ('मी माझ्या गावाच्या शोधात', पृ. ७८), 'कर नाही त्याला डर कशाची' ('पारधी', पृ. ४४), 'मनी रानघोरपडीसारखी सळाळा वेगात चालत होती.' ('पारधी', पृ. १०)

एकंदरीत, शंकरराव खरात ह्यांच्या माणदेशी कादंबरीतून दलित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार परखडपणे मांडलेले आढळतात. परंतु त्यातून बाहेर पडण्यासाठी आवश्यक असणारी वैचारिकता जाणवत नाही. माणदेशात ज्या अल्पसंख्य जमाती आहेत, त्यांचेही चित्रण करण्यात खरात यशस्वी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे व्यापक सामाजिकता त्यांच्या माणदेशी चित्रणातून समोर येते.

## ५.७. द. ता. भोसले ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण :

द. ता. भोसले ह्यांचा जन्म माणदेशातीलच आहे. त्यांच्या घरातील परिस्थिती अतिशय बेताची, गरिबीची होती. त्यामुळे दोनवेळचे अन्न मिळवतानासुद्धा कष्ट पडावयाचे. आई-वडील शेतमजुर असल्याकारणाने भोसले ह्यांना लहानपणापासूनच दुसऱ्याच्या शेतामध्ये काम करावे लागले. त्यातून त्यांनी जी सामाजिक दाहकता अनुभवली, त्या दाहकतेचा प्रत्यय द. ता. भोसले ह्यांच्या माणदेशी कादंबरीतून पहावयास मिळतो.

भोसले ह्यांचे बालपण दारिद्र्यात गेल्यामुळे त्यांना खूपच त्रास सहन करावा लागला. परंतु त्यामुळे त्यांना सामान्य ग्रामीण माणूस जवळून अनुभवता, पाहता आला. ह्या परिस्थितीत पोटाची भूक भागविणे, ही अतिशय कठीण गोष्ट असल्याची जाणीव त्यांना झाली. त्यातूनच आपण सुखाने जगावे, अशी इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. आपण सुखी झाल्यानंतर

आपल्यासारखे वाईट दिवस आपल्या माणदेशी बांधवांच्या नशिबी येऊ नयेत, असाही प्रयत्न त्यांच्या लेखनातून चित्रित होताना दिसतो. माणूस म्हणून जगणे, हेच त्यांचे स्वप्न असल्याचे दिसते. ते पूर्ण करण्यासाठी समाजाशी सतत संघर्ष करावा लागतो. त्यातून पदरी अपयशच येण्याचा मोठा धोका असतो. त्यामुळे त्यांच्या कादंबरीवर दु:खाचे सावट, वेदनेचा, उपेक्षेचा, असाहाय्यतेचा, दुर्बलतेचा ठसा उमटल्याचे दिसते.

दुष्काळी माणदेशी प्रदेशाशी भोसले ह्यांचे जीवन बांधले गेल्याने आणि दारिद्र्यपीडितांपैकी ते स्वत: असल्याने त्यांच्या माणदेशी कादंबरीलेखनावर ह्या सर्व परिस्थितीचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसते. माणदेशात गरीब लोकांची संख्या खूप आहे. त्यामुळे सतत कोणती ना कोणती विवंचना पाठीशी असणारे लोकच भोसले ह्यांच्या कादंबरीचे नायक असलेले दिसून येतात. त्यामुळे त्यांच्या लेखनाला वास्तवतेचे रुप प्राप्त होते. भोसले ह्यांच्या कथेंत कामवासनेला उत्तेजन मिळत नाही. मात्र कादंबरीतून हे चित्रण ठळकपणे दिसून येते. भोसले ह्यांनी आपल्या कादंबरीलेखनात माणूस आणि त्याच्यातील माणूसपण शोधण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट दिसून येते.

द. ता. भोसले ह्यांच्या माणदेशी कादंबरीला तेथील प्रादेशिक अनुभवांनी आकार दिलेला दिसतो. नव्या प्रदेशदर्शनाला, नव्या जीवनजाणिवेला उठाव देण्यास ही प्रादेशिकता कारणीभूत असल्याचे दिसते.त्यांच्या माणदेशी कादंबरीत ग्रामीण ढंगाचा विनोद पहावयास मिळतो. त्यात शब्दनिष्ठ विनोदापेक्षा प्रसंगनिष्ठ व स्वभावनिष्ठ असेच विनोदाचे स्वरुप असल्याचे दिसते.

द. ता. भोसले ह्यांच्या 'मी आणि माझा बाप' (१९६९), 'इथे फुलांना मरण जन्मता' (२००१) अशा दोन ग्रामीण कादंबऱ्या होत. त्यापैकी माणदेशाचे चित्रण करणारी 'मी आणि माझा बाप' ही एकच कादंबरी आहे. 'इथे फुलांना मरण जन्मता' ह्या कादंबरीत माणदेशी जीवनचित्रण जरी पहावयास मिळत नसले तरी, ह्या कादंबरीत माणदेशी संस्काराने प्रभावित झालेले आणि माणदेशाशी साधर्म्य दाखविणारे चित्रण मात्र पहावयास मिळते.

द. ता. भोसले ह्यांच्या माणदेशी कादंबरीत मूल्यहीन बनलेली समाजव्यवस्था पहावयास मिळते. ह्यासंदर्भात वासुदेव मुलाटे म्हणतात, "धर्माच्या नावाखाली चाललेला धुडगूस, कर्मकांड आणि अंधश्रद्धा, एकूण गरीब माणसांची होणारी विविध पातळ्यांवरची पिळवणूक आणि नाडवणूक यांचे चित्रण लेखनातून येते."[२४]

### ५.७.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

द. ता. भोसले हे स्वत: ग्रामीण जीवनाचा जन्मजात वारसा लाभलेले साहित्यिक आहेत. कृषिजीवनातील सुखदु:खाचे कंगोरे त्यांनी अनुभवले आहेत. म्हणूनच ह्या अनुभवलेल्या विश्वाला त्यांनी कादंबरीमधून कधी गांभीर्याने, कधी आत्मपीडेच्या जाणिवेतून, तर क्वचित प्रसंगी विनोदाच्या अंगाने अभिव्यक्त केल्याचे पहावयास मिळते. माणदेशातील भौगोलिकता भोसल्यांच्या कादंबरीतून अनेक ठिकाणी चित्रित होताना दिसते.

'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या कादंबरीत माणदेशातील भौगोलिक चित्रण पुढीलप्रमाणे आलेले आहे: 'आमचे सरकोली हे गाव भीमा आणि माण नदीच्या संगमावर वसलेलं आहे. नदी गावाला अंगदी खेटून जात असल्याने थोडा जरी पूर आला, तरी गावाला पाण्याचा वेढा पडे. सारं दळणवळण बंद होई. पाणी वाढू लागले की एकेक इसम घरातील भांडी-कुंडी घेऊन गावात उंचावर असलेल्या बहिरोबाच्या देवळात उतरे. कहीजण खंडोबाच्या माळावर तात्पुरती वस्ती करीत. दरवर्षी पाणी चढे. गावाला वेढा पडे. घरे जमीनदोस्त होत.' (पृ. ९०) ह्यावरुन माणदेशात सरकोली येथे पुराच्या पाण्याने खूप नुकसान होते, हे लक्षात येते.

माणदेशात मऊ जमिनी शेतीला चांगल्या असल्याचे जाणवते. डोंगराच्या पायथ्याच्या कराल जमिनी शेतीला चांगल्या नसल्याचे दिसते. त्यामुळे आहे त्या मऊ जमिनीतून शेतकरी धनगरांची मेंढरे बसवून जमिनीचा कसदारपणा वाढवतात. ह्याविषयीचे भौगोलिक चित्रण असे: 'सरकोलीला तसा पाऊस कमी. त्यामुळे मऊ जमिनी पिकतात. कराल राने सदा उघडी - बोडकी पडलेली असायची. त्यामुळे मऊ शेताला खतपाणी घालतात. पुरेसं खत मिळत नसल्यानं सांगोला, दहिवडी, आटपाडी भागातील धनगर उन्हाळ्यात मेंढरांचे कळप घेऊन आले की, शेतकरी त्यांना रोज एक पायलीभर ज्वारी देऊन त्यांचे कळप आपल्या शेतात बसवत असत. मेंढरांचं खत हे पिकाला फार चांगलं असतं.' ('मी आणि माझा बाप', पृ. ९१-९२)

माणदेशात ज्वारी, हरभरा, करडी ह्यासारखी कमी पावसावर येणारी पिके घेतली जातात. ह्याविषयीचे चित्रण पहा : 'सूर्याची कोवळी किरणे साऱ्या शिवारात विस्कटली होती. ज्वारी, हरभरा गुडघा गुडघा वर आलेला होता. थंडीमुळे हरभऱ्यावर आंब धरत होती.

ज्वारीच्या शेतात मध्येच करड्याचे पट्टे वा तुरीचे पट्टे होते.' ('इथे फुलांना मरण जन्मता', पृ. २-३)

## ५.७.२. माणदेशाचे सामाजिक व सांस्कृतिक चित्रण :

द. ता. भोसले हे माणदेशातील सध्याच्या काळातील आघाडीचे ग्रामीण साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यामुळे सध्याच्या माणदेशातील वास्तवचित्रण त्यांच्या कादंबरीतून पहावयास मिळते. भोसले हे स्वत: गरीब कुटुंबातून आलेले असल्यामुळे त्यांच्या लेखनात भुकेचा प्रश्न प्रामुख्याने आलेला दिसतो. सध्याच्या समाजातील वास्तव, दारिद्र्य, अज्ञान, पुरुषांचा उंडगेपणा, परंपरा यात्रा ह्या सर्वांचे चित्रण त्यांच्या माणदेशी कादंबरीतून पहावयास मिळते.

- **माणदेशी सामाजिक वास्तव :**

माणदेशातील सर्वसामान्य वर्गाचे चित्रण भोसले ह्यांच्या कादंबरीमध्ये पहावयास मिळते. माणदेशी लोकांचा आहार हा तेथील पिकांवरुन दिसून येतो. ह्याविषयीचे सामाजिक वास्तव पहा : 'घरात मावशीनं तिच्या गावाकडून आणलेलं जवसाचं तिखट असायचं. भाकरीचा पापुडा काढून चवीनं खाऊन झाल्यावर आम्ही भाकरी तळहातावर घेत असू. त्यावर हे तिखट घालून डेऱ्यातल्या पाण्यानं ओलं केलं की, आम्ही मोठ्या आनंदानं जेवत बसत असू. ताजी भाकरी हे आमचं पक्वान्न होतं.' ('मी आणि माझा बाप', पृ. ३) ह्यावरुन माणदेशातील वास्तव तर समोर येतेच, पण मावशीची माया पण दिसते.

माणदेशातील श्रीमंती ही माणुसकीची असल्याचे दिसून येते. एखाद्या मुलाची आई स्वर्गवासी झाली, तर त्या घराकडे मुलाची मावशी लक्ष पुरविते हे सामाजिक वास्तवाचे वेगळे रुप माणदेशात पहावयास मिळते. 'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या कादंबरीतील पुढील चित्रण पहा : 'आम्ही - बिगर आईची (बापाचीही) कोवळी फुलं म्हणून आमच्यावर तिचा खूप जीव असे. सिदेवाडीवरुन ती आम्हाला कधी कापडचोपड आणी थालीपीठं - कडबोळी घेऊन येई, तर कधी पुरणपोळ्या घेऊन येई. पोरांचा दुस्वास होईल म्हणून तिनं बापाला दुसरं लग्न करु दिलं नव्हतं.' (पृ. ४) ह्यावरुन माणदेशात कुटुंब चालविण्याची जबाबदारी पुरुषांपेक्षा स्त्रीवर जास्त असल्याचे दिसून येते. तसेच तरुण पुरुष हे स्त्रियांच्या बाबतीत विश्वास ठेवण्याच्या योग्यतेचे नसतात, असेही दिसून येते.

माणदेशात शिक्षणाचा प्रसार अतिशय कमी असल्याचे दिसून येते. त्यातून शाळेच्या इमारतीचा उपयोग गावातील उद्योगी व निरुद्योगी लोक आपापल्या कामासाठी करताना दिसतात. ' मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या माणदेशी कादंबरीतील पुढील वर्णन पहा : 'शाळा म्हणजे आगगाडीच्या डब्यासारखी एक लांबट जागा. आकार डब्यासारखा अन् घाणही डब्यासारखीच. शाळेच्या एका कोपऱ्यात एखादा भोई आपलं तुटलेलं जाळं विणत असतो. एका कोपऱ्यात पत्त्याचा डाव चालतो. तिसऱ्या कोपऱ्यात बसता येणार नाही इतकी घाण साचलेली असते आणि उरलेल्या एका कोपऱ्यात मास्तर नावाचा प्राणी बसलेला असतो.' (पृ. ३५) ह्यावरुन माणदेशातील शाळा म्हणजे गावकऱ्यांच्या करमणुकीचे ठिकाण असल्याचे पहावयास मिळते.

माणदेशात सततच्या गरिबीला कंटाळून पुरुष चोऱ्या करताना दिसतो. तसेच स्वतःच्या मुलांनापण तो चोरीचा व्यवसाय शिकवताना दिसतो. पुढील चित्रण पहा : 'थ्ये त्येच्या मी ! गाडवा, लगवीला गेल्यासारकं करुन शिरायचं मळ्यात ; आन् भरायचे खिसे. मी न्हायी आनत रोज ?' (पृ. ९४)

- माणदेशातील अज्ञान :

माणदेशात प्रतिकूल वातावरणाचा परिणाम माणसाच्या संपूर्ण जीवनावर होताना दिसतो. पुरेसे शिक्षण नसल्यामुळे नोकरी नाही, अशी अनेकांची अवस्था असलेली दिसते. त्यामुळे नुसते खावयाचे, गावातून टगेगिरी करीत फिरावयाचे व कोणत्याही गोष्टीचे ज्ञान नसल्यामुळे अंगातील ताकदीच्या जोरावर चांगल्या माणसांना दम देऊन आपण खूप शहाणे आहोत, हे दाखवावयाचे, अशी पद्धत माणदेशात अस्तित्वात असलेली दिसते. ह्यासंदर्भात 'मी आणि माझा बाप' (१९६९) मधील पुढील चित्रण पहा :

"कारं, असा मधीच आलास ? साळा न्हायी का तुला?"
"मास्तर पाटी - पुस्तक आन म्हनतुया. त्याबिगार पाऊल टाकू नगंस, असं म्हनाला."
"आरी तिच्या मारी, ह्ये मास्तरडंबी लई उंडारवाल्यानी झालंया."
"त्यो म्हनतो की, तुच्या बापाला पाटी आनून द्येयाला काय हुतंया."
"त्येला म्हनावं पण तू कशाला त्वांड बुचकळतूस मधी. साळा का त्येच्या बापाची हाय ? चल, कसा येऊ देत न्हायी त्येच बगतो." माझ्या बापानं शाळेच्या खालच्या पायरीवरुनच

हाक मारली. "आरे ये मास्तरा, जरा खाली ये." (पृ. ३७-३८) ह्यावरून माणदेशातील लोकांच्या ठिकाणी असणारे अज्ञान प्रकर्षाने समोर येते.

- माणदेशाचे सांस्कृतिक चित्रण :

माणदेशात शेतीतील कामे संपल्यानंतर प्रत्येक गावात देवदेवतांच्या यात्रा सुरु होतात. 'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या माणदेशी कादंबरीतील ह्यासंदर्भातील सांस्कृतिक चित्रण पहा : 'चैत्राच्या महिन्यात आमच्या गावाला बहिरोबाची यात्रा भरते. गावातील तरुण देवाला अभिषेक घालतात. देवाचा रथ निघतो. तो रथ माणसांनी ओढायचा असतो. त्याची पुजा केली जाते. देवाचं लग्न लावून छबिना निघतो. नारळ फोडणे, गूळ वाटणे, कपडे वाहणे, असले नवस केले जातात. त्यानिमित्ताने कुस्त्यांचा जंगी फड भरतो. रात्री तसाच सुप्रसिद्ध तमाशा असतो. हजारो रुपये यात उधळले जातात.' (पृ. ६६) ह्यावरुन माणदेशाची सांस्कृतिक परंपरा इतर प्रदेशासारखीच असल्याचे दिसून येते. कादंबरीकारांच्या गावालगत नदी असल्यामुळे रिकामटेकड्या माणसांना वेगवेगळी व्यसने लागलेली दिसतात. माणदेशातील हे चित्रण पहा : 'माझ्या गावाला जी अनेकविध व्यसने आहेत, त्यातील मासे खाणे हे एक आणि पत्त्याचा डाव खेळणे, हे एक अत्यंत प्रिय अशी आहेत.' (पृ. १०१)

### ५.७.३. माणदेशातील व्यक्तिचित्रण :

द. ता. भोसले ह्यांच्यावर लहानपणापासून गरिबीत जीवन जगण्याची वेळ आल्यामुळे त्यांच्या कादंबरीत येणाऱ्या व्यक्तिरेखासुद्धा 'भूक' ह्या घटकाच्या भोवती फिरताना दिसतात. त्यातून वेगवेगळ्या नमुन्याची माणदेशी माणसे समोर येताना दिसतात. 'जसा देश, तसा वेष' ह्या न्यायाप्रमाणे भोसले ह्यांच्या कादंबरीत येणाऱ्या व्यक्तिरेखा ह्या ऐतखाऊ, बनेल असलेल्या दिसतात. अशीच एक व्यक्तिरेखा 'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या कादंबरीत पहावयास मिळते. बाळ्याचा बाप ही ती व्यक्तिरेखा होय. बाळ्याचा बाप बसून खाणारा, परंतु गावात सर्वांच्या उचापत्या करणारा असतो. अनेक दिवस बाळ्याच्या बापाने भालकाच्या हॉटेलातून खाल्ले, परंतु पैसे उधार ठेवलेले होते. पैसे मागण्यासाठी भालके आला की, बाप पळून जायचा. एक दिवस भालके बापाला गाठतो. त्यावेळचे चित्रण पहा :

"माजं पैसं दिलं न्हायीत, तर मग बग अं, बापू."
"तर काय करशील?"

"पोलीसात जाईन मी."
"ल्येका. पोलीसात जायचं म्हंजे काय हागायला जान्याइतकं सोपं हाय व्हय रं. ?"
"त्ये कायबी असू दे, पैले माझे पैसं दे. "
"भालक्या, गप बसतु तर लईच टुरुटुरु लावलंया ल्येका, लायसन नसताना हॉटेल चालवतुस ! पंडरपूरला जाऊन सायबाला आनल्यावर करील सगळंच जप्त ! मग बस बोंबलत." (पृ. ८८-८९) ह्या व्यक्तिचित्रणावरुन माणदेशातील इरसाल नमुन्याची माणसे समोर येतात.

माणदेशात जे थोडेसे श्रीमंत लोक आहेत, त्यांचा स्वभाव परिस्थितीने घाबरट बनल्याचे दिसते. कारण सर्वांकडे सतत पैशाची उणीव असलेली दिसते. त्यामुळे ज्याच्याकडे पैसे आहेत, त्याच्या घरी चोरी होते किंवा गोड बोलून, भीती घालनू पैसे उकळण्याचे प्रकार माणदेशात होताना दिसतात. ह्यातूनच रामराव जाधवाची व्यक्तिरेखा साकार होताना दिसते. 'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या कादंबरीत बाळूचा बाप रामराव जाधवाला म्हणतो.
"काल कोर्टात गेलूतो तवा एक बातमी ऐकली मी."
"कसली गा ?"
"एक दोन रोजात गावात मामलेदार यायचा हाय म्हनं."
"अस्सं ? पन कशाला येतुया?"
"लेवी वसूल करायला. सगळ्यांचं दानं घेऊन जाणार."
"खरं म्हंतूस तू ?"
"देवाच्या शपथ. तुज्या चाळीस पोत्यातलं योकबी पोतं ठिवायचा नाही."
"इतकी कुठली गा माझ्याजवळ !"
"अगा पन मामलंदाराला सगळं ठावूक झालंया." (पृ. २४). ह्यावरुन जाधव हा भित्रा असल्याचे दिसते. त्यातून माणदेशातील लोक एकमेकांवर कुरघोडी करण्यात पटाईत असल्याचे दिसून येते.

### ५.७.४. माणदेशाचे आर्थिक चित्रण :

द. ता. भोसले हे गरीब कुटुंबातील असल्यामुळे साहजिकच त्यांच्या कादंबरीतून सर्वसामान्य वर्गातील लोकांचे आर्थिक चित्रण आल्याचे पहावयास मिळते. सततचा दुष्काळ, कमी पावसाचा प्रदेश ह्यामुळे तेथील लोक आळशी, दैववादी बनल्याचे दिसते. वाडवडिलांनी कमवून ठेवलेलेसुद्धा मुलांना सांभाळता येत नाही. ह्यातूनच आर्थिक दारिद्रय ओढवलेले

दिसते. 'मी आणि माझा बाप' (१९६९) मधील पुढील आर्थिक चित्रण पहा : 'आजोबानं खूप कमावलं पण माझ्या बापानं अगदी जिद्दीनं गमावलं.पैसा संपला की, शेत विके अन् शेत विकले की पैसे संपवी. त्यात मुलखाचा ऐदी ! खाण्याशिवाय आयुष्यात दुसरे काम केले नाही. दिवसेंदिवस कंगालपणा वाढत गेला.' (पृ. ४) ह्यावरुन माणदेशात लोकांना आर्थिक ओढाताणीत जीवन जगावे लागते, हे लक्षात येते.

बाळूच्या बापाने कोणाकडूनही पैसे घेतले, तरी तो ते पैसे कधीही परत करीत नाही. माणदेशात अशा प्रकारची आर्थिक फसवेगिरी होताना पहावयास मिळते. पुढील चित्रण पहा :

''बापू, माजं पैसं दे की,''
''कदीतरी देईन बरं'' म्हणून तो निघे. मागं लागल्यावर तो म्हणायचा,
''आपुन असं करावं का, बाळ्या !'' ''कसं ?''
''तू अजून चार आने दे. म्हंजे मी तुला बारा आने देईन.''
''मी गप्प बसत असे. पैसे मागण्याचा नाद सोडून देई. माझा बाप कधीही पैसे परत करीत नसे. त्याच्या रक्तातच ते नाही.'' (पृ. १०)

माणदेशातील बाळूचा बाप सतत दुसऱ्यांच्यापुढे पैशासाठी हात पसरतो, कर्ज फेडण्यासाठी पत्ते खेळतो व आणखी कर्ज तसेच राहते. ह्याविषयीचे आर्थिक चित्रण पहा : 'दिवस - दिवसभर पत्ते खेळूनही माझ्या बापाला यात विशेष कमाई होत नसे. आज दोन - तीन रुपये मिळाले, तर उद्या चार - सहा रुपये गमावून बसे.त्यामुळे तो सदा कर्जबाजारी असे. पण कर्ज काढूनदेखील तो खेळत बसे. त्याला वाटायचे आज ना उद्या सारं कर्ज फिटेल या खेळामुळेच !' ('मी आणि माझा बाप - १९६९', पृ. १०३) ह्या चित्रणावरुन माणदेशातील लोक आशावादी व दैवावर भरोसा असल्याचे दिसून येते.

### ५.७.५. माणदेशाचे धार्मिक चित्रण :

द. ता. भोसले ह्यांचे सरकोली (ता. पंढरपूर) हे गाव महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पंढरपूर ह्याच्या खूपच जवळ असल्याकारणाने त्यांच्या कादंबरीत धार्मिक चित्रण सतत आलेले आढळते. तसेच माणदेश हा भाग दुष्काळी असल्याने लोकांचा देवावर विश्वास जास्त असल्याचेही जाणवते. माणदेशाच्या पूर्वेस असणारे सरकोली हे गाव माणदेशातील एक सधन गाव म्हणून ओळखले जाते. त्यामुळे माणदेशातील ह्या भागातील लोक देवाचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करुन घेताना दिसतात.

'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या माणदेशी कादंबरीत बाळ्याचा बाप सतत खोटे बोलून दुसऱ्याकडून पैसे उकळतो. ज्याचे पैसे घेतले, त्याला काय परत द्यायचे, अशा संकटात सापडला असताना तो सरळ पायातील चप्पल व धोतर देऊन आपली सुटका करुन घेतो. जवळ काहीच शिल्लक नाही म्हणून स्वतःच्या मेहुणीकडे बाळ्याला घेऊन सिदेवाडीला येतो. तेथे आल्यानंतरचे पुढील चित्रण पहा : "बाळ्या, चल देवाच्या पाया तरी पडून येऊ. माझ्या बापाला देव आठवल्याचे बघून मावशीला आनंद झाला. आम्ही देवळात गेलो. परतताना माझ्या बापाच्या पायात कोल्हापुरी कोरी करकरीत चप्पल होती. त्याला देव पावला होता." (पृ. ४०) ह्यावरुन माणदेशातील सधन भागामध्ये धार्मिकता ढोंग म्हणून वापरण्यात येत असल्याचे लक्षात येते.

माणदेशात श्रीकृष्णजन्माचा धार्मिक सोहळा खूप मोठ्या प्रमाणावर उत्साहाने साजरा होताना पहावयास मिळतो. त्यावेळी वीणा उभा करतात. तो आठ दिवस खाली ठेवायचा नसतो. त्यावेळी जो वीणा घेऊन उभा असतो, त्याचे लोकं भक्तिभावाने दर्शन घेतात व ओवाळणी टाकतात. त्यावेळी बाळूचा बाप वीणा घेऊन ओवाळणी उकळायचा. त्याचे चित्रण पहा : 'श्रावण महिन्यात श्रीकृष्ण जन्मानिमित्त आमच्या गावी सात दिवसांचा एक कार्यक्रम असतो. गावकरी महादेवाच्या देवळात आठ दिवस वीणा उभा करतात. तो जमिनीवर ठेवायचा नसतो आणि अखेरीला श्रीकृष्ण जन्म झाल्यावर तो खाली ठेवून त्या निमित्ताने गावभर जेवण घालतात. गावकरी मंडळी याला भंडारा, प्रसाद असे म्हणत.' (पृ. ११२) ह्यावरुन माणदेशात भक्तिभावाने धार्मिक सोहळे पार पाडले जातात, असे दिसून येते.

बाळ्याचा बाप भक्तिभावाने देवाला नमस्कार करुन वीणा घेत असे. डोळे मिटून साक्षात् परमेश्वरात एकरुप झाल्यासारखे दाखवी. पण त्याचा आंतरिक हेतू वेगळा असायचा. त्याचे चित्रण पहा : 'नैवेद्य खाली ठेवून भक्त बापाच्या पाया पडून वळतो न वळतो तोच माझा बाप त्यावर झडप घाली आणि गिळून टाकी, देवापुढे ठेवलेला पै - पैसा आसपास कोणी नसेल, तर कमरेला लावी. जवळपास कोणी असेल, तर मात्र "जा रं या पैशाची देवाला उदबत्ती आण," असं म्हणे'. (पृ. ११३) ह्या धार्मिक चित्रणावरुन माणदेशी माणसांची देवाविषयीची नीतिमत्ता स्पष्ट होते.

### ५.७.६.माणदेशाचे भाषिक चित्रण :

द. ता. भोसले ह्यांनी सर्वसामान्य माणसांचे हलाखीचे जीवन त्यांच्या दैनंदिन व्यवहारातील संघर्ष व ते सोडविण्याचे त्यांचे प्रयत्न ह्यांचे चित्रण करताना खास अस्सल ग्रामीण माणदेशी भाषेचा वापर केलेला दिसून येतो. भोसले ह्यांना सर्वसामान्य वर्गाची चांगली जाण असल्याचे दिसून येते. त्यासाठी गंभीर भाषेचा वापर न करता त्यांनी विनोदाच्या अंगाने, कलात्मकतेचा वापर केल्याचे दिसून येते. कलात्मकतेमधून त्यांनी सामान्यांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केल्याचे पहावयास मिळते.

'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या माणदेशी कादंबरीत बाळूचा बाप ठेवलेल्या तानी नावाच्या बाईला नवीन कपडे नेऊन देतो. ही कपडे त्याच्या स्वतःच्या घरातील असतात. त्यावेळी बापूची मावशी व बाळ्याचा बाप ह्यांची जी बोलणी होतात, ती अशी : 'त्ये कापड कुठाय माझं ?'

"कोनचं वो ?"

"याड घेऊन पेडगावाला नका जाऊ. सरळ सरळ सांगा."

"देवाच्यानं मला माहीत नाही. बायकांची कापडं मला वो कशाला पायजेत ?"

"आन् कुटं निगालं तर?"

"मग असंल घरात ! कोपऱ्यात बिपऱ्यात."

"आन् त्या रांडेच्या घरात दिसलं तर?" (पृ. २२) ह्या ठिकाणी माणदेशातील ग्रामीण बोलीचे वास्तव रुप पहावयास मिळते.

सरकोली गावातील पैलवान बाळूला सरबत करुन आणण्यासाठी लिंबे देतात. बाळू ती लिंबे तानीला देतो व पैलवानांनी सरबत करण्यास सांगितले आहे, असे सांगतो. पैलवानांना घेऊन तो तानीच्या घरी जातो व तेथून घरी जाऊन बापाला बोलावून आणतो व दाखवतो. तानी पैलवानांबरोबर बोलत बसलेली असते, हे पाहून बापाला राग येतो. पैलवान गेल्यावर बाप तानीला म्हणतो,

"नेमकं आलतो मी. आन् सारं बगितलं मी."

"काय सारं ?"

"त्या पोरास्नी घेऊन बसल्यांली. पक्की सिंदळ हाय तू. मला वाटलं नव्हतं तू असा हालकटपना करशील म्हणून."

"अगा, पन झालं तरी काय ?"

"पुन्ना वर इच्चारतीस मलाच !"
"मग कुनाला इचारु?"
"काई एक बोलू नकू. तुजामाजा संबंधच तोडलेला बरा. आन् त्ये नवं घेतलेलं लुगडं." (पृ. ७१) ह्याठिकाणी खास माणदेशी ग्रामीण बोलीचा प्रत्यय येतो.

द. ता. भोसले ह्यांच्या माणदेशी बोलीत विनोदाचे स्थान महत्त्वाचे असल्याचे पहावयास मिळते. 'मी आणि माझा बाप' (१९६९) ह्या कादंबरीतील पुढील चित्रण पहा :

"तात्या, एक च्यार आनं दि गा."
"कशाला गा बापू ?"
"तानीकडं जावं म्हनतुया."
"मंग त्येला पैसं कशाला? तानी तर तुजीच हाय !"
"अगा, म्हशीफुडं कायतरी ठिवल्याबिगर दूद कशी दिल ती." (पृ. ७८-७९) ह्या भाषिक चित्रणावरुन माणदेशातील लोक बोलताना विनोदी शैलीचा वापर करतात, हे लक्षात येते.

एकंदरीत, द. ता. भोसले ह्यांच्या माणदेशी कादंबरीतून माणदेशातील सर्वसामान्य वर्गातील लोकांचा जीवन जगण्यासाठी चाललेला संघर्ष पहावयास मिळतो. त्यात 'भूक' हा विषय माणदेशातील सततच्या दुष्काळामुळे पुढे आलेला दिसून येतो.

## ५.८. उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण :

उत्तम बंडू तुपे ह्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील एणकूळ (ता. खटाव) हे होय. त्यांचे आई-वडील उपजीविकेसाठी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे जाऊन राहिले. तुपे ह्यांचे सर्व बालपण अतिशय गरिबीत गेले. त्यांचे शिक्षण तिसरीपर्यंत झाले. आपल्या शिक्षणाविषयी व जातीविषयी माहिती देताना तुपे म्हणतात, "माझे शिक्षण तिसरीपर्यंत झाले. मातंग समाजात जन्माला आलेला अडाणी, आडवळणाचा म्हणा पाहिजे तर."[२५]

आई - वडिलांबरोबर फड्याच्या कुरणात काम करताना तुपे ह्यांना खूप त्रास होत असे. जुजबी शिक्षणच पुढे त्यांना लेखनासाठी मदतीचे ठरले. त्यांचे कुटुंब दैववादी व अंधश्रद्धाळू असल्यामुळे त्यांच्या लेखनावर त्याचे संस्कार जाणवतात. श्रीगोंद्यात असताना साखळकरगुरूजींकडून तुपे ह्यांना मानवी जीवनाविषयीचे अनेक धडे मिळाले. तुपे हे मातंग समाजातील असल्यामुळे त्यांना अनेकांनी त्रास दिला. अशा परिस्थितीत ते आपल्या

बहिणीकडे पुण्याला राहण्यास जातात. तेथे वेगवेगळ्या प्रकारच्या नोकऱ्या करतात. परंतु स्वार्थी जग पाहून त्यांना पुण्याचा उबग येतो व नंतर ते श्रीगोंद्याला (घायपतवाडी) परत येतात. त्यांना कोणत्याही प्रकारची वाङ्मय परंपरा असलेली दिसत नाही. अशा ह्या व्यक्तिमत्वाविषयी आनंद यादव म्हणतात, "उत्तमला व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची जाणीव वगैरे काय असते, हे मुळीच ठाऊक नाही. जन्मापासून जे आजतागायत तीस - पस्तीस वर्षे तो पोट भरण्यासाठी धडपडत आहे. समूहजीवनवादी माणसातून तो पुण्यात पोट भरायला आला आहे आणि तशाच एका झोपडपट्टीत तो राहातो आहे. आपण आणि आपली बायका - मुले कशी जगतील, या रोजरोज पडणाऱ्या प्रश्नाची जन्मभर सोडवणूक नाना परीने करतो आहे, तरीही तो प्रश्न त्याच्या मानेभोवती गळफासासारखा उभाच असतो."[२६]

तुपे हे परत पुण्याला जातात. कष्टाची कामे करीत असताना वाचनाची आवड जोपासतात. र. वा. दिघे, व्यंकटेश माडगूळकर ह्यांचे साहित्य वाचताना आपल्याला लेखनाची प्रेरणा मिळाल्याचे ते स्वतः सांगतात. पहा : "पुण्याला आल्यावर मोलमजुरी करताना वेळ मिळेल तसे वाचत राहिलो. याच काळात अण्णाभाऊ साठे यांची बरीच पुस्तके वाचली. र. वा. दिघे, तसेच प्रामुख्याने व्यंकटेश माडगूळकरांचे साहित्य वाचले आणि अज्ञानानं का हाईना मला लिखान करण्याची ऊर्मी येऊ लागली."[२७]

अशा उत्तम बंडू तुपे ह्यांनी एकूण दहा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे : 'इजाळं' (१९८४), 'झावळं' (१९८४), 'झुलवा' (१९८६), 'खाई' (१९८८), 'कळाशी' (१९८८), 'चिपाडं' (१९८९), 'भस्म' (१९९१), 'शेवती' (१९९१), 'खुळी'(१९९१), 'लांबलेल्या सावल्या'(१९९२). त्यापैकी माणदेशी चित्रण करणाऱ्या पुढील पाच कादंबऱ्या आहेत : 'इजाळं', 'झावळं', 'झुलवा', 'शेवती', 'खुळी'.

### ५.८.१. माणदेशाचे भौगोलिक चित्रण :

उत्तम बंडू तुपे ह्यांच्या व्यक्तिमत्त्वावर माणदेशातील प्रादेशिक संस्कार झालेले दिसतात. त्यांच्या कादंबरीत येणारे देऊळ, लिंबाचे झाड, ऊस, भुईमूग, बाभूळ, कापूस, खिलारी गाई - बैल, ज्वारी, बाजरी हे सर्व माणदेशी असल्याचे दिसून येते. तुपे ह्यांनी आपल्या कादंबरीतून माणूस शोधण्याचा प्रयत्न केलेला पहावयास मिळतो. तुपे ह्यांचे कादंबरीविश्व मातंग समाजातील लोकांना भोगाव्या लागणाऱ्या हाल अपेष्टा, अत्याचार अशा विशिष्ट प्रदेशातील जीवनसंस्कृतीचे चित्रण करणारे आहे.

माणदेश हा दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे तेथे कमी-जास्त पाऊस पडतो. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीतील पुढील भौगोलिक चित्रण पहा : 'पावासानं पुन्हा दडी मारली. माळरानाची बाजरी झुराय लागली. आधीच माळरान, त्यात मागास पेर झालेली. पेरायच्या गोंधळात नांगरटीतल्या हारळी, कुंद्याच्या काशा वेचायला सवड घावली नव्हती. पाऊस पडल्यावर कशा जित्या होऊन, त्येला गवताचं मोड फुटतेलं. पट्टीतली बाजरी तणांत दिसंना झाली.' (पृ. २८) ह्या चित्रणावरुन माणदेशातील माळरानाची जमीन, तेथील पिके ह्या प्रादेशिक भौगोलिकतेचे वास्तव चित्र समोर येते.

माणदेशातील उन्हाळा अतिशय कडक असतो. त्यामुळे पिकांना पाणी नसल्यामुळे ती पिके जागेवर वाळताना दिसतात. ह्याचे चित्रण पहा: 'तालीत पळाटीनं जोर धरला होता. हिरीचा तळ उघडा पडत होता. एक सकाळचा , एक दुपारचा, असं दोन सांगळं पाणी निघत होतं. त्यात वैशाखाची चावरी उन्हं. सकाळी डवरलेली पळाटी दुपारच्या उन्हात सुखमारुन जात होती. पळाटीचं शेंडं माना टाकून मातीकडं बघायचं.' ('इंजाळ'पृ. १६) ह्या चित्रणावरुन माणदेशी जमिनीतील पाण्याची पातळी खोलवर गेल्याचे जाणवते.

माणदेशात कमी पावसावर येणारी पिकेच प्रामुख्याने घेतली जातात. 'खुळी' (१९९१) ह्या माणदेशी कादंबरीत पाणीच नसल्यामुळे पिकांची होणारी दुर्दशा पहावयास मिळते. त्याचे चित्रण असे : 'मिरगाच्या चार चळका सांडल्या. पावसानं पाय आखडलं. मातीत पडतेलं बी उगवून आलं होतं नि तहानेनं ओठ सुकल्यागत माती सुकली होती. उन्हाचा ताव लागला की बाजरीचं मोड माना टाकून वाकत होतं, नि मैनाचा जीव तुटत होता.डोळ्यांदेखत बाजरीचं कवळं पीक पाण्याइदमानं कोमेजलं होतं. मुगाचीबी तीच अवस्था.' (पृ. २०) ह्या चित्रणावरुन माणदेशात लोकांचे कष्ट दिसतात, परंतु निसर्गापुढे माणूस हतबल ठरतो, ही भौगोलिकता पहावयास मिळते.

माणदेशातील उष्णता, स्वच्छ हवा, कमी पाऊस हे पर्यावरण कडधान्याच्या पिकांना पोषक ठरताना पहावयास मिळते. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील हे चित्रण पहा : 'मैना आली नि मुगाचा तोडा झाला. भुईमूग काढला. जोंधळयाच्या पिकाला रानं मोकळी केली. मुगाच्या शेंगा वाळवून झोडल्या. आठ पोती मूग झाला. पयल्या तोंडाला धारण चांगली घावली. सोन्याच्या मण्यावानी पिवळा मूग. माणदेशी वाण चमकत होता.' (पृ. २३) ह्यावरुन माणदेशात मूग, भुईमूग, बाजरी ही पिके चांगली येताना दिसतात.

माणदेशात ज्वारी हे महत्त्वाचे पिक असल्याचे पहावयास मिळते. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील भौगोलिक चित्रण पहा : 'जोंधळा पोटारला होता. आंब्याचा मोहर झरुन डाळ्यांत कैऱ्या लागल्या होत्या. दीस सरतेलं तसं जोंदळ्याचं पोटरं उजवत होतं. कैऱ्या आकारत होत्या. चिंचेचं आकडं डाळीला बाळी घाटल्यागत झुलतेलं. बांधाची बोर गाभुळी झाल्याली.'(पृ. ९६) ह्यावरुन माणदेशात एकाच हंगामात ज्वारी, आंबे, बोरे येतात, हेही दिसून येते. तसेच ह्या कादंबरीची नायिका मैना हीच्या तोंडच्या गीतातून कांदबरीकाराने माणदेशाची भौगोलिकता पुढीलप्रमाणे चित्रित केली आहे:

'आसा माझा माणदेश । त्याला खरपडाची झार ।।
धन्य काळी आई माझी । पोटी पाण्याचं ग झरं ।।
आसा माझा माणदेश । कणखर कष्टाळूचा ।।
राजकारणी ज्ञानीयाचा । तसा शूरवीर सैनिकाचा ।।
असा माझा माणदेश । त्याची नजर मुलखावरी ।।
त्याच्या घामात रुजते । रानं धानं ग साजिरी ।।' (पृ. १०५)

ह्यावरुन माणदेशाचे भौगोलिक स्वरुप समजण्यास मदत होते.

## ५.८.२. माणदेशाचे सामाजिक व सांस्कृतिक चित्रण :

उत्तम बंडू तुपे ह्यांचा जन्म मातंग (मांग) समाजात झालेला असल्यामुळे माणदेशातील मातंग समाजावर जे अन्याय, अत्याचार होतात ; त्याचे चित्रण त्यांच्या लेखनातून पहावयास मिळते. माणदेशातील ग्रामीण भागात शिक्षण घेतलेला वर्ग नोकरीसाठी शहरात स्थायिक झाला. परिणामत: खेडी ओस पडली. आर्थिकदृष्ट्या ती बकाल झाली. तसेच यंत्रयुगामुळे माणदेशातील परंपरागत व्यवसायांवर गंडांतर आले. कष्ट करणारा शेतकरीही यांत्रिक युगामुळे यांत्रिक बनला. यंत्रे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्याला आपल्या शेतातील तयार मालाची किंमत देऊनच ती घ्यावी लागली. त्यामुळे ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनला. यंत्रामुळे कामाचा वेग वाढला. साहजिकच शेतीवर मजुरी करणारा कामगार बेकार झाला. त्यामुळे त्याने शहराकडे धाव घेतली. तुपे ह्यांच्या माणदेशी कादंबरीत हे सर्व चित्रण आलेले आढळते.

- माणदेशी परंपरा :

माणदेश हा बराचसा ग्रामीण व मागासलेला प्रदेश असल्यामुळे तेथील सामाजिक व सांस्कृतिक जीवन पारंपरिक असल्याचे पहावयास मिळते. ज्या मातीत माणसाने जन्म घेतला

असेल; त्याला त्या जातीच्या परंपरा आत्मसात कराव्या लागतात, ह्याची जाणीव 'झावळं' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील चित्रणावरुन येते : 'राती काय भांग - गांजा पिऊन नदीला गेला हुतास काय, तवा हे पागिरं फाडून आणलंयूस ! पाण्यात उतरायला भ्या वाटतं, तर कोळ्याच्या जन्माला कशाला आला ? वाण्या - उदमाच्या घरात जल्म घियाचा हुतास !' (पृ. १) ह्यावरुन माणदेशातील लोकजीवन पारंपरिक असल्याचे दिसून येते.

माणदेशात जे लोक उच्चवर्णीय व श्रीमंत आहेत,ते स्वतःच्या शारीरिक सुखासाठी दलित स्त्रियांची राखरांगोळी करताना दिसतात. 'शेवती' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील चित्रण पहा : ' यशवंत, तात्या, ह्याला कसं वजलंस हे उडदाचं बेनं ! ह्याला वाईच तरी मुर्वत हाय का ? ह्या पोरीच्या अंगात रग नस्ती तर ह्या लांगड्यानं तिला आज जगातून उठवलं आस्तं बरं ! पोळ सोडल्यागत सोडलाया नव्हं गावात, लोकांच्या लेकीबाळीची आब्रू लुटायला! ' (पृ. २७) 'गोठ्यात बांधलेल्या गाईच्या स्वाधीन जतरेतला सारा विटाळ करुन ती निघून गेली.' (पृ. ४७) ह्या वाक्यावरुन माणदेशात गाईला पवित्र मानण्याची परंपरा असल्याचे दिसून येते.

माणदेशात काही सांस्कृतिक परंपरा आढळतात. लग्नसमारंभामध्ये वधु-वर पक्ष एकमेकाला आहेर देतो. जर कोणी विधवा स्त्री असेल, तर तिला आहेर दिला जात नाही. ह्यासंबंधीचे चित्रण 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीत आलेले आहे, ते असे: "वरमूबाय, तुला हाळदी - कुकांत पुरतू. पर तुझा न्हवरा कुठाय, आमास्नी दाव ? रंडकीला सवासणीचा मान देत्याती व्हय तुमच्यात ?" (पृ. १८)

एखाद्या श्रीमंताची मुलगी लग्न होऊन सासरी गेल्यानंतर तिच्या सुखासाठी तिचा श्रीमंत बाप मानपान विसरुन वावरताना दिसतो. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील संवाद पहा : 'माणके, आप्पा लई खपलं माझ्यासाठी . त्यास्नी शिळं कवा खपंल नाही,पण आज शिळं बी खाल्लं. आप्पा माझ्यासाठी सोशिक झालं. माझ्या सुखासाठी खपलं.' (पृ. १६)

माणदेशातही लग्नानंतर मुले होण्याच्या बाबीला महत्त्व असल्याचे दिसते. लग्न होऊन चार-पाच वर्षात जर मूल झाले नाही, तर दुसऱ्या लग्नाच्या गोष्टी माणदेशात बोलल्या जातात. वंशाला दिवा असावा, हा पारंपरिक विचार माणदेशात दिसतो. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील संवाद : 'सोन्याची सुरी बरी दिसती म्हणून उरात मारुन घेत न्हायती. मला

नातू पायजी. सुभासचा वंस वाढाय पायजी. माझ्या भाच्या आल्या. घरात पाळना हालला.' (पृ. २४)

'भागू, तिचं सगळं गुण झकास हाया. पर एकात उनं.'
'व्हईल की ते बी सरळ,' भागू.
'कवा ? निम्मं वय झाल्यावर ? सात वर्स झाली लग्नाला. तिच्या मागनं दोघी आल्या. पटापट पोर हळजल्या.'
'एकांदीला उशीरा हुत्यात. आता माझंच बघ की. बारा वर्सांनी पोरगं झालं,' भागू.
'आता अजून वरीस, दोन वरीस बघती वाट, न्हायतर सुभाषला दुसरी बायकू करुन देणार.' (पृ. ३०) ह्यावरुन माणदेशात वंशाला दिवा पाहिजे, ही परंपरा टोकाची असल्याचे पहावयास मिळते.

माणदेशात कधीकधी गरिबीमुळे स्त्रीला अनैतिक मार्गाचा अवलंब करावा लागतो आणि ही गोष्ट घरातील कर्त्या पुरुषांनाही माहीत असते. परंतु ह्या गोष्टीचा गाजावाजा झाल्यास घराची प्रतिष्ठा धुळीस मिळेल म्हणून कोणीही बोलत नाही. स्त्री ही आपला व्यभिचार झाकून ठेवण्यासाठी नात्यातील मुलींना सुना म्हणून घरात आणते. 'खुळी' (१९९१) ह्या माणदेशी कादंबरीतील ह्यासंदर्भात पुढील संवाद पहा : 'आवं पावनं, त्याबगार तिला अन्न गोड लागायचं न्हाय. तसी ती कोडगी हाय. तेवढा गुण नस्ता, तर ती या घरात कुठली टिकायला ? आता घरची परंपरा राखावी म्हणताना तिनं तिच्या भाच्या सुना करुन घिटल्यात.' (पृ. ४९)

बाहेरुन घरात पाहुणे येताना त्यांच्यावरुन भाकरीचा तुकडा ओवाळून टाकण्याची परंपरा दिसते. ह्यासंबंधीचा संवाद पहा : 'सुवर्णा आलीया, दिसंना व्हय ? टुकडा पानी टाकायचा न्हाय वाटतं ?' ('खुळी', पृ. ११६)

- माणदेशी दैववाद :

माणदेश हा ग्रामीण प्रदेश असल्यामुळे आणि तेथील लोकजीवन हे पूर्णत: निसर्गावर अवलंबून असल्यामुळे माणदेशी माणसाचा स्वभाव दैववादी बनल्याचे दिसते. कोणत्याही कामात यश येण्यासाठी तेथील माणूस निसर्गाची, भूमीची, देवतांची पूजा बांधताना दिसतो. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील मैना ही दळण दळताना जात्यावरचे गीत गाते, त्याच्या शेवटी ती म्हणते,

"सरलं दळन, हात जोडीते भूमीला।
तुझ्या सेवेत रुजू दे, माणदेशी माणसाला॥" (पृ. १०६)

माणदेश माणूस त्याच्या जीवनातील कोणत्याही प्रसंगात दैववादी बनलेला दिसतो. 'झावळं' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील स्वगत पहा : "कुठं असंल माझी सोना ? निम्म्या वाटंत तिला पावसानं गाठलं, तर ? तिला पळणं कसं हुयाचं ? सोना अवघडल्याली हाय. मेघराजा, तुला हात जोडतो. ह्यो काशिनाथ दुबळा हाया. तुझ्या बळापुढं माझं काय चालत न्हाय ; देवा, माझ्या सोनीला संभाळ. सो...ना. मेघराजा, दया कर !" (पृ.३) 'झावळं' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील संवाद पहा :

"सोना, माऊलायाचं केलं का? न्हाईतर मागच्या पोरागत हुयाचं, बया!"
"आक्का, झालं, ते गेलं. तेच ते काढू नगंस. आपल्या नशिबात आसलं, तर हे लाभल, न्हाईतर पयलं गेलं, तसं हे बी जाऊ द्या." (पृ. ५५) ह्यावरुन माणदेशी माणूस पूर्णपणे दैववादी असल्याचे पहावयास मिळते.

● माणदेशी सामाजिक वास्तव :

माणदेशात मागासलेपण, दारिद्रय, दुष्काळ ह्यांचे प्रमाण मोठे असल्याने त्याचा फायदा श्रीमंत लोक स्वतःच्या स्वार्थासाठी घेताना दिसतात. गरीब शेतमजूरांना, स्त्रियांना माणदेशात कसलीही किमंत नाही. दलितांना तर जातीयतेच्या खूपच कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागते. 'शेवती' (१९९१) ह्या कांदबरीतील पुढील संवाद पहा : 'ए माणसाचं कातडं पांघरलेल्या सर्पा ! उजेडात आम्हाला बघून थुंकतो. आन अंधारात आमच्या भोगासाठी धर्म वंश बाजूला सारुन आमच्या अब्रूचा घास करायला बघतुयास व्हय ! दौलतीची भूल टाकून आम्हास्नी गारद करायला बघणारा तू; मला बामन तरी कसा म्हणायचा, ए डोंब कावळ्या !' (पृ. २४) ह्या संवादावरुन माणदेशात जातीयता ही स्वार्थासाठी वापरली जाते, हे लक्षात येते.

माणदेशातील गरीब लोकांच्या अज्ञानाचा फायदा श्रीमंत लोक गोड बोलून सावकारीच्या रुपाने उठवताना दिसतात. एखाद्या ओळखीच्या माणसाला मध्यस्थ म्हणून घालून व्याजाने पैसे दिले जातात. त्या व्याजाचा दरही भरमसाठ म्हणजे पंचवीस टक्के असल्याचे दिसून येते. त्यामुळेच माणदेशी गरीब शेतकरी, मजूर, दलित समाज बकालपणाचे जीवन जगताना दिसतात. ह्याविषयीचा 'इजाळं' (१९९१) ह्या कादंबरीत आलेला पुढील संवाद पहा : "म्या तुमच्या रुपयांला कुठं न्हाय म्हणलंय ? सांगा, किंती दियाचं ? एकदा ह्यो

घोळ काढून टाकूवा.'' ''तर, पावली याजानं शंभराचं पंचीस, मजी एक म्हैन्याचं, चारशे रुपयांचं शभंर रुपय याज. तर चार महिन्यांचं याज चारशे रुपये, आन् मुद्दल चारशे. आसं आठशे रुपये माझं मला द्या. आता वाखाला तुमाला दुसरा यापारी घावलाय !'' (पृ.१२)

माणदेशात शिक्षक लोक, नोकरदार व श्रीमंत लोक हे गरिबांना वेगवेगळ्या मार्गाने छळताना दिसतात. नोकरदार त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतात. गावातीलच श्रीमंत लोक गरिबांच्या वाईट धंद्यावर लक्ष ठेवून पोलिसांना कळवतात व गरिबाकडून पैसे मिळवताना दिसतात. 'इजाळं' (१९९१) मधील पुढील संवाद पहा :

''मल्हारी, सरपंचाचा तुझ्यावर डोळा हाय, लेका !''
''त्याला माझ्याकडनं हप्ता पायजी, पर मी बरा दीन ! हे सरपंच तिकडं दहिवडीला जाऊन पोलीसाखाली आपली निजवतय. न्हायतर त्यास्नी काय सपान पडतंया व्हय मी भट्टी काढीन तवा ? ह्या महिन्यात दोन वक्ताला धाड पडली. चार-पाच हज्जारांच्या मालाचा नासवडा झालाय !'' (पृ. १०९)

माणदेशात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. दुष्काळामुळे प्रत्येकजण मनातून खचलेला दिसतो. त्यातूनही जर कोणी काही शेतीमध्ये नवीन करण्याचा प्रयत्न केला, तर लोकांच्या मनात असुयेची भावना जागृत झाल्याचे वास्तव पहावायास मिळते. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील संवाद पहा : 'मोठी आई बोलत होती तवर गावातलं पंधरावीस जणं जमले, दारात बैलं बघून त्यांची वाचा बसलेली. तोडं खेटरं खाऊन सुजल्यागत. मनात एक नि जनात दुसरं.' (पृ. ८)

दुष्काळामुळे माणदेशातील शेतीची हेळसांड होते. पाऊस कमी पडत असल्यामुळे शेतीला पाणी नसते. सतत पावसाची वाट पहावयाची व निराश मनःस्थितीत बसून रहावयाचे, असे चित्र दिसते. परंतु माणदेशी जमिनीत विहिरींना पाणी लागते, हे पुढील संवादावरुन जाणवते : 'खुळी' (१९९१) मधील चित्रण पहा : 'बायला ! मिरग कोरडा जातूय वाटतं !' अर्जुन. अर्जुन बोलला नि वीज कडाडावी तशी मैना बोलली, 'असं पावसाची वाट बघत बसावं लागतं विहीर पाडली अस्ती तर ? ही माणदेशी रानं भुईच्या पोटात पाण्याचं झरं हायतं नारळागत.' ('खुळी', पृ. १९)

● माणदेशी दारिद्रय :

माणदेशातील माणसांना जीवन जगताना निसर्गातील प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागत असतो. दारिद्रय हे त्यांच्या पाचवीलाच पुजेलेले असते. नवरा - बायकोमध्ये सतत भांडणे होतात. त्यामुळे माणसांच्या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत. 'झावळं' (१९९१) मधील पुढील संवाद पहा : 'काश्या, घर तरी बांधाया काढ. बघ, कसं वलं झालंय्. बसाय - पुरती जागा हाय का ? का आसं भांडण्यात जलम घालवणार? तुम्ही वाईच घराकडं ध्यान द्या, मर्दानू !'
''तुका त्याचं आसं हाया. हितं पोट भरायची मारामार. त्यात घर कवा बांधू ?'' (पृ. ४३) ह्यावरुन माणदेशातील दारिद्रय स्पष्ट होते.

दारिद्रयामुळे माणसाला माणदेशात स्वतःच्या शरीराकडे पहावयालासुद्धा वेळ मिळत नाही. 'शेवती' (१९९१) मधील चित्रण पहा : 'गरीब दशेत शेवंताचं अंगबांधा आकार घेऊन रुप वाढत होतं. शेवंता जगाच्या अनुभवाकडं बघत जाणती होत चालली होती. पावसानं तोंड लपवल्यामुळं पोटाला दरड पडली होती. ती भरण्यासाठी माणसं दुष्काळी कामांवर जात होती. ढगाकडं डोळं लावून ते मातीला दणकत होती.' (पृ. ३६) ह्यावरुन माणदेशातील दारिद्रयात तरुणपणाचाही बळी जाताना पहावयास मिळते.

माणदेशातील दारिद्रय माणसांच्या भावभावनांचा, शिलाचा बळी घेताना दिसते. कारण पोट भरण्यासाठी माणूस लाचारपणाने वागतो. प्रसंगी चोरी करण्यास प्रवृत्त होतो. तरुण मुलींना दुसऱ्याच्या शेतावर कामासाठी जावे लागते. त्यावेळी शेतमालकांच्या नजरा अशा मुलींवर असतात. 'इजाळं' (१९८४) मधील पुढील संवाद पहा : ''शामातात्या, काय करायचं ? कुठं काम मिळंना झालंय. रात कशीबी पाण्यावर जाती; पर दिवस खायला उठतो. काय करायचं, तूच सांग !'' (पृ.६२) ''पुतळा, जळ्ळं तुझं तेल - मीठ तरण्याताठ्या पोरी, कमीजास्त काय झालं मंजी कुणाला इचारायचं. म्हणलं तरी इचराय व्हयाचं नाय, अब्रू परी अब्रू जायची, न इचराय जावं तर चर्चा गावभर पसरायची !'' (पृ. १२५) ह्यावरुन माणदेशातील गरीब लोकांच्या वास्तव जीवनाचा दारिद्रयामुळे झालेल्या कोडीची कल्पना येते.

माणदेशात सततचे दुष्काळ, अवर्षणग्रस्तता ह्यामुळे लोकांना जीवन जगण्यासाठी सतत धडपड करावी लागते. माणूस अनुभवाने शहाणा होतो, असे म्हटले जाते, ह्याची प्रचिती माणदेशी चित्रणातून येते. दुष्काळावर, परिस्थितीवर मात करण्यासाठी माणदेशात वेगवेगळ्या

शासकीय योजना राबवल्या जातात. त्यातून जे श्रीमंत लोक आहेत, त्यांचा फायदा होतो. पण गरिबांचा जीव जातो. ह्यावर मात करण्यासाठी गरीब लोक प्रसंग ओळखून जीवन जगण्याची मानसिकता ठेवताना दिसतात. 'झावळं' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील संवाद पहा : "सोने, कुणी काय सांगितलं. तर नुस्तं कान पाडून ऐकायचं, तलाव झाला, तरी आपुन काय मरतुया ? आता जगतो, तसंच जगू. जलमाला येणारा कवा तरी मरणार. म्हून काय आपल्या मैयतीचा बाजार आपुनच करुन ठिवलाय कुणी ? जसं वारं फिरंल, तशी पाठ फिरवून उभं ऱ्हायाचं आसतं माणसानं. न्हाईतर चुन्याच्या भट्ट्या हायत्यांच." (पृ. ५१) ह्यावरुन माणदेशी माणसाची कामसूवृत्ती, मनाचा कणखरपणा दिसून येतो.

शामा हा मातंग समाजातील माणूस असतो. वाख गोळा करण्याचा व्यवसाय करीत तो शेतीही करतो. परंतु कुटुंब चालवताना अडचणीमुळे दुसऱ्याचे व्याजाने पैसे काढतो. ते फेडण्यासाठी वाख देण्याची हमी देतो. सावकार कमी पैशात वाख घेणार म्हणून परिस्थिती ओळखून वाख दहिवडीला नेऊन विकण्याचे तो ठरवतो. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीतील पुढील संवाद पहा : "शामा, आजून राज हाय. ह्या वक्ताला गावात गेलं, तर दहिवडीची माणसं चोर म्हणून आपल्यालाच हाणतेली. आता काय जवळ आलूया. तांबडं फुटाय निघालं तरी, एका धुमंत, दिस उगवायच्या आत दहिवडीत जाऊ. तवर हिथंच थांबू या !" (पृ. ९)

• माणदेशी अंधश्रद्धा :

माणदेश हा मागासालेला प्रदेश असल्यामुळे आणि शिक्षणाचा प्रसार खूपच कमी असल्यामुळे तेथील लोक जुन्या रुढी - परंपरा सांभाळताना दिसतात. त्यातच निसर्गाची अवकृपा म्हटल्यावर कोणत्याही मार्गाने पोट भरावयाचे ह्या भावनेतून त्या ठिकाणचे लोक वेगवेगळ्या खोट्या मार्गांचा अवलंब करतात. त्यातूनच देवदेव, नवस, भूत, हडळ असे प्रकार चालू होतात. ह्या सर्व परिस्थितीत अंधश्रद्धेला खतपाणी मिळते.

'शेवती' (१९९१) ह्या कादंबरीत बापूने देवाला जात असताना गाडीत दलिताची मुलगी बसवली म्हणून बापूची आजी खाली उतरते. आजी भुताला घाबरते, हे बापूला माहीत असते. बापू भुताचा विषय काढतो. आजी घाबरते व गाडीत येऊन बसते. बसताना तिचा पदर गाडीच्या चाकात अडकतो. त्यावेळचा संवाद पहा : 'ये आजे ! उगाच अगस्ताळपणा करु नगंस ! भुतं का हिथं तुझी वाट बघत बसली हुती वाटतं ? का तुझ्यासाठी बांदून ठिवली होती तवा त्यांनी तुला झपाटली ! ह्या ऐराणांत आत्ता लिंब कुठनं आणू सांग बरं!' (पृ. १६) ह्यावरुन

माणदेशात भूत ही संकल्पना अस्तित्त्वात असलेली दिसते. तसेच त्यावर कोणते उपाय केले असता, ते जवळ येणार नाही, हेही पहावयास मिळते.

माणदेशात कोणी आजारी पडले, तर औषधौपचार न करता देवदेव, गंडा, ताईत, अंगारा, जत्रा असे प्रकार अंधश्रद्धेतून सर्रास केले जाताना दिसतात. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीतील संवाद पहा:

''व्हू....व्हू....व्हू मला इसरलास व्हय !''
म्हंकाळ् घुमत बोलला. म्हाताऱ्यानं हात जोडलं.
''न्हाय देवाम्हाराजा, तुला इसारलू न्हाय. पर ह्या दुबळवाडीतनं जमंना झालंयू !''
''व्हू...व्हू...व्हू... काय जमंना झालंय ? हिरी पाडल्यास. सगळं बैजवारीनं चाललय. माझी जत्रा... चल बोल !''
''करतू देवा, पर लेकाला गुण दे. बरं वाटूंदे !''
''बघ, मला चाळवन्या देऊ नगंस. म...म...मला मस्याखान म्हनत्यात.'' (पृ. ३३) ह्यावरुन माणदेशात देवाचे अस्तित्व दाखवून अडाणी माणसांना फसवण्याचे प्रकार अंधश्रद्धेतून होताना दिसतात. तसेच आपण जर हे नाही केले, तर देव आपले वाटोळे करणार, अशी भावनाही लोकांच्या मनात अंधश्रद्धेतूनच असलेली पहावयास मिळते.

माणदेशात घरातील कोणतेही काम व्यवस्थित झाले की त्याचा संबंध देवाशी किंवा भगताशी जोडला जातो. 'खुळी' (१९९१) कादंबरीतील पुढील संवाद पहा : ' भगताचं कुणालाच कसं ध्यान झालं न्हाय ? त्याचा इसर पडला खरं, पर त्याची किरपा ही !' (पृ. १५) ह्यावरुन माणदेशी माणसांची मानसिकता अंधश्रद्धेला खतपाणी घालताना दिसते.

माणदेशात काही अंधविश्वासातून अंधश्रद्धा निर्माण झाल्याचे पहावयास मिळते. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीत मैना आपल्या गावाहून पिंपरणीचे झाड आणून आपल्या सासरी लावते. त्याला पाणी घालून वाढवले जाते. पिंपरणीला फूल, फळ येत नाही म्हणून मैनालाही मूल होत नाही, असा समज तिच्या सासरी होतो व घरातील सर्वजण पिंपरण तोडण्यासाठी प्रयत्न करतात. पुढील संवाद पहा: 'सांगा, पर मी म्हणती, पिंपरणीच्या झाडाची त्यास्नी अडचण काय ?'
'हे बघ, पिंपरण फुलत न्हाय. तिला फळं येत न्हायती. त्यात ती तुझ्या माहेरच्या झाडाची. म्हणताना तसं वाटतंय.' (पृ. ४०) ह्यावरुन माणदेशात पारंपरिक रुढीच्यांमधूनही अंधश्रद्धा जोपासल्या जातात, हे दिसून येते.

● माणदेशी जातीयता :

माणदेशात जुन्या विचारसरणीचे लोक असल्यामुळे तेथे आजही जातीयता जोपासली जात असल्याचे दिसते. माणदेशातून सुशिक्षित लोक नोकरीच्या निमित्ताने बाहेरगावी जातात. त्यामुळे अडाणी लोक जुन्या परंपरा सोडण्यास तयार होत नाहीत. जातीयतेमुळे दलित माणसांवर अन्याय होताना दिसतो. 'शेवती' (१९९१) ह्या कादंबरीत शेवंता आपल्या मनातील मळमळ व्यक्त करताना म्हणते, 'तुझं खरं हाय बापू, पर माणसास्नी ते बघवत न्हाय ! आमच्या नुस्त्या सावलीचा त्यास्नी विटाळ होतू. पर त्याच माणसांसंगट लुतरी कुत्री पार गाभाऱ्यांत जाऊन देवावर मुतत्याती ते मातर त्यांस्नी चालंत ! पर आमी भक्तीभावानं त्याला पुजलं, तर त्यांच्या पोटात डोंब होतू ! ज्या देवानं आम्हाला जन्म दिलाय त्या देवाला डोळं भरुन आम्हास्नी बघू देत न्हायती !' (पृ. १८) ह्यावरुन माणदेशात जातीयतेची बंधने घट्ट असल्याचे दिसून येते. दलितांना ठोकरण्याची कोणतीही संधी उच्चवर्णीय सोडत नाहीत. त्यामुळे दलितांच्या मनात ह्या अस्पृश्यतेविरुद्ध चीड निर्माण झालेली दिसते. पहा : 'ज्या झऱ्यात कुत्रं पाणी पितं तिथं आम्हाला पाणी पिण्याची सत्ता नसावी ?' (पृ. १३३)

माणदेशातील ही अस्पृश्यता उच्चवर्णीय लोक स्वत:च्या स्वार्थासाठी टिकवून ठेवताना दिसतात. 'शेवती' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील संवाद पहा : 'दगडू, त्यो बामन म्हणत हुता, 'काय गं, धर्माला कुनी वाली हाया का न्हाय ? ह्यो काय अत्याचार लावलाय ?' म्हणून बामनं माझ्या अंगावर तुटून पडली. त्यातला सुरेश मुडदा माझ्या अंगावर वस्कनं धावून म्हनला, 'ये ! लाज न्हाय वाटली आसं आत याला. तू आत येऊन हे देऊळ भ्रष्ट केलंस चंडाळने ! ही पापांची रास हिथं कशाला आणलीस ? अशा दलितांवर देव थोडाच भाळनार हाया वाटतं ! ही विटाळलेली फुलं आत्ता कशाला आणली ? चल दूर हो. तुमच्यासाठी देव इथं तप धरुन बसला न्हाय !'' (पृ. १०१-१०२)

एखाद्या व्यक्तीने ही जातीयता संपवण्यासाठी प्रयत्न करावयाचे ठरवले, तर त्याच्यावर काहीतरी आळ येण्याची शक्यता जास्त असते. ह्याविषयीचा पुढील संवाद पहा : 'पोरी, तुझी ही अंबडकरणीनं जग तुझं कैवतुक करील, आसं तुला वाटत आसलं, तर ते साफ खोटं हाया ; आज तू तुझ्या, माझ्या आब्रूसाठी, आपल्या बचावासाठी त्या रगील सापाला डिवचलं ! पर उद्या त्यो परकी ताकत जमवून तुझी माझी हत्या करील ! त्या वक्ताला ह्यो समाज, एक उंडगी, रंगील पोरगी म्हणून तुला दोषी ठरवील ! तवा शेवंता आजपस्न सावधगिरीनं पाऊल टाक!'

(पृ. ६९) ह्यावरुन जातीयतेचा विळखा सहजासहजी सुटणार नाही. कारण स्त्रीच्या बाबतीत दलित वर्गाची मानसिकताही पारंपरिक असल्याचे माणदेशात पहावयास मिळते.

- **माणदेशातील अज्ञान :**

माणदेशी माणूस स्वत:च्या दैनंदिन व्यवहारात कितीही हुशार असला, तरी बाह्य जगाचा त्याला कसलाही अनुभव नसल्याचे दिसते. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीत शामा शेतीतून कापसाचे चांगले पीक काढतो व ते पैसे बँकेत ठेवतो. परंतु बँक ही संकल्पना माणदेशी माणसाना नवीन असल्यामुळे ते आपले पैसे घेऊन पळून जातील, आपल्याला फसवतील, असे अज्ञानामुळे वाटते. पुढील संवाद पहा : "अरं लेका; ते ब्यांकवालं. उद्याच्याला न्हाय म्हून पळलं, तर काय करचील ? बुडीवलंस रं त्वा आमास्नी."
"भाव, तसं न्हाय व्हत. जग काय खुळं न्हाय. ह्या इतक्या ब्यांका निघाल्यात त्या काय उगांच चालतेत्या ? का आपुनच शेनं हाय जगापरास ?"
"बघ, न्हायतर सगळी म्हेणत मातीत जायाची !" (पृ. ५७) ह्यावरुन माणदेशी माणसाचे अज्ञान प्रकट होते.

माणदेशी माणसाला दारिद्र्यामुळे माणदेशातच अडकून पडावे लागते. त्यामुळे बाह्य जग, बाह्य व्यवहार ह्याविषयीची माहिती होत नाही. त्यामुळे अज्ञानामुळे कोणत्याही गोष्टीचे कौतुक त्याला वाटते. तरीही ते अज्ञान आहे, हे त्याचे बोलणे ऐकणाऱ्याला समजते. 'इजाळं' (१९८४) मधील पुढील संवाद पहा : "काल पंचमीला आलं, तवा आणली ही साडी. आठ ईसा आन् धा रुपयाची हाय म्हणत हुतं. नेटेड हिचं नाव हाय !" (पृ. ६१)

माणदेशी माणसाच्या ह्या अज्ञानामुळे त्याला बाहेरच्या जगात लोक फसवताना दिसतात. शेतीवर कर्ज काढायचे म्हटले, तरी सरपंचाच्या मागे लागावे लागते. तलाठ्याच्या विनवण्या कराव्या लागतात. तलाठी नेमके काय करतो, हे समजत नाही. तसेच त्याच्याविषयीची भीती मनात असते की, काय बोलावे, तर प्रकरण मंजुर होणार नाही. ह्याच मानसिकतेचा, अज्ञानाचा फायदा तलाठी उठवतो. 'इजाळं'(१९८४) मधील पुढील संवाद पहा: "शामा, आलास, बरं झालं. तुझं प्रकरण मंजूर झालंय. खरं मंजुरी आजुन आली न्हाय. ग्रामसेवकाला वाईच हाताला धराय पायजी. त्येच्याबगार हे काम हुणार कसं ? तिथं जिल्हापरिषदेत जोर देऊन बोलायला जोर आला पायजे का नको ? लई न्हाय, दोन बोटं खर्ची

पाड. आठ दिवसांत काम हुतंय का न्हाय बघ ! चल, च्या बी काय हाय का न्हाय !" (पृ ७०-७१) ह्यावरुन माणदेशी माणसाच्या अज्ञानाचा फायदा सर्वजण घेताना दिसते.

- माणदेशी सासुरवास :

माणदेशी स्त्रीचा बारकाईने विचार केल्यास ती निराधार असल्याचे जाणवते. तिला घरामध्ये कोणतेही अधिकार नसतात. तिने फक्त 'चूल आणि मूल' पहावयाचे. नवरा व्यसनी, आळशी असल्यास मरमर काबाडकष्ट करुन त्याच्यासह संपूर्ण कुटुंबाला पोसावयाचे. कष्ट करताना दुसऱ्याच्या वासनेला बळी पडावयाचे, असे चित्रण दिसते. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीत मैनाला तिची सासू भारजा सारखी जाच करते. सासूचेच एका भगताबरोबर शारीरिक संबंध असतात. तसेच संबंध सर्वांनी ठेवावेत, असे भारजाला वाटते. म्हणून ती सारखी मैनाला त्रास करीत असते. ती मैनाला म्हणते, "मैने, उरक सड्या देहीनं रानात जां. आज पळाटी भांगलून व्हया पायजी. सातआठ मोलकरणी हायत्या. न्हायतर तू बी त्यांच्यातली हू !" (पृ. २७) ह्यावरुन माणदेशी स्त्रीचे रुप प्रकट होते. भारजाला तीन मुले असतात. मोठा मुलगा सुभाष ह्याची बायको मैना आहे, दुसऱ्या दोन सुना भाच्याच करुन आणलेल्या असतात. त्यांनाही भगताकडे भारजा पाठवते. भारजाला दोन मुली असतात. त्याही भगताकडे जातात. परंतु मैना अशाप्रकारचे संबंध ठेवण्यास तयार होत नाही. म्हणून घरातील सगळ्या स्त्रिया तिला त्रास करताना दिसतात. हा त्रास संपवण्यासाठी व भगताचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी मैना भगताकडे जाण्यास तयार होते. ती म्हणते, 'आत्या, तुमी म्हणाल, तसं मी वागीन. पर तुमची किरकिर बंद करा. मला हे न्हाय सोसत. तुमच्या दोन सुना, दोघी लेकी गेल्या, तशी मी बी त्या भगताच्या ठाणकाला जाती. त्याची, त्याच्या देवाची सेवा करती नि तुमच्या मांडीवर नातू खेळवायला देती.' (पृ. ७१) स्त्री हीच स्त्रीची शत्रू असल्याचे येथे जाणवते.

मैनाला डॉक्टरांकडून उपचार केल्यानंतर बऱ्याच दिवसांनी दिवस जातात. त्यावेळी भारजाला आनंद होण्याऐवजी वाईट वाटते व ती म्हणते, "आरं कुठं बसलाय? कामधंदा काय सुचतुया का न्हाय ? देवानं हिला दुनिया विराईत गरवारपन दिलंय. 'आगं, नाकाला पोट लागलं तरी कष्ट करणारी लोकं हायती. हिचं आजून कस्यात काय न्हाय, तर खुशाल बस्तीय !" (पृ. ९७) ह्यावरुन मैनाला असलेला सासुरवास लक्षात येतो.

बाळंतपणासाठी मुलीला माहेरी पाठवण्याची परंपरा सगळीकडे असल्याचे दिसते. परंतु मैनाला माहेरी पाठविण्यास तिची सासू तयार नसते व म्हणते, 'तिला माहेराला धाडा. आता सुगी लागंल तवा हितं कोण हाय ? किष्णीबी दोन जिवांची हाया.' (पृ. ९९) ह्यावरुन जर एखादी सून नात्यातील नसेल, तर माणदेशी सासू तिला सासुरवास करताना दिसते. सुनेला जेवढा म्हणून त्रास देता येईल, तेवढा सासूकडून दिला जातो हे दिसून येते. ह्यावरुन माणदेशातील जुनी स्त्री संकुचित विचाराची असलेली दिसते. मैनाचा वडील आजारी असतो,तेव्हा त्यांना बघायला जाताना भारजा म्हणते, 'सगळी भेटीला चाललाय ? तिचा बा काय लगी उलथत न्हाय. उलथला तरी आपून त्या सुतकाला धनी न्हाय.' (पृ. १२५) ह्यावरुन माणदेशात जुन्या विचारांच्या स्त्रियांना सासूपण मिरवण्याची सवय असल्याचे दिसते.

- **माणदेशी माणुसकी :**

माणदेश हा मागासलेला दुष्काळी प्रदेश असल्यामुळे त्याठिकाणी वावरताना माणसाला दैनंदिन जीवनात असंख्य अडीअडर्णींना सामोरे जावे लागते. आडीअडचणी प्रत्येकालाच असतात. त्यामुळे अशा अडीअडचणीचा मुकाबला सर्वांना मिळून करावा लागतो. माणदेशात पाऊस कधीही वेळेवर पडत नाही. त्यामुळे लोकांना दैवावर विसंबून रहावे लागते. ह्या पार्श्वभूमीवर माणदेशातील माणुसकी वाढीस लागल्याचे जाणवते. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीत शामाच्या भावकीतील नात्याने चुलत बहीण बाळंतपणात अडल्यानंतर तो माणुसकीच्या नात्याने तिला मदत करतो. त्यावेळी शामाची आई पुतळा शामाला मदतीसाठी सुचवते व म्हणते, "शामा, दवाखान्यात जाया पाहिजी !" "पुतळे, आत्ता ह्या वक्ताला मी तरी काय करु ? कुठं जाऊ ? त्यात ह्यो पाऊस झालाय !"
"शामा; जा. आपलीच भन असी आडली आसती तर ? "

'भन म्हणल्यावर शामाची मनातली गाठ इगरुन गेली. त्यानं धोतराची खोच खवली. तसाच गोंदावल्याकडं निघाला.' (पृ. ६७) ह्यावरुन माणदेशात परंपरागत वैर विसरुन वेळप्रसंगी माणुसकीच्या नात्याने एकमेकांना मदत केली जाते, हे स्पष्ट होते.

माणदेशात स्त्रिया पुरुषांबरोबर शेतात राबताना दिसतात. परंतु सुनेच्या कष्टाची किंमत घरातील सासू, नणंद, जावा ह्यांच्याकडून होताना दिसत नाही. अशावेळी सासरा हा सुनेच्या कष्टाची, स्वभावाची दखल घेताना दिसतो. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील सासऱ्याच्या तोंडचे पुढील उद्गार पहा : 'कस्यापाय मैनासंगं भांडताय; तू तुझ्या ह्या दोन सुना घेऊन

चालती हो तुझ्या माहेराला. नित रोज भांडता, कारण काय ? आस्यानं घरात बरकता राह्याची न्हाय. मातीसंगं देहीची माती हूस्तवर राबतीय ती पोर, म्हणतात पोटाला खाताय. तिला आसं रानावतान एकटी गाठून मारताय व्हय ? किष्णे, कावेरे, तुला सांगतू, पुन्हा डाव मैनाच्या वाटंला गेलात तर बरी गत हुयाची न्हाय.' (पृ. ८७) ह्यावरुन माणदेशात सून म्हणून जाणारी मुलगी नात्याच्या बाहेरची असेल, तर तिला सासुरवास होताना दिसतो. परंतु सासरा असलेला पुरूष अशा सुनेची काळजी घेऊन तिला माणुसकीचा मोठा आधार देताना दिसतो.

परक्या सुनेला घरात त्रास दिला, तरी ती सासरला आपले स्वतःचे घर समजून वागते ; घरातील सर्व माणसांचा, मुलांचा मनापासून विचार करुन माणुसकीचे नवे रुप दाखवते. मैनाच्या जावांची मुले आजारी पडतात. तेव्हा मैनाला काळजी वाटते. तिचा सासरा तिला ह्याप्रसंगी म्हणतो, "मैना, तू का चितागती हुतीस ? ज्या हाळजल्यात त्यास्नी लेकराचं काय बी वाटत न्हाय."
"मामंजी, लेकरं माझी नसली, तरी आपली हायती. जावेची काय नि माझी काय, वाटल्याती व्हय ?"
"तुझं म्हणनं खरं, पण त्यास्नी तसं वाटाय पायजी." (पृ. ९०) ह्याठिकाणी माणदेशातील माणुसकीचे वेगळे रुप पहावयास मिळते.

एकंदरीत, उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक चित्रणातून माणदेशातील रुढी - परंपरा, दारिद्रय, स्त्रीची अवहेलना, गरिबाची होणारी कुंचबणा, जातीयता ह्या गोष्टींचे दर्शन घडते.

### ५.८.३. माणदेशातील व्यक्तिचित्रण :

माणदेशातील दलित समाजातील व्यक्तींवर होणारे अत्याचार व त्याला तोंड देणारे दलित लोक ह्यांचे तुपे ह्यांनी चित्रण केले आहे. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील व्यक्तिरेखा वेधक असल्याचे दिसते. तुपे ह्यांना मातंग समाजातून जे अनुभव पहावयास व अनुभवण्यास मिळाले, तेच कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या रुपात तुपे ह्यांनी चित्रित केलेले आहेत. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीतील फुलीचे पुढील चित्रण पहा : 'फुली उभ्या - आडव्या हाडानं फुटलेली. अंगावर पाटी पाटी मास. दोन पोरांची आई, पर तरण्या पोरीगत ताल. नवरा मुंबईला कमाई करत होता. दोन पोरं घेऊन फुली टुंगटुगित. बरं, नसल्या - असल्या कुठं लाबं जायाचं न्हाय. भावकीतला हाणमा तिला सोबत करायचा. त्याचं बी अजून

लगिन ह्याव काय झालं नव्हतं.' (पृ. ५२) ह्या व्यक्तिचित्रणावरुन माणदेशी स्त्रियांचा उथळपणा, छचोर स्वभाव पहावयास मिळतो.

माणदेशात गंडे - दोरे, भगत, देवऋषी ह्यांचे प्रस्थ मोठे असल्याचे जाणवते. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीत मैनाची सासू मैनाला भगताची सेवा करण्यास सांगते. परंतु मैना ह्याला तयार होत नाही. त्याचवेळी भगत मैनाच्या घरात आलेला असतो. तेव्हाचे भगताचे केलेले व्यक्तिचित्रण पहा : 'दारातनं मैनानं घरात नजर टाकली. देवऋषी भगत तिच्या दोन्ही जावांची दोन लेकरं मांडीवर घेऊन बसतेला. दोघी जावा त्याच्या बगलंत. तापल्या लोखंडागत त्याचं डोळं. कपाळाला मळवट भरल्यागत भंडारा नि पटासीगत दाताचं बचाळं इचकून उकळीला आलेल्या कण्या रटारटा कराव्यात तसा हासतेला.' (पृ. ३५) या व्यक्तिचित्रणावरुन माणदेशात भगत लोक अडाणी स्त्रियांना देवाची भीती घालून कसे फसवतात, ते लक्षात येते.

माणदेशात सतत दुष्काळ पडत असल्यामुळे गरीब लोकांची संख्या जास्त दिसते. अशा गरिबांना लग्न करताना आपल्या इच्छांचा विचार न करता कसल्याही मुलीबरोबर लग्न करावे लागते, आयुष्यभर लाचारीने जगावे लागते, बायकोचे कसलेही वागणे दिसत असूनही ते सहन करावे लागते. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील मैनाचा सासरा आपल्या बायकोबद्दल पुढील उद्‌गार काढतो : 'घरची गरिबी म्हणताना मला कोण बायकू देतंय ? हिचं ते तिरळं ध्यान म्हणताना कुणी करत नव्हतं. डोळ्यानं तिरळी. म्हसरागत अंगानं जाड, पर उलीशी उजाळ म्हणताना, आमच्या बापनं सून म्हणून आणली. पर बाईला देवताळं, भुतावळीचं मायंदाळ याड. कुणी बोललं की बाय जीव दियाला पळायची, न्हायतर देवा - भुताचं भ्या दावायची. माझं आईबाप भोळी, म्हणताना भियाची. म्हणताना हिनं बी औसान बघूनं कौटाल करायचं. आमी - मी ते कानाआड करायचं. आसाच परपंच झालाय. भगताच्या भक्तीनं.' (पृ. ५१) ह्यावरुन माणदेशातील गरीब पुरुष परिस्थितीचे कसे बळी होतात, ते स्पष्ट होते.

### ५.८.४. माणदेशाचे आर्थिक चित्रण :

तुपे ह्यांच्या माणदेशी कादंबरीत ग्रामीण भागातील दलित शेतकरी, त्यांच्या परंपरा, ग्रामजीवनाची रहाटी ह्याचे व्यापक चित्रण आलेले आहे. हे चित्रण माणदेशातील आर्थिक व्यवहाराशी निगडीत आहे. सततच्या दुष्काळामुळे प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत देत आर्थिक घडी सांभाळावी लागते, ह्याचे मनोवेधक चित्रण मांडलेले आहे. 'झावळं' (१९९१)

ह्या कादंबरीत काशिनाथाला मासे पकडण्यासाठी जाळे नसते. तो पैसे मागण्यासाठी गावातील चंदर नावाच्या श्रीमंत माणसाला भेटतो. तेव्हा काशिनाथ गरिबीमुळे लाचार होऊन पैसे मागतो. चंदरलाही खेकडे हवे असतात. तेव्हा काशिनाथ त्याला म्हणतो, ''चंदर ही अडवणूक नव्हं. माझी बी येळ भागंल. तू म्हणत आसला, तर हे निघालो बघ खेकड्याला. त्या खेकड्याचं मला पैसं नगंतं. पर मला तू वीस-पंचवीस रुपय दे. माझा धंदा चालू झाला, की परत देतो.'' (पृ. ३२) ह्यावरुन माणदेशात आर्थिक बाबतीत लोक एकमेकांवर विश्वास ठेवत नाहीत, असे दिसते.

माणदेशात सततची आर्थिक ओढाताण सहन करावी लागत असल्यामुळे तेथील लोक वैतागून जातात. दररोजच्या कटकटी सोडवता - सोडवता त्यांना जीव नकोसा होतो. त्यातून प्रपंच, अडचणी काही थांबत नाहीत. मग घरातील महत्त्वाच्या वस्तू सावकाराकडे गहाण ठेवून पैसे व्याजाने घेण्याची परंपरा चालू होते. 'झावळं' (१९९१) ह्या कादंबरीत काशिनाथला पैशाची गरज असते. म्हणून तो चांदीचा करदोडा मोडण्यासाठी सोनाराकडे जातो, तेव्हा तो सोनाराला म्हणतो,

''किती देता?''

''काय पन्नास - पाऊणशे रुपये देता येतील.''

''आन् मोडला, तर?''

''येतील शे-दीडशे.''

''घान ठिवून दीडशे रुपय ! ह्यो पंचवीस भाराचा करदोडा हाया !''

''तुझा शंभर भाराचा आसू दे.''

''तुमचं बी खरं हाया. तुमी धंदा कराय बसलाय. कुणीबी झालं, तरी आपला मतलब सोडणार न्हाय. दियाचं, तर दीडशे रुपय द्या.''

''शंभर देतो. ते बी तू आपल्या गावचा, म्हणून !''

''अजून पंचीस द्या.''

''हे घे, पण दोन महिन्यात सोडवून घे. न्हायतर मोडून टाकू ! आम्ही परत बोलू देणार न्हाय.'' (पृ. ३६) ह्यावरुन माणदेशातील आर्थिक व्यवहार हे व्यक्ती बघून न होता ते सावकारकीच्या रुपानेच होतात, असे दिसून येते.

माणदेशातील बरेचसे आर्थिक व्यवहार हे निसर्गाच्या अवकृपेमुळे आखडलेले दिसून येतात. शेतात काम करणाऱ्या मजुराला दररोज काम करण्यासाठी लागणारी हत्यारे

घेण्यासाठीसुद्धा शेतकऱ्याजवळ पैसे नसतात. आर्थिक ओढाताणीमुळे माणदेशी शेतकरी लहानसे धाडससुद्धा करण्यासाठी घाबरताना दिसतो. 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतील पुढील संवाद पहा : 'सुवर्णा, माणसं हायती, पर हत्यारं नगं ती. माती खणायची म्हटलं तर टिकाव, फावडी, भरायला बुट्ट्या. आता हे आणायचं मंजी शे-दोनशेला टोला. हितं दातावर हाणायला पैसा न्हाय. बैलाची पेंड, भरड. नव्यानं सगळं कराय व्हतंय का ? त्यात पावसानं पाय आखडलं.' (पृ.२०) ह्यावरुन माणदेशात आर्थिक स्तरावर सततची ओढाताण असल्याचे पहावयास मिळते.

माणदेशातील माणूस पैसे मिळविण्यासाठी जिवाचे रान करतो. तरीही शेवटी व्यवहारात फसवला जातो. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीत शामा आपल्या मुलाला (नामदेवला) नोकरी लावण्यासाठी नवलेगुरुजींकडून पैसे घेतो, ते चित्रण पहा : 'बाराशे रुपय पगार म्हटल्यावर शामा लागला जिभा चाटायला. पैशासाठी शामानं आख्खी पिंगळी पालथी घातली, पर गराडा करंना. सरपंचाला सांगितल्यावर सरपंच 'व्हय' म्हणाला. त्यानं बी आट घातली. पैसं फिटूस्तवर वावार व्याजात खायाला दे म्हणाला. तवा शामा तसाच गोंदावल्याला गेला. नवलेगुरुजींकडून हाज्जार रुपय घेऊन आला.' (पृ. २५) ह्यावरुन माणदेशात होणारे आर्थिक व्यवहार हे सावकारकीच्या रुपानेच होताना दिसतात. त्यामुळे माणदेशी माणूस मोठे आर्थिक व्यवहार करण्याचे धाडस न करता आहे त्यातच समाधान मानणारा पहावयास मिळतो. पहा : "आपलं हाय ते कराय व्हवं, लेका ! पर रोजगाराची बूड व्हती, आमचा तिघिंचा रोज नव रुपय. दोन रोज मंजी अठरा-ईस रुपायांची बुड !" (पृ. २८-२९) ह्यावरुन माणदेशी माणूस आर्थिक गोष्टीला महत्त्व देताना दिसतो.

अलीकडे माणदेशात यंत्रे आल्यामुळे बेकारी वाढल्याचे दिसते. परंतु यंत्रयुगाशी जुळवून घेताना माणदेशी मनाची आर्थिक ओढाताण होताना दितसे. 'इजाळं' (१९८४) मधील शामा ज्वारी करण्यासाठी मळणी यंत्रवाल्याकडे जातो व भाव विचारतो. त्यावेळचा संवाद पहा :

"कित्सं पैसं लागतेलं?"
"त्याचा पोत्यावर हिशेब ठिवलाय दोन रुपयाला एक पोतं!"
"कणसाचं का दान्याचं?"
"आयला, खुळा हायस का काय? इतकं बी कळंना? कणसाच्या एक पोत्याला दोन रुपय दियाला, मानुस काय म्हस्वडास्नं आलंय व्हयं ! अरं, दाण्यांच्या पोत्याचा भाव हाय त्यो."

(पृ.८६) ह्यावरुन माणदेशातील माणूस आर्थिक बाबींचा गांभीर्याने विचार करताना दिसून येतो.

### ५.८.५. माणदेशाचे धार्मिक चित्रण :

माणदेशी माणूस परंपरा जपणारा असल्यामुळे साहजिकच तो धार्मिकता जोपासताना दिसतो. माणदेशी माणसांची मानसिकता ह्याला कारणीभूत आहे. 'झावळं' (१९८४) ह्या कादंबरीतील चित्रण पहा : 'गावात पूजापाठाचा धूमधडाका उठला हुता. एका दिशी धा धा घरी समाप्तीची पूजा होत हुती. कुणाच्या घरी नवनाथाची, तर कुणाच्या घरी रामविजयाची समाप्ती, तर कुणाच्या घरी शनिमहात्म्य. कुणाच्या पूजेला बामण मिळत हुता, तर कुणी कुणी पोथी वाचणारालाच सत्यनारायणाची पोथी वाचायला सांगून आपलं धर्मकार्य उरकत हुतं.' (पृ. ४९) ह्यावरुन माणदेशात धार्मिक कार्यात ब्राह्मणांना महत्त्व असल्याचे दिसून येते.

माणदेशी माणूस मुळातच भाविक असल्याचे दिसते. मनातील एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी तो देवाची प्रार्थना करताना दिसतो. 'शेवती' (१९९१) ह्या कादंबरीत माणदेशातील शिंगणापूरच्या महादेवाच्या यात्रेवेळी भाविक मनापासून यात्रेला येताना दिसतात. त्यावेळचे चित्रण पहा : 'देवळाच्या मोकळ्या आवारात लावलेल्या रंगीबेरंगी पताकांच्या झालरी; खाली उदबत्त्यांचा सुगंध दवण्यांच्या वासांत मिसळलेलं ते मोकळं वातावरण धुंदावून वावरत होतं. रंगीबेरंगी माणसांच्या मुरकंडीत मुरकंड मारुन ते शंभो महादेवाच्या नावाचा जप करीत जणू ते तपाला चाललं होत. गंगेच्या पाण्यासारखं निर्मळ, निर्विकारी अंत:करणात देवाचा देह आठवत ते गाभाऱ्यात थबकलं. त्यानं देवाला करुणा भाकली, 'देवा ! महादेवा, तुझ्या दर्शनाला मी, एक जगानं हीन लेखलेली आलेया. तुझं दर्शन मला निवांत घेऊ दे.'' (पृ. २०) ह्यावरुन माणदेशातील दलितांना देवाचे दर्शन सहजासहजी मिळत नाही, हे दिसून येते.

माणदेशी माणूस मुळातच देवभोळा असल्यामुळे तो जीवनातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ धार्मिकतेशी जोडताना दिसतो. 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीत शामाच्या वडिलांना सारखी स्वप्ने पडतात. तेव्हा त्याचा अर्थ धार्मिक कारणांशी जोडला जातो. शामाची आई पुतळा म्हणते, ''शामा, खंडोबाचं सपान, लयंदी झालं जागरण केलं न्हाय, तवा खंडुबा यांच्या सप्नात येऊन आठव देतुया-'' पुतळा बोलली. ''आयला ह्या देवांच्या ! ह्यास्नी आमचं घर बरं घावलंय सप्नात येयाला ! तिकडं जा की म्हणावं, का जगबुडी झाली ?''

" तसं म्हणू नाही, शामा. आपला कुळस्वामी हाय खंडुबा. त्याला भजलं, तर काय कमी व्हयाचं न्हाय!" (पृ. १३७) ह्यावरुन माणदेशी माणसांची देवाकडे बघण्याची परंपरागत दृष्टी दिसून येते.

### ५.८.६. माणदेशचे भाषिक चित्रण :

उत्तम बंडू तुपे ह्यांनी माणदेशाचे चित्रण करताना दलित समाजातील लोकांचे धार्मिक, आर्थिक व सामाजिक प्रश्न प्रकटपणे मांडलेले दिसतात. दलितांची ग्रामीण भाषा त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यासह व्यक्त केलेली असल्यामुळे त्यात जिवंतपणा आलेला दिसतो. माणदेशी दलितांची भाषा वेगळी असल्याचा प्रत्यय तुपे ह्यांच्या माणदेशी कादंबरीतून येतो. त्यांची भाषा साधी, सोपी, माणसांच्या काळजाला हात घालणारी असल्याचे जाणवते. त्यामध्ये माणदेशी शब्द, वाक्प्रचार, म्हणी ह्यांचा जागोजागी उल्लेख आढळतो. त्यामुळे तुपे ह्यांच्या भाषेत कलात्मकता जाणवते.

'झावळं' (१९८४) ह्या कादंबरीत काशिनाथ व सुब्या मासेमारी करतात. एक दिवस काशिनाथ एकटाच मासे पकडण्यासाठी जातो, तेव्हा सुब्या बोलतो,

"मतलब कुणाला चुकलाय ?" सुब्या बोलला नि काशिनाथाचं टकुरं उठलं.

"ह्यात काय, रं मतलब हाया, सुब्या ?"

"मंग मला बोलवलं न्हाय. एकट्याचं पोट भरुन घेटलंसा..."

"सुब्या, तुला बोलवाय काय पावना हाया व्हय तू ! बघ, चार जागी चाचपून घावत्यालं पोटापुरतं...." (पृ. ७) ह्यावरुन माणदेशातील लोक बोलण्यात कोणाला ऐकणार नाहीत. तोडीस - तोड उत्तर देऊन मोकळी होताना दिसतात. हा संवाद ग्रामीण भागातील असल्याचेही स्पष्ट होते.

दलितांची खरी भाषा 'इजाळं' (१९८४) ह्या कादंबरीतून पहावयास मिळते. ती अशी:

"नामज्या, तेवढी चऱ्हाटं तरी आण. तोरशाच्यात टाकलेती महिना - दीड महिना झाला."

"का ? त्यास्नी नगंती चऱ्हाटं?"

"कशाला ? आता काय फास घेत्याली व्हय ? न्हायतर ऱ्हावदी. तसीच दहिवडीला जावदी बाजारात इकली तर इकली !"

"मला इकायचं न्हाय जमायचं!"

"न्हियाचं तरी जमल का? हू म्होरं मी आलूच." (पृ. ४५) ह्यावरुन माणदेशातील दलित समाजातील ह्या अस्सल ग्रामीण शब्द पहावयास मिळतात.

माणदेशी बोलीभाषेचे आणखीन एक रुप वातावरणनिर्मितीसाठी महत्त्वाचे असल्याचे 'खुळी' (१९९१) ह्या कादंबरीतून पहावयास मिळते. मैना शेतात काम करीत असते. तिचा नवरा सुभाष व सासरा मैनाचे ऐकतात. एका विचाराने शेती करताना दिसतात. त्यावेळचा संवाद पहा : 'मंग बरं हाय, कांद्याला बाजार हाया म्हनताना कांदा काढावा म्हणतू.'

'हे आत्यास्नी विचारायला पायजी.'

'तिच्या मतानं चाललं तर लाखाचं बारा हजार हुत्यालं'.

'मामंजी काय म्हणत्यात.'

'बापू माझ्या इचाराबाहेर न्हायतं'.

'भाऊजी, दाजीबांचा इचार घिटला.'

'हे बघ, त्यांचा इचार घियाला मी काय सोयरीकी जमवाय बसलू न्हाय, का मोठी खरेदी वावरं घियाला जात न्हाय.' (पृ. ३९-४०) ह्यातील संवाद संयतरीतीने अवतरताना दिसतो. हाच माणदेशी बोलीचा ह्या वेगळेपणा असल्याचे जाणवते.

एकंदरीत, उत्तम बंडू तुपे ह्यांच्या माणदेशी कादंबरीतून दलित समाजातील चालीरीती, परंपरा ह्यावर प्रकाश पडलेला दिसतो. गरिबांना अस्तित्व टिकविण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात, तरीही त्यांना सतत लाचारीला सामोरे जावे लागते, हे येथे लक्षात येते. दलित समाजात अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे व सामाजिक बंधनामुळे हा समाज मागे राहिल्याचे ह्या चित्रणातून लक्षात येते.

माणदेशातील 'माणमाती' (२००६) ह्या कादंबरीतून माणदेशामधील भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक चित्रण करण्याचा कादंबरीकार शहाजीराव बळवंतांचा प्रयत्न चांगला दिसतो. परंतु रचनेच्या बाबतीत कादंबरीवर पैलू पाडण्याची गरज असल्याचे जाणवते.

भाषाशैली नागर व ग्रामीण असलीतरी त्यात बराचसा कृत्रिमपणा असल्यासारखे वाटते. परंतु निवेदन परिणामकारक असल्याचे लक्षात येते.

## ५.९. निष्कर्ष व निरीक्षणे :

अशाप्रकारे 'मराठी कादंबरीतील माणदेशाचे चित्रण' तपासून झाल्यानंतर पुढील बाबी लक्षात येतात :

- इ.स. १९४० ते १९६० ह्या काळातच मराठी कादंबरीत माणदेशाचे चित्रण होण्यास सुरुवात झाली.
- माणसाच्या क्षुधेचा अनुभव कलात्मक होऊ शकत नाही, हे माहीत असल्यामुळे 'भूक' हा विषय घेऊन लेखन केले जात नाही. ग. दि. माडगूळकरांनी मात्र 'भूक' हा विषय मध्यवर्ती ठेवून माणदेशी कादंबरीचे लेखन केले व त्यांचा हा प्रयत्न माणदेशी चित्रणाच्या दृष्टीने लक्षणीय ठरतो.
- ग. दि. माडगूळकरांच्या कादंबरीत माणदेशी व्यक्तिरेखांवर कितीही अन्याय, अत्याचार झाले; तरी त्यांची जीवन जगण्याची दुर्दम्य इच्छा लक्ष वेधून घेते.
- ग. दि. माडगूळकरांच्या कादंबरीत माणदेशाच्या चित्रणात शाश्वताचा शोध व जुन्या मूल्यांवरील निष्ठा ह्यांचा समन्वय साधलेला दिसतो.
- व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी' (१९५५) ह्या आपल्या कादंबरीतून निसर्ग आणि मानवी जीवन ह्यांचे एकात्म रसायन घडवून संपूर्ण प्रदेशालाच नायकत्व बहाल केले. त्यांची ही कृती संपूर्ण ग्रामीण व प्रादेशिक मराठी कादंबरीला नवीन असल्यामुळे 'बनगरवाडी' ही प्रयोगशीलतेच्या दृष्टीने एकूण ग्रामीण व प्रादेशिक मराठी कादंबरीचा मानंदड ठरते.
- जातीची बंधने घट्ट होती, अशा काळात व्यंकटेश माडगूळकरांनी आपली ब्राह्मण ही जात विसरुन धनगरांच्यात मिसळून 'बनगरवाडी' लिहिली. माणदेशी मातीचे हे संस्कार त्यांचे वेगळेपण दर्शविण्यास पुरेसे ठरतात.
- व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेश स्वत: अनुभवलेला असल्यामुळे त्यांच्या कादंबरीतून माणदेशाच्या लोकसंस्कृतीचा पुरेपूर प्रत्यय येतो.
- व्यंकटेश माडगूळकरांनी अतिशय सोप्या शैलीतील हृदयवेधक मांडणीतून साकारलेल्या व्यक्तिरेखा कायमस्वरुपी आठवणीत राहतात.

- ✧ व्यंकटेश माडगूळकरांच्या सूक्ष्म अवलोकनातून आलेली अस्सल ग्रामीणता माणदेशातील वैशिष्ट्यांसह त्यांच्या कादंबरीतून साकार झालेली दिसते.
- ✧ व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण अभ्यासल्यानंतर त्यांना भाषेचे उपजत ज्ञान असावे, असे वाटते.
- ✧ शंकरराव खरात ह्यांच्यावर पूर्णपणे माणदेशी संस्कार झालेले असूनही त्यांनी वापरलेली भाषा मात्र माणदेशी न वाटता कृत्रिम वाटते.
- ✧ खरात ह्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संस्कार झालेले असल्यामुळे दलित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार आपल्या कादंबरीतून मांडण्यात ते यशस्वी झाल्याचे दिसून येते.
- ✧ खरातांच्या कादंबरीत चित्रित झालेल्या दलित समाजाला परिवर्तनाचे वेध लागलेले दिसतात व ही महत्त्वाची गोष्ट वाटते.
- ✧ नव्या दमाच्या ग्रामीण कादंबरीकारांमध्ये द. ता. भोसले ह्यांचे माणदेशाचे चित्रण करणारे कादंबरीलेखन संघर्षातून, गांभीर्यातून विनोदी अंगाकडे झुकलेले दिसते. साध्या शाब्दिक कोट्यांमधून माणदेशी संघर्षाकडे झुकवण्याची ताकद त्यांच्या लेखणीतून दिसून येते.
- ✧ द. ता. भोसले ह्यांच्या कादंबरीत 'भूक' हा विषय माणदेशाच्या पार्श्वभूमीवरुन आल्याचे स्पष्ट होते.
- ✧ माणदेशातील आघाडीचे साहित्यिक म्हणून भोसले ह्यांच्याकडे सध्या पहावे लागेल.
- ✧ उत्तम बंडू तुपे ह्यांनी सूक्ष्मपणे माणदेशाचा वेध घेतल्याचे दिसते. भाषेच्या बाबतीत मात्र ते काटेकोर आहेत, असे वाटत नाही.

## ५.१०. समारोप :

थोडक्यात,मराठी कादंबरीतील माणदेशाच्या चित्रणातून दारिद्रय, अंधश्रद्धा, जातीयता, अन्याय-अत्याचार ह्या गोष्टी लक्षात येतात. आता ह्यापुढील सहाव्या प्रकरणामध्ये 'माणदेशाचे चित्रण करणाऱ्या मराठी कथात्मक साहित्याचे अभिव्यक्तिविशेष' आपण जाणून घेणार आहोत.

----❖ ❖ ❖----

## ५.११. संदर्भ आणि टीपा :


१ कुलकर्णी वा. ल. व हस्तक उषा, : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' (खंड पाचवा,भाग १), म. सा. प. प्रकाशन, पुणे, १९७३, पृ. ४१३.

२ मालशे स. गं., : 'तारतम्य', परचुरे प्रकाशन मंदिर, मंबई, १९८७, पृ. ७.

३ रायकर सीताराम, : 'कृष्णराव भालेकर : समग्र वाङ्मय', महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे, १८९०, पृ. ५१.

४ पहा : यादव आनंद, : 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८१, पृ. ११७.

५ : तत्रैव, पृ. ६५.

६ जोग ल.ग., : 'कादंबरी', चिरंजीव प्रकाशन, पुणे, १९६३, पृ ८८.

७ पहा: दळवी जयवंत, : 'साहित्यिक गप्पा / दहा साहित्यिकांशी', सन पब्लिकेशन्स, पुणे, १९८५, पृ. ८०.

८ देशपांडे अ. ना., : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - भाग २', व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती: १९७०, पृ. १७७.

९ माडगूळकर अंबादास व खांडेकर सूर्यकांत (संपादक), : 'मराठी ग्रामीण कथा' श्री लेखन वाचन भांडार, पुणे, १९७६, पृ. ९-१०.

१० पवार गो. मा., : 'प्रतिष्ठान' (कादंबरी विशेषांक), औरंगाबाद, जानेवारी १९८१, पृ. २.

११ मंचरकर र.बा., : 'कादंबरीकार गो. नी. दांडेकर' (संपा. वीणा देव), मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९८४, पृ. ३७.

१२ कुलकर्णी वा. ल., : 'वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९५९, पृ. ८५.

१३ भोसले द. ता., : 'ग्रामीण साहित्य एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८८, पृ. ५२.

१४ फडके भालचंद्र, : '१९७२ मधील कादंबरी', 'ललित', मुंबई, एप्रिल १९७३, पृ. २०.

१५ कोमरपंत सोमनाथ, : 'व्यंकटेश माडगूळकर : माणदेशी माणूस आणि कलावंत', (संपा. म. द. हातकणंगलेकर), शब्द प्रकाशन, सातारा, मे २०००, पृ. १६५.

१६ मंगरुळकर अरविंद, : 'बनगरवाडी', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, १९५६, पृ. २५.

१७ जोग ल. ग., : 'मराठीतील वाङ्मयीन प्रवाह : कादंबरी', चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. ११७.

१८ गाडगीळ गंगाधर, : 'खडक आणि पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६०, पृ. २६४.

१९ खरात शंकरराव, : 'माझे आत्मकथन : तराळ अंतराळ', महाराष्ट्र साहित्य पत्रिका (संपा. कुलकर्णी भीमराव), पुणे, दिवाळी अंक - १९८३, पृ. ६५.

२० देशपांडे कुसुमावती, : 'पासंग', मौज प्रकाशन, मुंबई, १९७१, पृ. ७८.

२१ फडके भालचंद्र, : 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७, पृ. १९१.

२२ प्रा.माडगूळकर अंबादास व प्रा. खांडेकर सूर्यकांत, : 'मराठी ग्रामीण कथा', ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६७, पृ. ३२.

२३ फडके भालचंद्र, : उनि; पृ. २११.

२४ मुलाटे वासुदेव, : 'ग्रामीण साहित्य : स्वरुप व दिशा', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९४, पृ. १३५.

२५ तुपे उत्तम बंडू, : 'ग्रामीण मातीत रुजलेली नाळ', ललित, मुंबई, मार्च १९८६, पृ. ४३.

२६ यादव आनंद, : 'काट्यावरची पोटं', (प्रस्तावना, तुपे उत्तम बंडू ), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८२, पृ. ६.

२७ तुपे उत्तम बंडू, : उनि; पृ. ४३.